
# अंकुश शिंगाडे



**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# संजय

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# संजय

(कादंबरी)

अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# संजय

लेखक : अंकुश शिंगाडे
फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे- १२२बी, गजानन नगर, भरतवाडा, कळमना मार्केट रोड, नागपूर. महाराष्ट्र
ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

**e**sahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: ७ जून २०२३



©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# मनोगत



संजय........संजय हे महाभारतातील पात्र. ते पात्र तसं उपेक्षीतच. त्याचेवर जास्त लेखन झालेलं मला दिसलं नाही. त्यामुळंच मी त्यावर आपल्या प्रयत्नानं काही अल्पशः लिहून पाहिलं. ते आपल्यापुढे सादर करीत आहे. आपण ते वाचावं व प्रतिक्रिया द्यावी ही विनंती.

मी ईसाहित्य प्रतिष्ठानचे आभार मानतो. कारण त्यांनी माझी बरीच पुस्तकं ऑनलाईन प्रकाशित केलेली आहेत. ते जसजशी पुस्तकं प्रकाशित करतात. तसतसा लिहिण्याला हुरूप येतो. त्यातूनच घडलेली माझी संजय ही कादंबरी.

संजयबाबत सांगतांना मी एवढंच म्हणेल की संजय हा पहिला बातमीदार होता. ज्याला दिव्यदृष्टी हे नाव दिलं आहे. तसं त्याला बातमीदार बनवलं व्यासानं. व्यासानं यासाठी त्याला बातमीदार बनवलं की त्यांना तसं बनविण्याची गरज होती.

धृतराष्ट्र.......धृतराष्ट्र व्यासाचा मुलगाच होता नियोग पद्धतीनं झालेला. तो आंधळा होता. तसं पाहता महाभारताचं युद्ध अटळ होतं. त्यामुळं व्यासाला चिंता होती की त्याच्या नियोग पद्धतीनं झालेल्या मुलालाही म्हणजे

धृतराष्ट्रलाही युद्धाची माहिती मिळावी. त्यामुळं त्यांनी त्यासाठी योग्य अशा व्यक्तीची निवड करण्यासाठी शोधाशोध केला.


काळ बदलत चालला होता. गरज ही शोधाची जननी होती. त्यामुळं त्यांनी त्यावर प्रयत्न करुन त्यावर संजयची नियुक्ती केली. संजयनंही त्यावर आपलं कर्तव्य पुरेपूर प्रयत्न करुन पुर्ण केलं. मात्र हे सर्व करीत असतांना शेवटी संजयचं काय झालं? हे काही मी सांगत नाही. तसंच संजयचं शिक्षण कसं झालं? तो कुणाचा मुलगा होता? गादीच्या वारसाबद्दलच्या गोष्टी तसंच इतर बराच भाग मी यातून मांडलेला नाही. तो भाग माहीत करुन घेण्यासाठी मी ही कादंबरी लिहिलेली असून ती आपणा वाचकांना प्रदान केलेली आहे. आपण संजय हे महापात्र वाचावं व माहिती मिळवावी आपल्या ऐतिहासिक दस्तावेजाबद्दल. आवडल्यास प्रतिक्रिया द्यावी.

धन्यवाद!.

आपला नम्र.

**अंकुश शिंगाडे,**

**नागपूर , ९३७३३५९४५०**




ही कादंबरी

महाकवी व्यासमुनींना

सादर समर्पित

# संजय

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# संजय (कादंबरी)

त्याला आठवत होता त्याचा भुतकाळ. तो आठवत होत्या गतकाळात घडलेली प्रकरणे. तो होता म्हणून एका आंधळ्या माणसालाही जग पाहता आलं होतं. तो सदैव सोबत होता त्या आंधळ्या माणसाच्या. कुणाला तरी दिलेलं वचन होतं ते. ते भंगू नये म्हणून तो कर्तव्य पालन करीत होता. परंतू त्याच्या मनात आज एक शल्य होतं. ते म्हणजे तो त्या आंधळ्या व्यक्तीच्या शेवटच्या समयी त्याला वाचवू शकला नव्हता.

महाभारत घडलं की नाही, हे काही माहीत नाही. परंतू त्यात असलेली एक एक पात्र आजही आपल्याला बोध देत असतात. माणूसकी शिकवीत असतात. कोणत्या प्रसंगात कसं वागावं याची शिकवण देत असतात.

आजची परिस्थिती पाहिली जगाची तर असं जाणवतं की आजचं जग हे कौरव व पांडवानंच भरलेलं असून आजच्या काळात जी मुठभर इमानदार माणसं मिळतात. त्याच माणसांवर आजची वास्तविकता आधारलेली आहे. त्यांनाच पांडव म्हणता येईल. ही मुठभर असलेली मंडळी अतिशय इमानदार असून ती मंडळी चोऱ्या लुटमार, डकैती, व्याभीचार करीत नाहीत. तसेच आदर्श व्यवहार ठेवत असतात. मात्र बाकीची सर्व मंडळी अशी आहेत की जी चोऱ्या, लुटमार, डकैती, व्याभीचार करीत असतात. कोणाच्याही मुली पळवून आणत असतात. भावाच्याही पत्नीचे धिंडवडे काढत असतात. कोणी याला कलीयुग म्हणतात तर कोणी याला महाभारत काळ. परंतू ते काहीही म्हणोत. वास्तविकता हेच दाखवते की हा महाभारत काळ आहे.

होय, महाभारत काळ. या महाभारतात जी पात्र आहेत. ती सर्वच पात्र आजच्या परिस्थितीत निदर्शनास येतात. असंच एक पात्र आहे संजय.

संजय कोण होता? काय होता? त्याचे कार्य काय? हे कुणालाही कदाचीत माहीत नसेल. परंतू बाकी सर्वांचे पात्र जसे मोठे आहे. त्यांचे जसे विशेष महत्त्व आहे. तसंच महत्व संजयचं आहे. संजय हे पात्र देखील तेवढंच महत्वाचं आहे.

संजय.........महाभारतातील एक उपेक्षीत पात्र. तो विद्वान होता. शूरही होता. तसं त्यानं महाभारतातील युद्धात भागही घेतला होता. परंतू सार्थकीनं त्याला बंदी बनवलं आणि आता मारुन टाकणार. तोच व्यासमुनी म्हणाले,

"सोडून द्या याला. याचा जन्म मुळातच युद्ध करण्यासाठी झाला नाही. याचा जन्म दुसऱ्या एका महान कार्यासाठी झाला आहे."

संजय आज म्हातारा झाला होता. तो हिमालय पर्वतावर तपश्चर्या करीत होता. त्याच्या सोबतीला त्या भयाण जंगलात कोणीही नव्हतं. तसं कोणीही नसल्यानं तो रानावनात एकटाच फिरत होता गतकाळातील आठवणी काढत काढत.

आज तो कुंती, महाराज धृतराष्ट्र व महाराणी गांधारी सोबतच सन्याशी जीवन जगण्यासाठी वनात आला होता. त्याला आठवत होतं सर्व. ते वन व ती त्या तिघांची सोबत.

महाभारताचं अठरा दिवसाचं युद्ध संपलं होतं. या युद्धात मोठमोठे योद्धे धराशायी झाले होते. ज्या योद्ध्यांनी मोठमोठ्या डिंगा मारल्या होत्या. त्यानंतर युद्ध समाप्त झाल्यावर बराच काळ संजय हस्तीनापुरात राहिला. त्यानं बरेच दिवस महाराज धृतराष्ट्रची सेवा केली. परंतू ज्याचे स्वतःचे पुत्रच

जीवंत नाही, त्या राजाचे मन तरी रमेल काय एवढ्या मोठ्या राजप्रासादात. शेवटी तेच झाले.

तो राजप्रासाद भव्यदिव्य होता. तिथं महाराज धृतराष्ट्रला भरपूर प्रमाणात ऐषआराम होता. राजदास्या त्यांच्या सेवेत होत्या. व्यतिरीक्त पाच पांडवही त्यांची सेवा करीत असत. परंतू त्यांना तो पराकोटीचा ऐषआराम जरी असला तरी त्याला तिथं करमत नव्हतंच. कारण त्याला आपल्या शंभर पुत्राची आठवण येई आणि जेव्हा अशी तीव्र आठवण येई. तेव्हा जगावंसं वाटत नसे धृतराष्ट्रला.

संजय लहान होता. त्याचे वडील विणकर होते. लहानपणापासूनच संजय विलक्षण प्रतिभावंत होता. संजय बालपणापासूनच हुशार असल्यानं त्याच्या वडीलांनी त्याला शिकवायचं ठरवलं.

शिकवावं, पण कुठे? संजयचे वडील विचार करु लागले. तसं पाहता त्यावेळी विणकर जातीलाही शुद्र म्हणून मानलं जात असे. त्यामुळंच संजयची आबाळ होत होती. परंतू संजय चाणाक्ष बुद्धिमान असल्यानं त्याच्या वडीलांना गप्प राहाणं पसंत पडलं नाही. शेवटी ते प्रयत्न करीत होते.

संजयच्या वडीलाचं नाव गावाल्गन होतं. तसा त्यांचा व्यवसाय विणकराचा होता. ते राजदरबारात राजशी वस्त्र विणत असत. या राजशी

वस्रात हस्तीनापुरचा समावेश होता. गावाल्गन हस्तीनापुरातील राजशी वस्राला आकार देत असे. तसं पाहता त्यावेळी शुद्र कितीही हुशार असले तरी त्यांना राजदरबारात शिक्षणाला वाव नव्हता. त्यामुळं आपल्या मुलाला शिकवावे कुठे? हा प्रश्न सतत गावाल्गनच्या मनात पडत असे.

हस्तीनापुरात एक शिक्षक होता. त्याचं नाव द्रोणाचार्य होतं. ते राजदरबारात त्या मुलांना शिकवीत होते. जे राजकुमार होते. तसं पाहता सारेच ओळखीचे होते गावाल्गनच्या. त्यातच आपल्या मुलाची विलक्षण चातुर्यता लक्षात घेवून गावाल्गन गुरु द्रोणाचार्यकडे गेला.

द्रोणाचार्य असे शिक्षक होते की ज्यांना त्या काळात सर्व अस्र शस्र विद्या ज्ञात होत्या. परंतू त्यांची बरीच आबाळ झाली होती. शिक्षण पुर्ण होताच गुरु द्रोणाचार्यचा विवाह त्यांचे वडीलांनी लवकरच लावून दिला. परंतू त्यानंतरचा बराचसा काळ गुरु द्रोणाचार्यला वेदनेत काढावा लागला. त्यांना सतत उपासमार झेलावी लागली होती. मदत म्हणून ते त्यांचा जो परममित्र होता ध्रूपद. त्यांचेकडे गेला. परंतू राजा ध्रूपदनं त्यांना मदत करण्याऐवजी त्यांचा अपमान केला. साधा अपमान नाही तर घोर अपमान झाला त्यावेळी द्रोणाचार्यचा. तसं पाहता बरीचशी कठीणायी शोषून गुरु द्रोणाचार्यनं नोकरी मिळवली होती हस्तीनापुरात. ते आपली नोकरी गमवू पाहात नव्हते.

तोही काळ असा फारसा प्रगत नव्हता. त्याही काळात नोकरी मिळविणे काही सोपे नव्हते. राजदरबारात नोकरी मिळविण्यासाठी उमेदवाराला कठीण परिक्षेला पुढे जावे लागत असे. अशीच कठीण परिक्षा देवून गुरु द्रोणाचार्य हस्तीनापुरात नोकरीवर लागले होते. त्यातच त्यांना पुर्वाश्रमीच्या आयुष्यात उपासमार झेलावी लागल्याने ते राजदरबारात विद्यार्थ्यांव्यतिरीक्त कोणाला शिकवू पाहात नव्हते.

तसं वचनच घेतलं होतं पितामहा भिष्मनं गुरु द्रोणाचार्यकडून. त्या वचनात गुरु द्रोणाचार्यची राजदरबारात प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करतांना वदवून घेतलं होतं की ते राजदरबारा व्यतिरिक्त इतर कोणालाही शिकविणार नाही. तसा एकलव्याचा शिक्षणासाठी घेतलेला अंगठाही परीचीतच होता गावाल्गनला. तरीही ते आपल्या मुलासाठी गुरु द्रोणाचार्यकडे आले व त्यांनी आपली कैफियत मांडली.

ते आपल्या मुलाचे शिक्षणाचे विचार. ते विचार काही गावाल्गनला स्वस्थ बसू देत नसत. अशातच गावाल्गन एके सकाळी गुरुवर्य द्रोणाचार्यच्या दरबारात गेला व म्हटलं,

"गुरुवर्य मला आपणाकडे माझ्या मुलाला शिकवायचे आहे. कृपया आपण माझ्या मुलाला विद्या दान कराल काय?"

गुरुवर्य द्रोणाचार्यनं ते गावाल्गनचे शब्द ऐकले. नुकताच त्यांनी एकलव्याचा अंगठा घेतला होता गुरुदक्षिणा म्हणून. त्या प्रकरणाची सर्वत्र निंदा होत होती. त्यातच त्या गोष्टी गुरु द्रोणाचार्यच्या कानावर आल्या होत्या. त्याची खंतही गुरु द्रोणाचार्यांना वाटत होती. तशातच आता गावाल्गन आपल्या मुलाला शिक्षणासाठी घेवून आला होता. म्हणत होता की आपण माझ्या मुलाला विद्या दान कराल काय? काय उत्तर द्यावं सूचत नव्हतं. अशातच गुरु द्रोणाचार्य विचार करु लागले.

ते थोडा वेळ गप्पच होते. तोच गावाल्गन म्हणाला,

"गुरुवर्य आपण सांगीतलं नाही. आपण जेही उत्तर द्याल. त्यात मी सहमत असेल."

गुरु द्रोणाचार्य मौन बाळगून होते. तोच गावाल्गनचे बोलणे कानावर पडताच गुरुवर्य द्रोणाचार्य म्हणाले,

"गावाल्गन, मी तुम्हास काय उत्तर द्यायचं ते सुचेनासे झालेय मला. तुम्हाला तर माहीत असेलच की आधीच एकलव्य प्रकरणानंतर माझी किती बदनामी झालीय ती. मी शापीत जीवन जगत आहे. मी एकलव्याला शिकविले नाही. तरीही अंगठा घेतला त्याचा. मला तसा त्याचा अंगठा घेण्याचा कोणताच अधिकार नव्हता. मी मात्र यात राजधर्म पाळला. काय करु विवश आहे मी आणि विवश होतो तेव्हाही. वाटल्यास एकलव्यानं

मला गुरूदक्षिणा म्हणून अंगठा द्यायला नको होता. नकार द्यायला हवा होता तेव्हा. कारण मी त्याला शिकवलेच नव्हते मुळात. परंतू तो तरी काय करणार. त्याला वाटले असेल की हा गुरुवर्यांचाच आदेश आहे. पाळायलाच हवा. तसा त्यानं किंचीतही न घाबरता दिला अंगठा तोडून."

गावाल्गन द्रोणाचार्यची व्यथा ऐकत होता. तसा गुरुवर्य द्रोणाचार्यला तो म्हणाला,

"गुरुवर्य, ते सर्व जावू द्या. मला यावर उपाय सांगा की मी असं काय करु की माझ्या मुलाला मी शिकवू शकेल. मी माझ्या मुलाला तुमच्याकडेच शिकवू पाहात आहे. काय करावे लागेल तेवढं सांगा."

"गावाल्गन, मी तुझ्या मुलाला शिकवू शकणार नाही. तसा मी एकलव्यालाही शिकवू शकलो नाही."

द्रोणाचार्य बोलले. तसा त्यांनी एक उसासा टाकला. एक दिर्घ श्वास घेतला. तसे ते परत म्हणाले.

"होय, मी अगदी खरं सांगतोय."

"मग निश्चीतच काही ठोस कारण असेल. बोला गुरुवर्य, कोणतं कारण आहे ते. ते कारण आम्हालाही कळू द्या म्हणजे झालं."

"कारण. ठोस कारण. ऐका तर मग. मी राजधर्म पाहतोय. मी वचन दिलं पितामहांना. वचन........तोच राजधर्म आहे माझा."

"वचन! कसलं वचन? कोणतं वचन?"

"होय वचनच. म्हटलं की मी राजदरबारात राजकुमाराव्यतिरिक्त इतर कोणालाही विद्या शिकविणार नाही."

"पण ही गोष्ट नैतिकतेला धरुन नाही. आपण एक गुरुवर्य आहात. असं वचन देणं आपल्याला आवडलं होतं का? नक्कीच यात काही ना काही आपली ठोस व्यथा राहू शकते."

"नक्कीच.......तशीच व्यथा आहे. ठोस व्यथा आहे माझी. त्यामुळंच मला एकलव्याचा अंगठा घ्यावा लागला गुरुदक्षिणा म्हणून."

"अशी कोणती व्यथा आहे की आपण राजकुमाराव्यतिरिक्त बाहेरच्या मुलाला शिकवू शकत नाही?"

"ऐकायचं आहे तुम्हाला. परंतू मी सांगू शकत नाही ती व्यथा. काही काही गोष्टी ह्या गोपनीय ठेवाव्या लागतात. मी भयंकर दुःखी आहे. माझी व्यथा माझ्याजवळच राहू द्या गावाल्गनजी."

"गुरुवर्य, व्यथा सांगितल्यानंतर मन हलकं होतं आणि आपल्याला वाटत असेल की हा गावाल्गान अख्ख्या गावाला तुमच्या व्यथा सांगेल. तर ऐका त्याबद्दल. त्याबद्दल पण निश्चींत राहा. मी कोणालाही तुमच्याबद्दल काहीही सांगणार नाही. विश्वास ठेवा माझ्यावर."

गावाल्गन म्हणाला, तसा तो चूप बसला. मात्र गुरुवर्य द्रोणाचार्यच्या मनात आताही चडफडाट होता. त्यांचं मत आताही शांत झालं नव्हतं. तसा पुन्हा गुरुवर्य द्रोणाचार्यला गावाल्गन म्हणाला,

"सांगाच आता गुरुवर्य. आपण आपली व्यथा सांगाच. "

ते गावाल्गनचे शब्द. तसा गावाल्गन चूप बसला. मात्र त्यावर द्रोणाचार्य बोलके झाले. ते आता पोपटासारखे सांगायला लागले. कारण त्यांना गावाल्गनची गोष्ट पटली होती. सांगितल्यानंतर मन हलकं होतं.

"ऐक तर गावाल्गन." द्रोणाचार्य सांगू लागले.

"माझ्या वडीलांनी मला अस्र, शस्र शिकवलीत. त्याचबरोबर इतरही विद्या. त्या विद्या केवळ मलाच शिकवल्या नाहीत, तर त्या इतरही शिष्यांना शिकवल्यात. माझ्या वडीलांजवळ भेदभाव नव्हता. ते कोणालाही शिकवीत. तसं इतर शिष्यात ध्रृपदलाही शिकवल्यात. जो माझा खास मित्र होता शिकायला असतांना.

त्या विद्या शिकल्यानंतर सर्व शिष्य आपआपल्या राज्यात रवाना झाले. त्यांनी विवाह केला असेल नंतर. तसा मिही विवाह केला व मी संसारात रमलो. तसा ध्रृपदही. तो ध्रृपद आपल्या राज्याचा राजा बनला.

मी विवाह केला खरा व संसारात रमलो खरा. परंतू मी फार गरीब होतो. मला माझ्या मुलाला व माझ्या पत्नीला पोटभर अन्नही देता येत

नव्हते. काय करावे सुचत नव्हते. अशातच मी मदत मागायला माझा गुरुमित्र ध्रृपदकडे गेलो. परंतू त्यानं मला काहीच दिलं नाही. उलट माझा अपमान करुन मला भरल्या राजदरबारातून हाकलून लावले. त्यानंतर मी हताश निराश अवस्थेत तेथून निघालो. वाट चालणं अवघड होती. त्यातच ती वाट चालत असतांना मला आपला जीवही द्यावासा वाटत असे. काय करणार. मला त्यावर कोणताच उपाय दिसत नव्हता. परंतू मी विचार केला. विचार केला की आपल्यालाही बायकापोरं आहेत. त्यांची जबाबदारी आहे. तोच विचार करुन मी चालत होतो ती वाट. तसं चालता चालता हे हस्तीनापूर आलं.

मी हस्तीनापुरात आलो. मला तहान फार लागली होती. तसा एका विहीरीवर बसलो. तोच तिथं या हस्तीनापुरातील मुलांचा घोळका आला. त्यांचं विहिरीत काहीतरी पडलं होतं. ती वस्तू विहिरीतून काढायला लोंबकळत होती. तसं ते पाहून मी विचार केला की जर यातील एखादं मुल विहीरीत पडलं तर. तर प्रसंग ओढवायचाच. काय करावं. शेवटी विचार करुन मी त्यांना म्हटलं की मी तुम्हाला एका झटक्यात काढून देवू शकतो तुमची वस्तू. त्यावर त्यांना ती वस्तू मी अगदी अल्प प्रयत्नात काढून दिली. तशी ती मुलं रवाना झाली. मिही पाणी पिवून माझी तहान भागवली. ऊन फार पडलं होतंच. तसा मी पाणी पिवून त्याच विहिरीजवळ असलेल्या

झाडाच्या सावलीत बसलो. फार थकलोच होतो, त्यामुळं थोडी विश्रांती घेतली.

थोड्याच वेळाचा अवकाश. थोड्याच वेळात मी पाहिलं की ती मुलं आपल्या म्हाताऱ्या आजोबांना घेवून माझ्यापर्यंत येत आहेत. त्यांच्यासोबत काही शिपाही देखील आहेत. तसा मी घाबरलो व विचार केला की आपल्यावर आता घोर संकट आहे. विनाकारण आपण या मुलांची विहिरीत पडलेली वस्तू काढून दिली विहिरीतून. आता आपल्याला हे शिपाही ताब्यात घेणार. परंतू तो माझा विचार होता.

ते त्या मुलांसोबत आलेले भिष्म पितामहा होते. म्हणत होते की मुलांनी कोणीतरी महात्मा आपल्या राज्यात आल्याचं सांगीतलं. त्यामुळंच ते भेटायला आलेत. त्यानंतर त्यांनी मला परीचय विचारला.

मी परीचय दिला. तशी एक आर्जव केली की जर त्यांनी मला राजदरबारात कोणतं काम दिलं तर उपकार होतील. तद्वतच त्यांनी त्या गोष्टीला होकार दिला. शिकविण्याचं काम दिलं मला. तशी एक अट सांगीतली. आपण राजदरबारातील राजकुमाराव्यतिरिक्त इतर कोणालाही शिकवायचं नाही. मलाही गरज होतीच. तसं मी सर्व मान्य करीत म्हटलं,

"मला आपल्या सर्व अटी मान्य आहेत."

ती परिस्थिती.......तो भावनेचा बहर. शेवटी परिस्थितीनुसार परिस्थितीपुढं लाचार होवून मी हो म्हटलं. परंतू आज कळतं की तिही माझी परिस्थिती निघून गेली असती. परंतू मी होय म्हणायला नको होतं. त्याच एका होकारानं मी घोर पाप केलं आहे. एकलव्याचा अंगठा घेवून. आता दुसरं पाप नको आहे माझ्या हातून मला. वाटल्यास आपण मला दोषी ठरवलं तरी चालेल."

ते बोलणं........ तसा त्या बोलण्यातून द्रोणाचार्य फारच चिंताग्रस्त वाटत होता. ते पाहून गावाल्गन म्हणाला,

"बरं गुरुवर्य, मी निघतोय आता. परंतू जाता जाता एक विचारतोय की मला माझ्या मुलाला शिकविण्याचा काहीतरी उपाय सांगा. एक गुरुवर्य म्हणून सांगा. कारण माझ्या मुलाच्या शिक्षणाचं कोणतंच नुकसान व्हायला नको."

"एक उपाय आहे तर."

"कोणता गुरुवर्य? तातडीनं सांगा."

"जर तातश्रींनी होकार दिला तर. जावून पाहा. ते जर हो म्हणतील तर मी शिकवीन तुमच्या मुलाला. मग तर झालं."

"ठीक आहे गुरुवर्य. मला निरोप द्या. मी प्रस्थान करतो."

"ठीक आहे."

गावाल्गाननं गुरुवर्य द्रोणाचार्यचा पुरता निरोप घेतला. तसा तो तेथून निघाला. परंतू तो आता थेट भिष्माकडे गेला नाही. तो आपल्या घरी परतला काही विचार करण्यासाठी.

गावाल्गान एक राजदरबारातील वस्त्र बनविणारा एक असाधारण व्यक्ती होता. त्याला राजदरबारात फारच किंमत होती. त्याला राजदरबारात मोठे मानाचे स्थान होते. त्यामुळं त्याच्या विणकर जातीला त्या काळात शुद्र मध्ये गणल्या गेले असले तरी गावाल्गनला राजदरबारात मान दिला जात होता. त्यातच तो त्या राज्याचा असल्यामुळं तो आपल्या मुलाला शिकवणार कुठे? गुरुवर्य द्रोणाचार्यनं तर यावर आपलं मत सांगूनही टाकलं होतं. आता तातश्रीही तसंच म्हणतील असं त्याला वाटत होतं. त्यासाठीच तो विचार करण्यासाठी तो थेट भिष्माकडे गेला नाही.

मुलाचे शिक्षण. चिंताग्रस्त असलेला बाप. त्या बापाला फारच वेदना होत होत्या. तशा वेदना होत असतांना तो रात्रंदिवस विचार करीत असायचा. अशातच तो विचार करीत असतांना त्याला आठवलं की आपण जेव्हा द्रोणाचार्य कडून आलो, तेव्हा आपल्याला द्रोणाचार्यनं म्हटलं की भिष्माकडं जावून पाहा. कदाचीत त्यातून मार्ग निघेल.

तो विचारच करीत होता. तोच विचार करता करता त्याला आठवलं की आपण आपल्या मुलासाठी तरी पितामहा भिष्माकडं जावं. त्यांना

आर्जव करावी व तशी आर्जव करुन आपण आपल्या मुलाला हस्तीनापुरात शिकवावं.

त्याचा तो विचार. तसा विचार करता करता तो भिष्माकडे आला. भिष्म पितामहा तेव्हा कुठंतरी बाहेर जायच्या तयारीत लागले होते. तसा तो येताच पितामहा म्हणाले.

"कसा काय आला आहेस गावाल्गन?"

"मुलाचं शिक्षण."

"अर्थात?"

"माझा मुलगा संजय. त्याला शिकवावं म्हणतो."

"छान. शिकवणं वा शिक्षण देणं चांगली कल्पना आहे."

"परंतू?"

"परंतू? काय परंतू? अरे गावाल्गान असा शिक्षण शिकवितांना किंतू परंतू मनामध्ये नसावा."

"तातश्री, तेच तर म्हणत आहो मी."

"म्हणजे?"

"तात, मला माझ्या मुलाला शिकवायचं आहे. हस्तीनापुरात शिकवायचं आहे माझ्या मुलाला."

"हस्तीनापुरात? म्हणजे?"

"हस्तीनापुरात, युवराजांसोबत शिकवायचं आहे माझ्या मुलाला."

"म्हणजे? शक्य नाही गावाल्गन तसं करणं. कसं शक्य आहे?"

"तातश्री, आपण कदाचीत विचार केला तर शक्य होईल."

"मी विवश आहे गावाल्गन. तसं करणं शक्य नाही. तसं मी वचन दिलं युवराजांना. वचन दिलं की या दरबारातील मुलांसारखे इतर मुलं घडणार नाहीत याचं वचन दिलं मी युवराजांना. हवं तर त्याला माझी भिष्मप्रतिज्ञा समजावं तुम्ही."

"तात, शक्य होणाऱ्या गोष्टीला तुम्ही नाकारता. माझा मुलगा हुशार आहे. म्हणूनच मी आले आपणाकडे. परंतू मी निराश झालो तर. परंतू आपण यावर उपाय सांगावा. आपण तात आहात. दूरदूरचं आपल्याला दिसतं. हवं तर आपल्याला सात समुद्राच्या पलीकडचं दिसतेय. आपण उपाय सांगावा माझ्या मुलाबद्दल. त्याची आबाळ होवू नये यासाठी."

"एक उपाय आहे."

"कोणता उपाय आहे तात?"

"गावाल्गन, तुझ्या मुलाला व्यासाकडे घेवून जा. तेच शिकवू शकतील तुझ्या मुलाला. हवं तर मला माफ कर. मी विवश आहे."

"ठीक आहे. माझी शेवटची आशा मावळली. फार मोठी आशा घेवून आलो होतो मी आपणाकडे. परंतू ते माझे स्वप्न होते. आता कळलं की या

जगात बुद्धीमत्तेला थारा नाही. थारा असतो राजदरबारात जन्म घेणाऱ्या जिवाला. यात दोष तुमचा नाही. सर्व दोष आहे आमच्या प्रारब्धाचा. आम्ही राजदरबारात जन्मच घेतला नाही."

"गावाल्गन मी विवश आहे. अरे, मी तर साधा विवाहही करु शकलो नाही माझा. मी काय तुला मदत करणार. हा राजदरबार आहे. याचेही काही नियम आहेत. त्या नियमानुसार चालावंच लागतं राजदरबारातील प्रत्येक माणसाला. तुम्ही तरी बरे की तुम्ही स्वतंत्र आहात. तुमचे हात बांधलेले नाहीत. परंतू आमचे! आमचे हात बांधलेले असतात सदैव."

"ठीक आहे तात, माझीच चूक झाली. मी आपलं मन दुखवायला यायला नको होतं. परंतू मला माहीत नव्हतं की राजदरबारातील लोकांचेही हात बांधलेले असतात. परंतू आता आमच्या सदैव लक्षात राहिल. बराय येतो मी."

गावाल्गन तातश्रीच्या दरबारातून बाहेर पडला. तसा तो आपल्या घरी गेला.

*****************************

सर्वजण झोपी गेले होते. मात्र अजूनपर्यंत गावातील कुत्री झोपली नव्हती. ती ओरडत होती विनाकारण. लामणदिवे जळत होते. रात्रीचा तो चंद्रप्रकाशही खुणावत होता.

सर्वजण झोपले होते. परंतू गावाल्गान झोपला नव्हता. तो अजूनही जागाच होता. तो विचार करीत होता आपल्या मुलाच्या शिक्षणाचा. तसं त्याला वाटत होतं की दिवस केव्हा निघतोय. कारण दिवस निघताच त्याला व्यासाला भेटायला जायचे होते. व्यासाकडे आपल्या मुलाला न्यायचे होते. त्याचे भविष्य घडवायचे होते त्याला. त्यासाठीच तो दिवस उजाडण्याची वाट पाहात होता.

ती रात्र तशी निघून गेली होती. गावाल्गानला रात्रभर झोप आली नाही. तो संपूर्ण रात्रभर या कुशीवरुन त्या कडावर सारखी कुस बदलवीत राहिला. तशी पहाट झाली. कोंबडा आरवला. तो कोंबड्याचा आवाज. संपुर्ण अंधाराला चिरुन तो कोंबड्यांचा आवाज येत होता.

तशी रात्र पुरती सरली याचा भाष त्याला झाला. तसा तो उठला. त्यानं लवकरच प्रातःविधी आटोपवला व पुत्रप्रेमानं तो व्यासाकडे निघाला.

गावाल्गान वेद व्यासाकडे गेला. म्हणाला,

"मी माझ्या मुलाला आपल्याकडे शिक्षणासाठी आणलं आहे. आपण कृपया शिकवावं."

गावाल्गनचा तो प्रश्न. तसे व्यास म्हणाले,

"मी एक तपस्वी. आपल्या मुलाला काय शिकविणार. आपण त्याला गुरु द्रोणाचार्यकडे न्यावं."

व्यासांचे ते शब्द. ते शब्द ऐकताच गावाल्गन म्हणाला,

"गेलो होतो. गेलो होतो द्रोणाचार्यकडेही. परंतू त्यांनी माझ्या मुलास शिकविण्यास नकार दिला. मग काय करावे?"

"विनंती करायला हवी होती."

"बराच प्रयत्न केला. परंतू काहीच साध्य झालं नाही. म्हणून मी विचार केला. आता आपण व्यासजीकडं जावं व शिकवावं आपल्या मुलाला. तसं पाहता आपलं नाव मी बरंच ऐकलं होतं. आता मला सांगा की आपण शिकवाल की नाही माझ्या मुलाला?"

व्यासानं विचार केला. गुरु द्रोणाचार्यनं तरी का शिकवलं नसेल यांच्या मुलाला. परंतू जावू द्याव्या त्या गोष्टी. आपण गावाल्गनच्या मुलाला शिकवावं. किंतू परंतू करु नये. आपण शिकवावं. आपणही विचार करु नये की आपण गावाल्गनच्या मुलाला शिकवू नये. विचार करता करता त्यानं गावाल्गनला होकार दिला. तसा संजय त्या दिवसापासूनच व्यासाचा शिष्य बनला होता.

वेद व्यास....... त्यांच्या आईचे नाव सत्यवती व वडीलाचे नाव पाराशर होते. म्हणतात की ते कितीतरी जास्त प्रमाणात ज्ञानवंत होते. ज्यावेळी हस्तीनापुरात ज्या काही घटना घडत. त्याची इत्यंभूत माहिती त्यांना असायची. त्यातच त्यातील अनुचीत घटनेवर ते सल्ला सुद्धा देत असत. अशातच जेव्हा जेव्हा संकट आलं, तेव्हा तेव्हा त्याची आई माता सत्यवती व्यास ऋषीच्या आश्रमात जात असे. कधी तिला तसं जाणं शक्य झालं नाही तर ती व्यासालाच आपल्या आश्रमात बोलवत असे व व्यासही आपल्या मनात किंतू परंतू न ठेवता हस्तीनापुरात जात असे. मानलं जातं की वेद व्यासाचा आश्रम हा अलीकडच्या उत्तरप्रदेशातील बिलासपूरला होता. तसाच तो आश्रम यमुनेच्या तीरावर होता. इथेच त्यांनी पाणी मिळविण्यासाठी एका सरोवराची निर्मीती केली. ते ठिकाण व्यास सरोवर म्हणून जगप्रसिद्ध आहे. कोणी म्हणतात की हा आश्रम सरस्वती नदीतटावर होता. जी नदी आज अस्तित्वात नाही अर्थात अदृश्य स्वरुपात आहे.

व्यासांनी महर्षी पदवी दिली गेली. म्हणतात की ही पदवी त्यांच्याजवळ असलेलं दिव्य ज्ञान पाहून दिली गेली. त्यांनी आपल्या ज्ञानाचा दिप प्रज्वलीत करुन महाभारत नावाचा अतुलनीय ग्रंथ लिहिला. कोणी या महाभारत ग्रंथाची निर्मीती काल्पनिक मानतात. परंतू त्या ग्रंथातील व वास्तवीक जगातील बारकावे लक्षात घेता तो ग्रंथ काल्पनीक

स्वरुपाचा वाटत नाही. हं, व्यासांना कोणी ब्रम्हा वा कोणी विष्णू म्हणून संबोधतात. ते मात्र कोणीही मानू नये.

संजय महापात्र लिहित असतांना व्यासाबद्दल लिहिणं गरजेचं समजतो. व्यास हे महाभारत महाकाव्य लिहिणारे लेखक म्हणून त्यांची ओळख. परंतू पुरातन कथेनुसार सांगतो.

प्राचीन काळात एक सुधंवा नावाचा राजा होवून गेला. तो एकदा शिकार करण्यासाठी वनात गेला. त्यानंतर त्याची पत्नी रजस्व अवस्थेत पोहोचली.

त्या राजाची पत्नी रजस्व अवस्थेत पोहोचली असता तिनं ती बातमी तिनं पाळलेल्या पक्षांच्या द्वारे आपल्या पतीला पाठवला. ते ऐकताच राजानं एक गुप्त वस्तू त्या पक्षाला दिली व म्हटलं की ही वस्तू घेवून जा. ही वस्तू कोणाला न सांगता महाराणीला देशील. त्यानंतर त्या पक्षानं ते ऐकलं व ती वस्तू घेवून तो पक्षी आकाशात उडाला. परंतू आकाशातून उडत जात असतांना त्याची भेट दुसऱ्या एका शिकारी पक्षाशी झाली. त्यानंतर दुसऱ्या शिकारी पक्षानं ती वस्तू मागीतली. परंतू त्या शिकारी पक्षानं ती वस्तू देण्यास नकार देताच त्या दोघांचं तुंबळ युद्ध झालं व अशाच युद्धादरम्यान ती वस्तू त्या शिकारी पक्षाच्या चोचीतून खाली पडली. म्हणतात की ती वस्तू थेट यमुना नदीत पडली.

ती यमुना नदी. त्या नदीत ब्रम्हाच्या शापवाणीने शापीत झालेली एक स्वर्गातील अप्सरा मासोळीच्या रुपात होती. तिनं ती वस्तू नदीत पडताच गिळली. तसं पाहता ती दुर्मीळ व गुप्त वस्तू त्या मासोळीनं गिळताच ती गर्भवती राहिली. त्यातच गर्भ पुर्ण होताच ती मासोळी एका निषाद अर्थात कोळयाच्या जाळयात सापडली. त्यानंतर त्या कोळयानं त्या मासोळीला कापलं.

ती मासोळी त्या कोळयानं कापताच त्या मासोळीच्या पोटातून दोन गर्भ बाहेर पडले. त्यात एक मुलगी होती व दुसरा मुलगा.

घडलेली घटना.......ती घटना अजब गजबच होती. ती घटना घडताच तो कोळी त्या दोन्ही मुलांना घेवून राजा सुधंवाकडे गेला. त्यानं घडलेली सर्व हकीकत राजाला कथन केली. तसं ते ऐकताच राजानं त्या मुलाला जवळ घेतलं. तसं पाहता त्याला पुत्र नव्हता. त्यामुळंच की काय तो मुलगा राजानं ठेवून घेतला व तो कोळयाला म्हणाला,

"जा तुम्ही. मी या मुलाचं पालनपोषण करील."

तो कोळी त्यानंतर ती मुलगी घेवून तेथून निघून गेला. त्यानंतर त्या कोळयानं त्या मुलीचं नामकरण केलं व तिचं नाव मत्सगंधा ठेवलं गेलं.

ती मुलगी त्या मासोळीच्या पोटातून जन्मली होती. त्यामुळंच की काय, तिच्या अंगातून मासोळीसारखा उग्र वास येत असे. तिलाच सत्यवती सुद्धा म्हटलं जातं.

सत्यवती लहानपणापासूनच नावेत बसायची. नाव वल्हवायची. कधी ती आपल्या वडीलांसारखीच मासे पकडायची तर कधी माणसांचीही वाहतूक करायची. तसं पाहता एकदा तिनं प्रवासी वाहतूक करीत असतांना ऋषी पाराशरलाही आपल्या नावेतून बसवून नेलं होतं.

एकदा पाराशर ऋषी तिच्या नावेतून प्रवास करीत असताना तिच्यावर मोहीत झाले. कारण तिही आपल्या आईसारखीच सुंदर होती. कारण ती एका शापीत अप्सरेची मुलगी होती. ऋषी पाराशर तिला पाहून एवढे मोहीत झाले की त्यांनी सरळसरळ तिला म्हणूनच टाकलं,

"प्रिये, तू मला फार आवडलेली असून मला तुझ्यासोबत तुझी इच्छा असेल तर काही दिवस सहवास करायचा आहे. तेव्हा तू तयार आहेस का?"

त्या सत्यवतीनं त्या ऋषीचे ते म्हणणे ऐकले व ती म्हणाली,

"हे महात्मा, आपण ज्ञानी आहात. अंतर्यामी आहात. मी निषाद कन्या आहे. तुम्ही ब्रम्हज्ञानी आणि आम्ही निषाद ह्यामुळेच तुमचा आणि आमचा सूर जुळत नाही. तेव्हा मी आपल्यासोबत काही काळ तर सोडा एक क्षणही सहवास करु शकत नाही."

ऋषी पाराशरनं तिचे बोलणे ऐकले. तसे ते म्हणाले,

"सत्यवती, तू मुळीच चिंता करु नको. तुझी प्रसुती झाल्यावरही तू कुमारिकाच असशील. असं वचन देतो मी. तसंच मी तुला या मासोळीच्या गंधापासूनही मुक्त करतो. काल तुझ्या शरीरातून जो दुर्गंध येत होता मासोळीसारखा. तो दुर्गंध आजपासून आणि या क्षणापासून दूर होईल."

थोड्याच वेळाचा अवकाश. सत्यवतीनं अनुभवलं की तिच्या शरीरातून येणारा मासोळीसारखा उग्र वास नव्हे तर दुर्गंध समाप्त झालेला आहे. तसा तिला अनुभव येताच तिला आश्चर्याचा सुखद धक्का बसला व ती प्रसन्नपणे त्या पाराशर ऋषीच्या सहवासास तयार झाली. त्यानंतर त्या ऋषीनं सत्यवतीला भोगलं. त्यासाठी त्यानं आपल्या योगमायेनं सभोवताल काळा कुट्ट अंधार केला होता.

ऋषी पाराशरच्या सहवासात सत्यवती गर्भवती राहिली. त्यावेळेस गर्भ पोटात असतांनाच ती पाराशरकडून वेद विद्या ऐकत असे. ते ऐकतांना त्याचे संस्कार गर्भावर झाले व तद्नंतर सत्यवती बाळंत झाली व तिनं वेदविद्येत निपुण असलेल्या बाळास जन्म दिला.

सत्यवती व पाराशर ऋषीनं त्याचं नाव व्यास ठेवलं. पुढे तोच मुलगा द्वैपायन बेटावर तपश्चर्या करण्यासाठी गेला. या बेटावर सतत ऊन असल्यानं व अविरत उन्हात तपश्चर्या केल्यानं त्याचा रंगही काळा पडला व त्याला

लोकं तद्नंतर कृष्ण द्वैपायन म्हणू लागले. त्यानंतर व्यासांनी पुढं जावून वेदाचं विभाजन केलं. म्हणून त्यांना पुढे वेदव्यास म्हटले जावू लागले.

व्यास प्रकांड पंडीत होते. म्हणतात की त्यांना दिव्य दृष्टी प्राप्त होती. त्यांनी वेदाचे विभाजन केलं. त्यामागं त्यांचा विचार होता. तो म्हणजे सामान्य माणसांनाही वेदांचा अभ्यास करता यावा. म्हणतात की व्यासांनी वेदाचे चार भागात विभाजन करुन त्याला ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असं नाव दिलं. त्यांनी वेदांचं विभाजन केल्यामुळे त्यांना वेदव्यास म्हटलं जातं.

वेदाचं विभाजन झालं होतं. तसे आता वेद साध्या स्वरुपात आले होते. त्याचा अभ्यास सामान्य लोकांनाही करता येत होता. म्हणतात की व्यासांनी सर्वप्रथम वेदांचा अभ्यास आपल्या शिष्यांकडून करवून घेतला. त्यात पैल, जैमीन, वैशंपायन व सुमंतूमुनी यांचा समावेश आहे.

वेदांचे विभाजन झाले होते. तरीही त्या वेदात पुर्ण व्यवहाराचा अभ्यास नव्हता. त्यामुळंच की काय, पाचव्या वेदाच्या रुपात व्यासांनी पुराणं लिहायला प्रारंभ केला. त्यानुसार त्यांनी महाभारताची रचना केली. हे पुराण त्यांनी सर्वप्रथम त्यांचा शिष्य रोमहर्षण याला सांगीतले. व्यासांनी महाभारत, अठरा पुराण, श्रीमद भागवत गीता, ब्रम्हसुत्र इत्यादी ग्रंथ लिहिले.

बरेचसे पुराण असे आहेत की त्यात व्यासाच्या जन्माचा निश्चीत उल्लेख नाही. कोणी म्हणतात की त्यांचा जन्म हा इ स पुर्व तीनहजार वर्षापूर्वी आषाढ पोर्णीमेच्या दिवशी झाला. ते उत्तम कवीही होते. हे प्राचीन महाभारत ग्रंथरचनेतून दिसून येते. कारण प्राचीन महाभारताची प्रतिलीपी ही एका काव्याच्या रुपात असून ते काव्यरुप संस्कृतमध्ये आहे.

महाभारत ग्रंथ असा निर्मीत आहे की या ग्रंथात माणसाच्या व्यवहाराबाबत जे लिहिलेले आहे. त्यापेक्षा वेगळं असं दुसऱ्या कोणत्याही ग्रंथात सापडत नाही. तिथंही तेच सापडते. तसं पाहता या ग्रंथात जे लिहिलेले नाही. ते इतरत्र ग्रंथात लिहिलेले आढळून येत नाही. अशी महाभारत ग्रंथाची रचना आहे. म्हणतात की व्यासांचा जन्म यमुनेच्या एका तटावर काल्पी इथे झाला.

व्यास लहानाचे मोठे होताच तपश्चर्येला गेले. काही लोकं म्हणतात की व्यासाचा जन्म होताच ते तपश्चर्येला निघून गेले. कारण त्यांना तपश्चर्या करायची आज्ञा त्यांच्या आईनं दिली होती. ते तपश्चर्या करायला जाताच जातेवेळी ते आपल्या आईला म्हणाले,

"माते, जेव्हाही तू माझं स्मरण करशील. तेव्हा तेव्हा मी तुझ्याकडे धावत येईल."

ते आपल्या आईला त्यांनी दिलेलं वचन त्यांनी पुर्ण जीवनभर पाळलं. त्यानंतर ज्या ज्या वेळेस त्याची आई संकटात सापडली. तेव्हा तेव्हा तिनं व्यासाची आठवण केली व तेव्हा तेव्हा व्यास धावून आले. मग हस्तीनापूरवरील कितीही मोठे संकट का असेना. ज्याप्रमाणे कृष्ण प्रत्येक संकटसमयी हस्तीनापुरात येवून मदत करायचा. तसा व्यासही आपल्या आईच्या बोलावण्यानुसार हस्तीनापुरात यायचा व आपल्या आईच्या बोलण्यानुसार हस्तीनापुरला मदत करायचा. त्यात ते चांगलं काय आणि वाईट काय याचा विचार करायचे नाहीत.

जेव्हा व्यासांनी पाहिलं की धर्माचा -हास होत आहे. लोकं भरकटलेले आहेत. तेव्हा त्या लोकांना खरी दिशा देण्यासाठी व्यासांनी ग्रंथनिर्मीती केली. म्हणतात की व्यासांनी काशीला शाप दिलेला होता. त्यामुळेच काशीतील विश्वेश्वरांनी त्यांना काशीत राहण्याचा अधिकार दिला नव्हता. त्यानंतर ते काशीतून निघून जावून गंगा तटावर लोलार्क मंदीराच्या आग्नेय दिशेला स्थित झाले. (संदर्भ काशी खंड ९६/२०१(४)

********************************

ऋषी पाराशरांनी सत्यवतीला सहवास करु देण्याची विनंती करताच सत्यवतीनं त्याच्यासमोर तीन अटी ठेवल्या. पहिली अट होती की तशा सहवासात गुप्तता पाळण्यात यावी. तो सहवास कोणाला दिसायला नको. दुसरी अट होती, ती म्हणजे तिच्या अंगातील येणाऱ्या उग्र गंधाचं रुपांतर सुगंधात व्हावं व तिसरी अट होती, ती म्हणजे तिचं कौमार्य भंग होवू नये. या तीन अटी पाराशर ऋषीनं पुर्ण करताच सत्यवती पाराशर ऋषीसोबत सहवास करायला तयार झाली. व्यासांचा जन्म होताच ऋषी पाराशर तपश्चर्या करायला निघून गेले. त्यानंतर तिचा पुत्र असलेला व्यासही तपश्चर्या करायला निघून गेला. त्यानंतर ती आपल्या वडीलांसोबत राहू लागली. नौकानयन करु लागली. मासेही पकडू लागली.

************************

गंगा राजा शांतनूला सोडून जाताच त्याला जगणं असह्य झालं होतं. गंगा त्याला सोडून निघून गेली होती. त्याचं कारणही तसंच होतं. गंगेशी जेव्हा शांतनूनं विवाहाबद्दल विचारलं होतं, तेव्हा तिनं त्यात अट टाकली होती. ती अट होती की सांसरीक बाबीत अडकल्यावर ज्यावेळेस गंगेला शांतनू टोकेल. तेव्हा ती त्याला सोडून जाईल.

शांतनूसमोर गंगेनं मांडलेली अट शांतनूनं मान्य करताच ती त्याचेशी सहवास करायला तयार झाली. ती प्रत्येक वेळी सहवास करीत असे व प्रत्येक वेळेस गर्भवती राहात असे. तसंच प्रत्येक वेळेस बाळाचा जन्म होताच ती त्या बाळाला आपल्यात सामावून घेण्यासाठी पाण्यात टाकत असे. असे शांतनूचे बरेच पुत्र तिनं नदीत टाकले.

शांतनूला गंगा आपले पुत्र गंगेत टाकत असतांना नेहमीच दिसायची. त्याला वाईट वाटत होतं. परंतू त्याला ती अट माहीत होती. ती म्हणजे कोणीही तिला कोणतेही कर्म करीत असतांना टोकल्यास ती त्याला सोडून जाईल. परंतू तो तरी किती सहन करणार होता. त्यालाही वाटत होतं की जर तो तिला टोकणार नाही तर असे अनेक पुत्र ती पाण्यात टाकेल व पुढे पुत्र न झाल्यास आपला वंश चालणार नाही.

ती वंशवृद्धीची कामना. त्यातच गंगेचे वंश संपुष्टात आणण्याचे प्रयत्न. त्यामुळंच की काय, त्याला आपला वंश टिकणार नाही असं वाटलं. त्यातच त्याच इच्छेनं तसं वाटत असल्यानं त्यानं तिला टोकलं. शांतनूनं गंगेला टोकताच ती अट मोडली गेली व तिनं तिचा शेवटचा पुत्र असलेला भिष्म शांतनूच्या हातात देत ती अंतर्धान पावली.

गंगा निघून जाताच शांतनूला एकटं वाटत होतं. तो वाढवत होता आपल्या इवल्याशा मुलाला. त्याचं शिक्षण, वेद विद्या साऱ्या गोष्टी पाहात

होता. तो बाहेरुन आनंद दाखवत होता तर आतून गंगेच्या आठवणीनं फार दुःखी होता. अशातच त्याचा मुलगा गंगेच्या पोटचा भिष्म आज मोठा झाला होता. त्याचबरोबर तो समजदारही तेवढाच वाटत होता.

शांतनूबाबत भिष्माला पुरेपूर माहिती होती. त्याच्या सुखदुःखाचीही त्याला कल्पना होती. गुरुपासून आज्ञा घेवून गंगापुत्र भिष्म जेव्हा आपल्या राजधानीत परतला. तेव्हा त्यानं पाहिलं की आपला पिता फारच दुःखी नाही आणि तो दररोज कोणालातरी भेटायला जातो. तशी शंका येताच त्यानं एक दिवस शांतनूचा पाठलाग केला व लक्षात घेतलं की शांतनू एका कोळ्याच्या मुलीच्या प्रेमात आहे. जिचं नाव सत्यवती आहे.

भिष्माला ती गोष्ट माहीत होताच आपल्या वडीलाची उद्या बदनामी होईल अशी भिती वाटून त्यानं तिची परस्पर भेट घेतली व विचारलं की तिनं आपल्या वडीलाशी विवाह करुन टाकावा.

भिष्माचा तो प्रस्ताव. सत्यवती विचार करीत होती की आपण विवाह केला तरी तो विवाह आपल्या फायद्याचा नाही. कारण उद्या आपल्याला या शांतनूपासून पुत्र जरी झाला तरी तो पुत्र गादीवर बसणार नाही. कारण शांतनूचा मोठा पुत्र भिष्म जीवंत आहे आणि राजगादीचा मान मोठ्याच पुत्राला मिळत असतो.

गादीच्या वारसाचा असलेला प्रश्न. असा प्रश्न विचारात घेत सत्यवतीनं तो विचार भिष्माजवळ बोलून दाखवला. तसा विचार बोलल्यावर शेवटी ती म्हणाली,

'जर भिष्म ती वारसाची जागा सोडून देत असल्यास वा तसं केल्यास ती शांतनूशी विवाह करेल. त्यासाठी भिष्मानं तशी प्रतिज्ञा करायला हवी. तसं वचन द्यायला हवं.'

भिष्मानं सत्यवतीचं गादीबाबतचं वक्तव्य ऐकलं. तसा त्यानं विचार केला. तो विचार होता शांतनूनं केलेला त्याग. भिष्माला वाटत होतं की त्याच्या पित्यानं त्याचेसाठी बराच त्याग केलेला आहे. त्यामुळंच आता आपलं कर्तव्य आहे की आपण आपल्या पित्यासाठी त्याग करावा.

विचारांचा अवकाश. शांतनूशी सत्यवतीनं तो विवाह करावा असं ठरलं. परंतू त्यातही ती अट होती. त्या अटीनुसार भिष्माला वाटत होतं की तिनं शांतनूशी विवाह करावा म्हणून तो प्रतिज्ञेसाठी तयार झाला होता.

ती उपकाराची परतफेड. तो उपकाराचा विषय लक्षात घेता भिष्म परमार्थ पद्धतीनं तयार झाला होता आपल्या वडीलासाठी. त्यालाही वाटत होतं की आपल्या वडीलांनी सांसरीक जीवन जगावं. परंतू त्याच्या जीवनाचं काय? त्यानं तर ती आयुष्यभर विवाह न करण्याची प्रतिज्ञाच घेतली होती आपल्या वडीलाचं सांसरीक जीवन बसविण्यासाठी. तो पहिला पुरुष होता

की ज्यानं आपल्या वडीलाच्या सांसरीक इच्छेसाठी आपल्या ललनेचा त्याग केला होता.

सत्यवतीचा तो आग्रह. माझाच पुत्र गादीवर बसावा ही तिची इच्छा. त्यामुळंच तिनं भिष्माला प्रतिज्ञाच घ्यायला लावली होती. तो तिचा स्वार्थ होता. त्याच सर्वार्थानं जणू वचनबद्धच केलं त्यांना. शेवटी सखोल विचार करुन भिष्म अंतिम निर्णयाप्रति पोहोचला आणि सत्यवतीला म्हणाला.

"ठीक आहे. मी प्रतिज्ञाबद्ध होतो. मी प्रतिज्ञा घेतो की आजपासून मी माझ्या आयुष्यात कधीही विवाह करणार नाही आणि विवाह करण्याचा विचारही मनात आणणार नाही."

ती भिष्माची प्रतिज्ञा. ती प्रतिज्ञाच जणू भिष्मानं केलेली. तिलाच भिष्मप्रतिज्ञा म्हणतात. तद्नंतर भिष्मानं प्रतिज्ञा करताच सत्यवती शांतनूसोबत विवाह करण्यासाठी तयार झाली. ही गोष्ट जेव्हा शांतनूला माहीत झाली. तेव्हा त्याला अतिशय वाईट वाटलं. त्याचं मन हरहळत होतं. परंतू आता उपाय नव्हता. आता तर ती वेळ निघून गेली होती.

सर्व राजे राजवाड्यांना ही गोष्ट माहीत झाली होती. तेव्हा तेही हरहळत होते. तशी ती गोष्ट व्यासांना माहीत झाली. त्याचबरोबर व्यास सत्यवतीजवळ आले व म्हणाले,

"माता, हे तू काय केलंस. आपल्या स्वार्थासाठी आणि सुखासाठी बिचाऱ्या भिष्माचं मन व्यथीत केलंस. माते, याचे गंभीर परिणाम तुलाच नाही तर संपूर्ण हस्तीनापुरला भोगावेच लागतील."

व्यास पुन्हा तपश्चर्येला निघून गेला होता. त्यानंतर मोठ्या थाटामाटात सत्यवती व शांतनूचा विवाहसोहळा पार पडला. त्यातच ते दोघंही सांसरीक मोहमायेत रमली. त्यानंतर त्या दोघांना दोन अपत्य झाली. पहिला म्हणजे चित्रागंद व दुसरा म्हणजे विचीत्रविर्य. चित्रागंद मोठा होता व शूरही होता. विचीत्रविर्य हा पाहिजे त्या प्रमाणात शूर नव्हता. तसाच तो लहान होता.

अटीनुसार चित्रागंद हस्तीनापूरच्या राजगादीवर बसला. त्याला लवकर गंधर्वांनी युद्धामध्ये ठार केलं त्याला. त्यानंतर अटीनुसार विचीत्रविर्य राजगादीवर आला. परंतू तो कमजोर आणि सशक्त नसल्यानं लवकरच आजारपणानं मरण पावला व तो मरण पावताच सत्यवतीच्या वंशवाढीच्या आशा संपुष्टात आल्या. तिला काय करावं सुचेनासं झालं होतं.

शांतनूशी विवाह करताच सत्यवती सर्वेसर्वा बनली होती. शांतनू राजा असल्यानं ती महाराणी बनली होती. शांतनू व शांतनूचे दोन्ही पुत्र आज जीवंत नव्हते. शिवाय राजगादीला वारसही नव्हता. त्यामुळंच ती चिंतेत होती. तिला काय करावं सुचत नव्हतं. अशातच ती वारसाचा विचार करायची. कारण तिनंही भिष्माकडून राजगादीवरील वारसाबाबत शपथ

घेतली होती की ती हस्तीनापुरातील राजगादी तिच्या मुलालाच हवी. दुसरा कोणीही त्या राजगादीवर बसायला नको. यासाठीच तिनं भिष्माकडून वचन घेतलं होतं की त्यानं कधीच विवाह करु नये. तिला वाटत होतं की समजा भिष्मानं विवाह केलाच आणि त्याला जर मुलं झालीच तर त्यानं जरी राजगादी नाकारली असली तरी आपल्या पित्यावर झालेला अन्याय त्याचे वारस सहन करु शकणार नाहीत व ते राजे बनतील. त्यापेक्षा भिष्मानं जर विवाहच केला नाही तर त्याला पुत्रच होणार नाहीत व राजगादीचा प्रश्न आपोआपच मिटेल.

तो स्वार्थ.......तोच स्वार्थ होता तिचा. परंतू नियती ते सर्व ऐकत होती. त्या नियतीला कळत होतं की आता काय करायला हवं. त्या नियतीनंच भिष्म पराक्रमी असून त्याला राजगादीवर बसता न आल्यानं व सत्यवतीनं राजगादीसाठी चाल खेळली असल्यानं तिचे दोन्ही मुलं जीवंत ठेवले नाहीत. आता हस्तीनापुरातील वंश बुडणार असं लक्षात येताच सत्यवतीसमोर प्रश्न उभा ठाकला. वंशाला वारस कोण देणार? आपल्या रक्ताचा असा व्यक्ती कोण? विचार करता करता तिच्यासमोर भिष्माचं रुप तराळलं. कदाचीत भिष्मच आपल्या राज्याला वंशाचा वारस देवू शकतो. आपण त्याला विनंती करावी. विनंती करावी की त्यानं आपली प्रतिज्ञा

मोडावी व वंश वाढवावा. वंश वाढविण्यासाठी त्यानं विवाह करावा. तसा तो विवाह करुन त्यानं वंशाला वारस द्यावा.

विचारांचा अवकाश. आज तिच्या डोक्यात प्रश्नांचे काहूर माजले होते. प्रश्न मोठा गंभीर होता. वंशाच्या वारसाचा प्रश्न. सत्यवती हारली होती. तिचे वंशाचे वारस संपले होते. काय करावं सुचत नव्हतं. अशातच तिला भिष्म आठवताच ती भिष्माच्या कमऱ्यात गेली. तसा भिष्म आपल्या कक्षात आपल्या बाणांना धार लावत बसला होता. अचानक त्याची नजर तिच्यावर पडली. तसा तो आश्चर्यचकीत झाला. विचार आला की आज आणि आता अचानक आपली आई इथं कशी? पुर्वी ती आपल्याला बोलावून घ्यायची किंवा महत्वाचं काम असल्यास निरोप पाठवायची. परंतू आज.......आज ती स्वयं हजर आहे आपल्यासमोर. त्याचा विश्वासच बसत नव्हता तिच्यावर. तसा तो आश्चर्यचकीत होताच व त्याला प्रश्न पडताच तो म्हणाला,

"माते, इकडं कशी काय? काय काम आलं एवढं महत्वाचं. मलाच बोलावून घ्यायचं होतं. मीच आलो असतो तिकडं."

सत्यवतीनं ते भिष्माचे बोल ऐकले. तशी ती म्हणाली,

"नाही भिष्मा, काही काही गोष्टीत बाळाला त्रास द्यायचा नसतोच. एक प्रयोजनही होतं, म्हणून आलेय मी."

"बरं माते, कशासाठी आलीय?"

"भिष्मा, मी कसं सांगू. परंतू मला सांगावंच लागेल."

"बोल माते, अगदी निःसंकोच होवून बोल. मलाही कळू दे तुझ्या मनातील प्रयोजन. सांगीतल्यानं प्रश्नावर उत्तर सापडतं. काही शंका आहे का माझ्याविषयी?"

"नाही, शंका तर नाही. परंतू एक मनोधैर्य आहे. बोल, रागावणार नसशील तर सांगते."

"माते, आईसमोर पुत्र लहानच असतो. तो कसा रागावेल माते?"

"तर मग निधड्या छातीनं ऐक."

"बोल माते."

भिष्म उत्तरला. तशी ती सांगू लागली आपल्या गोष्टी व तो कान टवकारुन ऐकत होता त्या गोष्टी. ज्या गोष्टी सत्यवती सांगू लागली होती.

"भिष्मा, माझं प्रयोजन आहे की तू विवाह करावास. मी तुझ्यासाठी विवाहाचा प्रस्ताव घेवून आलीय. मला माहीत आहे की तू हो म्हणणार नाहीस. कदाचीत माझं चुकलं. परंतू माझं चुकलंही असेल कदाचीत. कदाचीत तुला माझा रागही येईल. परंतू भिष्मा, याघडीला मी बरोबर आहे. आपल्या राज्याला वारस हवा आहे. मी वारस देवू शकत नाही आणि तुझे

भाऊही वारस देवू शकत नाहीत. कारण ते आज जीवंत नाहीत. ते जर जीवंत असते तर मी कदाचीत तुझ्याकडेही आलीच नसती."

सत्यवतीचं ते बोलणं भिष्म ऐकत होता. तसा तो म्हणाला,

"माते, तू म्हणतेस ते बरोबर आहे. परंतू आता ते शक्य नाही. मी वचनबद्ध आहे या घडीला. मी जर हे वचन मोडलं ना, तर उद्या समस्त संसार कोणतेच वचन पाळणार नाही. कोणीच व्यक्ती मग वचनावर विश्वास ठेवणार नाही. मग साऱ्याच समस्या निर्माण होतील."

"परंतू भिष्मा, गादीला वारस? त्या वारसाचं काय? कोण वारस देईल आपल्या हस्तीनापुरला. असा वारस देणारा आपल्या कुळाचा तुझ्याशिवाय तरी मला कोणीच दिसत नाही. मी काय करु भिष्मा. माझ्यासमोर कोणताच मार्ग नाही. कोणतेच विचारही मला सुचत नाहीत. त्यासाठीच भिष्मा, ही माझी शेवटली आज्ञा ऐक."

ती सत्यवती. त्या सत्यवतीचे ते शब्द काळजाला बाण टोचणारे होते. तिला वाटत होतं की ती सत्यवती जणू तलवार घेवून आपल्या मानेवर चालवत आहे. ती बोलत होती व तो गुपचूप ऐकत होता. शेवटी न राहवून तो म्हणाला,

"माते, पुरे आता. मी विवश आहे. हवं तर मला माफ कर. परंतू मी राजगादीला वारस देण्यासाठी आपली प्रतिज्ञा मोडू शकत नाही. माते,

आजपर्यंत तरी मी तुला अंतर दिलं नाही. तुझ्या आज्ञा पाळतच आलोय. मला स्विकार नसतांना मी केवळ राजगादीला वारस मिळावा म्हणून विचीत्रविर्यसाठी त्या अंबा, अंबिका व अंबालिकेच्या स्वयंवरात भाग घेतला. तो प्रसंग मी माझ्यावर स्वतः ओढवून घेतला. माहीत आहे माते.

माते, तुझ्याच म्हणण्यानुसार मी शक्तीशाली नसलेल्या विचीत्रविर्यसाठी स्वयंवर भेदून आणल्या, मी काशी नरेशच्या तीनही मुलींना. तो प्रसंग आजही आठवतो मला. मी किती व्यथीत केलं त्या तिघींना. माते, त्यातील अंबा तर शाल्ववर प्रेम करीत होती. तिची काय दशा झाली म्हणून सांगतो. जेव्हा मी ते स्वयंवर भेदण्यासाठी गेलो ना आणि त्या तिघींना सर्वांशी लढून जिंकलो. परंतू तो शाल्व काही पराभव स्विकारीत नव्हता. तेव्हा तीच अंबा आडवी आली आणि म्हणाली की जावू द्या. माझ्यासाठी सोडून द्या. त्यातील त्या अंबेनं स्वतःच्या प्रेमाचा त्याग केला आणि ती इथं जेव्हा आली, तेव्हा विचीत्रविर्य काय म्हणाला, हे तुझ्यासह सर्व दरबारीगण जाणतातच. तो म्हणाला की मी कोणावर प्रेम करीत असलेल्या मुलीशी विवाह करणार नाही. त्यानंतर मी तिला तिचा प्रेमी शाल्वकडे पाठवलं, त्यावेळेस शाल्व म्हणाला की ज्या मुलीमुळं माझा अपमान झाला. ज्या स्त्रीच्या स्वयंवरात माझा पराजय झाला. त्या मुलीशी मी विवाह कसा करु? आता मला सांग, त्या बिचाऱ्या अंबेचा यात दोष

काय? तुझ्या मुलाला माहीत होते ना की मी त्याचेचसाठी स्वयंवरात भाग घेवून त्या तिघींना आणलं आहे स्वयंवरातून. तरीही त्यानं तिचा स्विकार न करणं व मी दुसऱ्यावर प्रेम करणाऱ्या मुलीशी विवाह करीत नाही म्हणणं शोभा देण्यासारखी गोष्ट तरी आहे का? माते, तुला हे संयुक्तीक वाटते का? माहीत आहे माते, शाल्वकडून ती जेव्हा माझेकडे आली. तेव्हा ती मलाच तिच्याशी विवाह करावा असं म्हणू लागली. परंतू मी वचनबद्ध असल्यानं तिच्याशी विवाह केला नाही. यात माझा काहीच दोष नव्हता. दोष तुझाच होता माते. कारण तूच मला वचनबद्ध केलं होतं. आज राज्याला वारस नाही म्हणून तुला चिंता वाटते. परंतू तू काय केलंस राज्याच्या वारसासाठी. ते तरी आठव माते. आज राज्याला वारस नाही म्हणून तू माझ्याच वचनाचा बळी देवून मला विवाह करायला लावत आहेस व मला वचन तोड म्हणत आहेस. परंतू हे लक्षात घे. मी कधीच वचन तोडणार नाही. माहीत आहे त्या त्या अंबेच्या रुपानं मला मिळालेली शापवाणी. ती शापवाणी अजूनही आठवते मला. मी जेव्हा तिला मी वचनबद्ध असल्याचं सांगीतलं ना आणि विवाह करु शकत नाही हेही जेव्हा सांगीतलं. तेव्हा ती रडत बसली. तिचे डोळेही सुजले. तरीही माझ्यावर काही परिणाम होत नाही आहे हे जेव्हा अंबेनं पाहिलं, तेव्हा ती रागाच्या भरात येथून निघाली. त्यानंतर माझ्याशी बदला घेण्यासाठी ती अनेक राजांना जावून भेटली. परंतू अनेक राजांच्या

कानावर माझ्या पराक्रमाच्या चर्चा आहेत. त्यांनी तिला नकारच दिला. कारण ते माझ्याशी युद्ध करायला घाबरतात. शेवटी ती कार्तिकेय कडे गेली.

भगवान कार्तिकेयनं तिच्यावर प्रसन्न होवून तिला एक कमळाच्या फुलाचा हार दिला. जो हार सदैव ताजाच राहात होता. त्यानंतर तिला म्हटलं,

"अंबा, तू हा हार ज्याही कोणाच्या गळयात टाकशील, तो राजा भिष्माचा विनाश करेल वा विनाशाचे कारण बनेल."

अंबा ती हार घेताच अतिशय आनंदीत झाली. कारण तिच्या मनामध्ये माझ्याविषयी बदल्याची भावना होती. ती भावना त्या माळेच्या रुपानं पुर्ण होणार होती. तिला वाटत होतं की मी हा हार ज्याही कोणाच्या गळयात टाकेल. तो भिष्माच्या मृत्यूचे कारण बनेल वा त्याला यमसदनी पाठवेल. त्यानंतर ती तो हार घेवून पुन्हा बरीच फिरली. परंतू कोणीच तिची ना आपबीती ऐकत होते. ना तिला मदत करीत होते. कारण त्यांना माझ्याशी युद्ध करायला भीती वाटत होती. शेवटी ती राजा ध्रृपदच्या दरबारात गेली. तसं राजा ध्रृपदनंही तिची गोष्ट ऐकली नाही. त्यामुळंच शेवटी ती निराश होवून तेथून निघाली व तिनं तो हार त्याच ध्रृपद राजाच्या महालातील मुख्य दरवाजावर लटकवला.

सर्व राजे रजवाडे अंबेचे फिरुन झाले होते. शेवटी ती निराश झाली व तेथून निघाली. त्यानंतर ती भगवान परशुरामजवळ गेली.

भगवान परशुराम.......त्यांना हिंदू धर्म ग्रंथानुसार भगवानाचा दर्जा दिलेला आहे. तसंच त्याला विष्णूचा अवतार मानल्या गेलं आहे. त्याचं मुळ नाव राम होतं. परंतू एका प्रसंगी भगवान शिवानं त्यांना परशू दिल्यानं त्यांचं नाव परशूराम ठेवण्यात आलं. तो प्रसंग होता तपश्चर्येचा. म्हणतात की पृथ्वीवर मोठ्या प्रमाणात क्षत्रीयांचा अन्याय अत्याचार माजला होता. त्यामुळं भगवान परशुराम यांनी शिवाची आराधना केली. कारण त्यांना संपुर्ण पृथ्वीला निःक्षत्रीय करायचे होते. त्याच रुपानं भगवान शिवानं प्रसन्न होवून पृथ्वी निःक्षत्रीय करण्यासाठीच परशू प्रदान केले.

परशुराम हे एका ब्राह्मण ऋषीच्या घरी जन्मले. त्यांना विष्णूचा सहावा अवतार संबोधतात. महर्षी भृगूचा नातू जमदग्नी यांचेवर देवराज इंद्र प्रसन्न होवून त्यानं वरदान स्वरुप जमदग्नीनं पुत्रकामेष्टी यज्ञ करताच हा मुलगा दिला असं मानलं जातं.

भगवान परशुरामाचे प्राथमिक शिक्षण विश्वामित्र कडून झाले. त्याचबरोबर त्यांना ऋचीक व कश्यपाकडून वैष्णव मंत्र प्राप्त झाले. त्याच ज्ञानाचा वापर करुन त्यानं कर्ण, भिष्म, द्रोण यांना विद्या दिली. त्यानंतर कर्णाला शाप सुद्धा दिला की त्याची विद्या ऐनवेळेस त्याच्या कामात येणार

नाही. त्यांनी नारी जागृती अभियानाचं संचलन केलं. त्यांनी पृथ्वीला एकवीस वेळेस निःक्षत्रीय केले.

त्यांनी वैदिक संस्कृतीच्या प्रसाराचं कार्य केलं. मानलं जातं की गावाची सुरुवात त्यांनीच केलेली असून अधिकतर गाव त्यांनीच वसवली आहेत. तसंच असंही मानलं जातं की त्यांनी गावं वसविण्यासाठी गुजरातमध्ये समुद्रतटावर बाण मारुन त्या समुद्राला केरळपर्यंत ढकलून तिथं भुमी निर्माण केली. त्यांनी आपल्या मातापित्यांचा सन्मान केला तसाच गुरुजनांचाही केला. त्यांना पशुपक्षांचीही भाषा येत होती. त्याचेच कारण की काय, हिंस्र श्वापदं सुद्धा त्याचे मित्र बनत असत.

एकदा एक गंधर्व अप्सरासोबत फेरफटका करता करता तो गंगा तटावर आला. तिथं रेणूका उभी होती. ती त्यावर आसक्त झाली. त्यावेळेस ते दृश्य तिचा पती जमदग्नीनं पाहिलं. ते पाहताच त्यानं आपल्या सर्व मुलांना बोलावलं व आदेश दिला की त्यांनी माता रेणूकेचं शिरसंधान करावं. परंतू त्या सर्व पुत्रांनी त्यांचे पिता जमदग्नीचं काहीच ऐकलं नाही. परिणामस्वरुप त्यानं शेवटी परशुरामाला आदेश दिला व परशुरामनं आपल्या मातेसकट आपल्या भावाचंही शिरसंधान केलं. त्यावर जमदग्नी फारच खुष झाले व म्हणाले,

"मी तुझ्या कार्यावर फारच खुश आहे. काय मागायचे असेल ते मांग."

परशुरामनं ते ऐकलं. तसा तो म्हणाला,

"ठीक आहे. द्यायचेच असेल तर माझी माता व माझे बंधू जीवंत करुन द्या."

परशुरामाची अक्कलहुशारी. जमदग्नी समजले. त्यांनी तथास्तू म्हटलं व परिणामस्वरुप आपली माता व भावांना आपल्या पित्याकडून जिवंत करुन घेतलं.

परशुरामाच्या वडीलांना इंद्रानं कपिला नावाची एक गाय दान दिली होती. त्यातच भगवान दत्तात्रेयाला प्रसन्न करुन वर प्राप्त केलेला सहस्रार्जून फिरण्यासाठी निघाला असता तो जमदग्नी ऋषीच्या आश्रमात आला. त्याला कपिला आवडली व ती कामधेनू त्यानं बलपुर्वक सोबत नेली. ते पाहून परशुरामानं त्याचे शंभर हात कापून टाकले. त्याचा राग मनावर धरुन सहस्रार्जूनच्या मुलांनी परशुराम नसतांना त्याचे वडील तपश्चर्येत लीन असतांना त्यांची मान कापून टाकली. त्याचाच बदला घेण्यासाठी परशुरामनं महिष्मती नगरीवर हमला केला व आपला अधिकार जमवला. त्यातच त्यानं सहस्रार्जून वारसाच्या रक्तानं पाच सरोवर भरले व त्याच सहस्रार्जूनच्या मुलाच्या रक्तानं आपल्या पित्याचे श्राद्ध केले. त्यानंतर त्यांनी संपुर्ण पृथ्वी कश्यप ऋषींना दान दिली. त्यानंतर आपल्याजवळील सर्व आयुधं त्यानं

देवराज इंद्राला दान दिलेत व तो शेवटी महेंद्र पर्वत स्थित आश्रम बनवून राहू लागले.

परशुराम शक्तीशाली होते. त्याच्याबद्दलची एक कथा अशीही. एकदा भगवान गणेशांनी परशुरामाचा अंतःपूरातून प्रवेश रोकला. परिणामस्वरुप गणेशावर परशुरामनं प्रहार केला. तो प्रहार गणेशानं आपल्या दातावर झेलला. त्या वारात गणेशाचा एक दात अर्धा तुटला. तसंच ज्यावेळी रामानं शिवधनुष्य तोडला. त्यावेळेस पृथ्वी निःक्षत्रीय केलेल्या परशुरामला पुन्हा क्षत्रियांबद्दल चिंता वाटू लागली. तेव्हा विश्वामित्र व वसिष्ठ ऋषींनी पुढाकार घेऊन त्यांना समजवले असता ते समजले.

असे हे परशुराम. त्यांचा त्या काळात पराजय अटळ होता. ते शूर होते. त्याच शुरतेच्या जोरावर त्यांनी त्या काळात आपला दबदबा कायम ठेवला होता.

परशूराम........ त्यांनाही अंबानं आपली आपबीती सांगीतली. त्यावर त्यांना दया आली व त्यांनी मला ललकारलं. युद्धासाठी आव्हान दिलं. शेवटी आमच्यात तुंबळ युद्ध झालं. तेही वीर आणि मिही. मिही ब्रम्हचारी आणि तेही. कोणीच मागे हटेना. त्यावर पराभवाचा पत्ताच नाही. ते युद्ध तब्बल तेवीस दिवस चाललं. शेवटी परशुरामाला काही लोकांनी समजावलं व त्यांनीच हार मानून शेवटी ते अंबेला म्हणाले की तू मला माफ

कर. तू भिष्मालाच शरण जा. जेवढे प्रयत्न करायचे होते, तेवढे मी केले. परंतू मला ते जमले नाही. पुत्री, हवं तर मला माफ कर. परशुराम असे बोलून तेथून निघून गेले. परंतू अंबा काही केल्या आपल्या मनाला समजवू शकली नाही. तिच्या मनात आताही बदल्याची भावना होतीच. काय करावं सुचत नव्हतं. तसाच परशुरामानं भिष्माला शरण जा हा सांगीतलेला उपाय तिला पटला नाही. शेवटी ती हताश होवून पुन्हा नवा मार्ग शोधू लागली. ती हिमालयात गेली. तिथं ती भगवान शिवाची तपश्चर्या करु लागली. घोर तपस्या. त्यातच भगवान शिव तिच्या तपश्चर्येवर प्रसन्न झाले व म्हणाले की पुत्री, मी तुझ्या तपश्चर्येवर प्रसन्न झालो आहे आणि तुला एक वरदान देत आहे की तू पुढील जन्मात भिष्म मृत्यूला स्वयं कारणीभूत होशिल. त्यानंतर भगवान शिव अंतर्धान पावले.

भगवान शिव अंतर्धान पावताच तिनं हिमालयातच स्वतः स्वतःची चिता तयार केली व तिनं स्वतःला अग्नीच्या स्वाधीन केलं. माहीत आहे माते, अंबा या धरणीवरुन निघून गेली. परंतू ते पाप झालं माझ्या हातून. तेही तुझं ऐकून. ना मी तुझ्या मुलाच्या विवाहाला मुलगी मिळवून देण्यासाठी स्वयंवरात गेलो असतो ना मी अंबेला आणलं असतं. ना तिचं मन मोडलं असतं मी. ना तिला वन वन भटकावं लागलं असतं. ना तिच्यात बदल्याची भावना आली असती. ना तिनं मला कोसलं असतं. ना तिनं तपश्चर्या केली

असती. ना तिला वरदान मिळाले असते. सगळं तुझ्यामुळं घडलं आणि दोषी मीच ठरत गेलो. माहीत आहे, मी मृत्यूला घाबरत नाही. परंतू मला वाईट याचं वाटतं की माझ्याचमुळं अंबा अशी वणवण भटकत राहिली. माझ्याचमुळं तिला वणवण भटकावं लागलं. ते पाप झालं व त्या पापाचा दोषीही मीच ठरलो."

भिष्म बोलला. तसा सत्यवतीला तिच्या कृत्याचा पश्चाताप होत होता. कारण भिष्म काही विवाह करायला तयार नव्हता. तसंच आता तो तिचं ऐकायलाही तयार नव्हता.

*************************

धृतराष्ट्रचा जन्म. तो जन्मच मुळात अंधत्वातून झाला होता. तसा पंडूचा जन्मही पंगूपणातून झाला.

गादीचा वारस. गादीच्या वारसाचा प्रश्न ऐरणीवर होता. भिष्मानं तिच्यासमोर तिला दोष दिला होता व तो दोष देवून मोकळा झाला होता. तिचं चुकलं होतं. ती आता आपल्या कर्मावर पश्चाताप करीत होती. परंतू आता पश्चाताप करुन काही आता उपयोग नव्हता.

भिष्म तसा बोलून मोकळा झाल्यावर वारसाचा प्रश्न उपस्थीतच होता. तसं पाहता वारसाचा प्रश्न भिष्मानं सोडवला नसल्यानं तो प्रश्न तिच्याच समोर ठाण मारुन होता. तशी ती विचार करीतच होती. तिला काय करावं सुचत नव्हतं. अशातच तिला आठवलं की तिच्याच पोटचा एक पुत्र आहे. तोही रक्ताचाच आहे. फरक एवढाच आहे की तो भिष्माच्या वा हस्तीनापुरच्या रक्ताचा नाही तर तो तिच्या रक्ताचा आहे. त्याचं नाव व्यास. विचार करता करता व तिला व्यासाबद्दल माहीत होताच तिनं व्यासाला निमंत्रण पाठवलं.

व्यासाला निमंत्रण मिळताच व तसं माहीत होताच तो तातडीनं निरोप माहीती झाल्यावर हस्तीनापुरात आला. त्यानं तिला त्याला बोलावण्याचं प्रयोजन विचारलं. त्यावर ती म्हणाली,

"पुत्रा, मी तुला यासाठी बोलावलंय की मला हस्तीनापुरातील गादीला वारस हवा."

"त्यासाठी माझी कोणती गरज?" व्यास म्हणाला.

"तू नियोग विद्या जाणतोसच. त्या नियोग पद्धतीनं तू हस्तीनापुरला गादीचा वारस देवू शकतोस."

व्यासानं आपली आई सत्यवतीचं कथन ऐकलं. तसा तो म्हणाला,

"माते, ते कसं शक्य आहे. तुला माहीत आहे की त्या तुझा पुत्र विचीत्रविर्यच्या भार्या आहेत. त्या तुझं ऐकून माझ्याकडे येतील असं तुला वाटते काय! मला नाही वाटत."

ते व्यासाचं बोलणं. त्यावर सत्यवती म्हणाली,

"पुत्रा, मला हस्तीनापुरातील गादीला वारस हवा. मी काहीही करेल आणि त्या माझ्या पुत्राच्या म्हणजेच विचीत्रविर्यच्या भार्यांना तुझ्याकडे येण्यास बाध्य करेल. फक्त तू तसा वारस हस्तीनापुरला देण्यासाठी नकार देवू नकोस म्हणजे झालं."

"माते, तू जर तसा प्रयत्न करीत असशील आणि तुला व त्यांना किंतू परंतू नसेल तर मी तयार आहे हस्तीनापुरला वारस देण्यासाठी .परंतू एक अट आहे."

"अट! आणखी कोणती अट आहे?"

"माझ्या मतानुसार तू भिष्माला विवाह करण्यास का नाही सांगत. तो हस्तीनापुरातील वंशाचा आहे. तो वारस देण्यास सक्षमही आहे. तू त्याचा विचार का नाही करत?"

"विचारले. मी त्यालाही विचारले. परंतू?"

"परंतू काय माते?"

"तो तयार नाही आपली शपथ मोडण्यास. तो म्हणतोय की मी प्रतिज्ञाबद्ध आहे. मी प्रतिज्ञा मोडण्यास तयार नाही."

"असं का."

"होय. म्हणूनच तुला बोलावलंय मी."

"असं जर आहे तर मी तयार आहे माते. तू फक्त तुझ्या पुत्रवधूंना तयार कर म्हणजे झालं." व्यास सत्यवतीला म्हणून गेले.

व्यास सत्यवतीला म्हणून गेले खरे. परंतू तिचा प्रश्न मिटला नव्हता. तिचा प्रश्न अजूनही तेवतच होता. ज्योतीप्रमाणे. व्यास तर तिला हस्तीनापुरासाठी वंशाचे दिवे द्यायला तयार झाला होता. परंतू त्यासाठी तिला तिच्या पुत्रवधूंना त्याच्याकडे जाण्यासाठी तयार करायचे होते. ती अतिशय कठीण बाब होती. त्यामुळं तिच्या मनात प्रश्न प्रतिबिंबीत होता की त्या पुत्रवधू व्यासाकडे जाण्यास तयार होतील का?

ती सायंकाळची वेळ होती. बाहेर गार वारा सुटला होता. ती विचार करीत होती वंशाबद्दलचा. व्यास हस्तीनापुरातील महालातच स्थायीक होता. तो निर्णयाची वाट पाहात होता सत्यवतीच्या. त्याला वाटत होते की सत्यवती तयार करील आपल्या पुत्रवधूना व त्या पुत्रवधू वंशाच्या दिव्यासाठी नाही तर हस्तीनापुरातील गादीच्या वारसासाठी माझ्याकडे

येतील. त्यासाठीच तो हस्तीनापुरात होता. तशीच ती त्याची आई सत्यवतीची आज्ञाही होती.

बाहेर थंड वारा सुटला होता. तसे सत्यवतीच्या मनात विचारांचे तरंग उठले होते. त्या विचारांनी तिच्या मनात वाद घातला होता. तशी वाऱ्याची एक शीत झुळूक आली. तिच्या मनाला स्पर्शून गेली. तसा तिच्या स्वप्नात शांतनू आला. म्हणाला,

"झालं का वारसाचं काम? मिळाला का गादीला वारस?"

"नाही." तिनं सहज म्हटलं. त्याचबरोबर तो क्षणार्धात अंतर्धान पावला. तशी ती भानावर आली. तसं तिनं ठरवलं की आता आपण आपल्या मनातील विचार आपल्या पुत्रवधूंना सांगावे. जेणेकरुन त्या तयार होतील.

ती बाहेरची गार हवा. ती थंड वाऱ्याची झुळूक. ती झुळूक तिच्या मनाला सारखी खुणावत होती. सांगत होती की ते गादीच्या वारसाचे विचार तिनं आपल्या पुत्रवधूंना सांगावे व त्यांना तयार करावं. तसं तिनं मनात ठरवलेला बेत अंमलात आणायचे ठरवले. आज याच सुटलेल्या थंड वाऱ्याचा तिनं फायदा घ्यायचे ठरवले. तोच उपयोग होणार होता तिला.

सत्यवती परसबागेत बसली होती. तो तिचा वंशाच्या दिव्याचा विचार. तो हस्तीनापूरच्या गादीच्या वारसाचा विचार तिला येताच तिनं

आपल्या दोन्ही पुत्रवधूला शिपायाकरवी बोलावणे पाठवले. तसा शिपाही मोठी पुत्रवधू अंबिकाच्या महालात गेला. म्हणाला,

"महाराणीसाहेब, आपल्याला मोठ्या महाराणी सरकारनं बोलावलंय."

ते शिपायाचं बोलणं. विचीत्रविर्य ज्या दिवसापासून मरण पावला होता. त्या दिवसापासूनच संपूर्ण हस्तीनापुरात शोककळा पसरली होती. कधीच सत्यवतीनं असं पुत्रवधूला बोलावलं नव्हतं. तसं पाहता ती सतत उदासच राहायची. तसं अंबिकेला सत्यवतीचं बोलावणं येताच ती आश्चर्यचकीत झाली. तशी म्हणाली,

"काय काम आहे?"

"महाराणीसाहेब, माफ करा. परंतू मला असं राणीसरकारनं काहीच सांगीतलं नाही."

"ठीक आहे. येत आहे असं सांग."

"ठीक आहे महाराणीसाहेब."

तो म्हणाला व तो तसा निघून गेला.

शिपाही त्यानंतर लहान महाराणीकडे गेला. त्यानं तिच्या कक्षात तिच्या दासीकरवी निरोप पाठवला. ती दासी आत प्रवेशली. तसं तिनं आपल्या महाराणीला उठवलं व सुचना दिली

"मोठ्या महाराणी सरकारकडून निरोप आलाय. शिपाही आला महाराणी सरकारकडून. बोलवू का आत."

"बोलव, बोलव आत."

दासीनं तसा निरोप देताच दासी तेथून निघून गेली. तसा शिपाही आत आला. म्हणाला,

"महाराणीसाहेब, आपल्याला मोठ्या राणीसरकारनं बोलवलंय."

तो निरोप. तसं तिनंही विचारलं,

"कोणतं काम पडलं राणीसरकारांना?"

"माहीती नाही."

"ठीक आहे, येते असं सांग."

तो शिपाही निरोप देवून निघून गेला. लहान राणी झोपेतून जागी होताच तिनं निरोप ऐकला. ती लहान महाराणी अंबरिका आपल्या राजवाड्यात विश्रामच करीत होती. तसा शिपाही निघून जाताच ती पुन्हा झोपली. कारण तिच्यावर झोप आरुढ झाली होती.

शिपाही जाताच काही वेळानं मोठी महाराणी अंबिका सत्यवतीसमोर हजर झाली. ती म्हणाली,

"कशाला बोलावलंय राणी सरकार?"

"एक महत्वपूर्ण काम आहे."

"कोणतं काम आहे आईसाहेब?"

"तुला मी कसं सांगू. तसं पाहता मी तुलाच बोलावलंय. कारण तूच या राज्यात अशी आहेस की जी समजदार आहे. समजून घेणारी आहेस. म्हणून तुला सांगायची हिंमत केली."

"मग बोला ना आईसाहेब. अगदी निःसंकोच बोला."

"तुला कदाचीत वाईट तर वाटणार नाही. राग तर येणार नाही ना तुला."

"नाही येणार. बोला. अगदी नि:संकोच बोला."

"ठीक आहे, तर मग ऐक."

असे म्हणत सत्यवती तिला सांगू लागली. तसं तिनं आधीच म्हटलं होतं की मधात व्यत्यय आणायचा नाही. अर्थात बोलायचं नाही.

"तुला माहीत आहे अंबिका की तुझे पती अकाली मृत्यूला प्राप्त झाले. यात व्यक्तीचा दोष नाही. दोष आहे नियतीचा. खरं तर नियतीच त्यात दोषी. या नियतीनंच घेतलेय दोन बळी.

तुला आणखी माहीत असेलच की महाराज शांतनूला दोन मुलं. चित्रागंद आणि विचीत्रविर्य. त्यापैकी चित्रागंदला गंधर्वानं मारलं आणि विचीत्रविर्यला आजारानं. त्यातच तुला माहीतच असेल की भिष्मानंही

प्रतिज्ञा घेतलीय की तो कधीच विवाह करणार नाही. म्हणूनच प्रश्न निर्माण झालाय."

"कोणता प्रश्न राणीसरकार?"

"प्रश्न वारसाचा निर्माण झालाय. राज्याला वारस नाही. हस्तीनापुरला वारस हवाय. तेव्हा विचार येतोय."

"कसला विचार? जरा आम्हालाही सांगा. आम्हीही तुम्हाला मदत करण्याचा प्रयत्न करु."

"तुम्ही काय मदत करणार मला. परंतू मी त्यासाठीच बोलावलंय तुला. काय करावं याचा मार्ग विचारायला. बोल सांगते ना मार्ग."

"मला नाही सांगता येणार मार्ग. वाटल्यास तुम्ही सांगा मार्ग. आम्हाला आदेश द्या. तुम्ही सांगाल ते कष्ट घ्यायला तयार आहोत आम्ही. आपण फक्त आज्ञा करा."

"आज्ञा.......आज्ञेवरुन कळलं. परंतू तो मार्ग खडतर आहे आणि तुम्हाला आवडणाराही नाही."

"म्हणजे? राणीसरकार, तुम्ही सांगून तर पाहा. तुम्ही म्हणाल तर ही मानही कापून देवू तुम्हाला."

"विचार कर. विचार कर. चांगला विचार कर. असा उतावीळपणानं निर्णय घेवू नकोस."

अंबिका क्षणभर थांबली. त्यानंतर ती बोलकी झाली.

"विचार केलाय आईसाहेब. मी नीट विचार केला. आता आपण आज्ञाच करावी थेट. आपल्या आज्ञेचं पालन होईल."

"ठीक आहे तर मग ऐेक. आपल्याला वंश चालवायचाय. भिष्म प्रतिज्ञाबद्ध आहे. तो विवाह करु शकत नाही आणि पुत्र जन्माला घालून वंश चालवू शकत नाही. हे तुला माहीत आहे. तसेच तुझा पतीही हयात नाही आता. तेव्हा तू एक लक्षात घे. तुला नियोग पद्धतीनं पुत्र जन्माला घालावे लागतील."

अंबिका थोडावेळ थांबली. तिला थोडंसं वाईटही वाटलं. आईसाहेब भलतीच गोष्ट बोलत असल्याचं तिच्या लक्षात आलं. तसा ती विचार करु लागली. जर हिची मुलगी असती तर.......तर ह्या आईसाहेबानं तिच्या पोटातून नियोग पद्धतीनं पुत्र जन्माला घालू दिली असती का? यात तिच्या इच्छेला स्थान दिलं गेलं असतं की नाही.

ती विचारच करीत होती. तसे तिच्या कानावर शब्द पडले.

"काय झालं अंबिका. तू अशी गप्प का?"

आईसाहेबाचा प्रश्न. तशी ती म्हणाली,

"आईसाहेब, मला नियोग म्हणजे काय ते नीट समजलेलं नाही."

"अगं तू वेडी आहे का? निरोगचा अर्थ तुला कळत नाही. जरा खुलवून सांगावं लागेल का?"

"होय आईसाहेब. जरा खुलवून सांगा. मला अर्थ कळलेला नाही."

"तर मग ऐक. अगं नियोग याचा अर्थ दुसऱ्याच्या पोटचं लेकरु जन्मास घालणे."

"म्हणजे? हस्तीनापुरातील गादीला वारस मिळावा म्हणून आम्ही दुसऱ्यासोबत सहवास करायचा."

"होय. अगदी तसंच. अगं आपल्याला गादीला वारस हवा. हस्तीनापुरातील गादीला. तुला असं नाही वाटत की तुझा वंश चालावा? तुझा पुत्र गादीवर बसावा? त्यानं राज्य करावं?"

"छट् आईसाहेब, मला कल्पनाही सहन होत नाही. असं जर करायचं असेल तर मला नको पुत्र आणि मला नको गादीला वारस."

"वेडी आहेस तू. तुला कळत नाही राजगादी काय असते ते. अगं माझ्याकडे बघ. मी गादीवर माझाच पुत्र बसावा म्हणून भिष्माकडून तसं वचन घेतलं. मी विचार केला होता की माझ्या मुलाव्यतिरीक्त इतर कोणाचाही मुलगा हस्तीनापुरातील राजगादीवर बसू नये. मी अगदी तसंच केलं. मी महाराज शांतनूकडून वचन तर घेतलं. व्यतिरिक्त भिष्माकडूनही वचन घेतलं. भिष्मानं तर प्रतिज्ञाच केली की तो कधीच विवाह करणार

नाही. आता सांग विवाहच नाही तर पुत्रप्राप्ती कुठून होणार. परंतू आता असं वाटतेय की त्यावेळी जरी माझं बरोबर असलं तरी आज ते बरोबर वाटत नाही. आज वाटतंय की जर भिष्म वचनबद्ध झालाच नसता वा मी त्याला वचनबद्ध केलंच नसतं तर आज त्याचा विवाह करता आला असता वंशासाठी. आज त्याचा विवाह झाला असता व हस्तीनापुरातील गादीला वारसही मिळाला असता."

परंतू त्यात आईसाहेब माझा काय दोष? अगं माझे पती अकाली मरण पावले, त्यातही माझा दोष नाही. मग मला अशी शिक्षा का बरं?"

"तुला शिक्षा नाही अंबिका, तूला फक्त वंशाला वारस द्यायचा आहे."

"म्हणून काय हे असले उटपटांग उपाय. मला सहन होत नाही आईसाहेब."

"म्हणूनच तर तुलाच बोलावलं आधी. तू समजदार आहेस. हे मी आधीच म्हटलंय. तूच समजू शकतेस माझं दुःख. तूच ओळखू शकतेस माझं मन आणि तूच ओळखू शकतेस माझी व्यथा. कल्पना कर की तू जर माझ्या जागेवर असती तर तू काय केलं असतं? विचार कर तू काय केलं असतं?"

अंबिका सत्यवतीचं ऐकत होती. तिला सत्यवती भावनाशिल बनवीत होती. तरीही ती काही ऐकत नव्हती. तसं ती ऐकत नाही हे पाहून शेवटी ती म्हणाली,

"जावू दे तुला याची गरज वाटत नाही तर. शेवटी मीच मुर्ख ठरले. जशी मलाच फार काळजी हस्तीनापुराची. तरीही आता माझा एक पाय डोहातच आहे. मी तसं पाहता किती दिवस जगणार! सर्व काही तुमच्यासाठीच करीत आहे ना. या हस्तीनापुरातील जनतेसाठी करीत आहे ना. तुला काहीच गरज वाटत नाही का याची. जावू दे, तुला गरज नाही वाटत तर. परंतू एक लक्षात घे. जर का तू या हस्तीनापुरला वारस देवू शकली नाही आणि मला तसं सांगीतलं नाही तर उद्या सकाळपर्यंत माझा मेलेला देह बघशिल म्हणून समज. जा आता. मुकाट्यानं जा." सत्यवती म्हणाली. तसं तिनं डोळ्यातून पाणी आणलं.

सत्यवतीचे ते अश्रू. तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्या जलधाराच होत्या. वाटत होतं की जशा जलधारा वाहू लागल्या आहेत. त्या अश्रुधारा अंबिका पाहात होती. तिला वाईट वाटत होते. त्या सत्यवतीच्या अश्रुधारा तिच्यानं पाहावल्या जात नव्हत्या. तशी ती सत्यवतीजवळ गेली. तिनं आपल्या पदराचा काठ घेतला व तिचे अश्रु पुसत ती म्हणाली,

"आईसाहेब, मी जर आपली स्वतःची मुलगी असती तर.....तर असंच करायला लावलं असतं का मला?"

तो प्रश्न. सत्यवती रडत असतांनाचा प्रश्न. तशी रडक्याच स्वरात सत्यवती म्हणाली,

"होय. तू माझी स्वतःची जरी मुलगी असती तरी मी अगदी तसंच करायला लावलं असतं."

"तर आईसाहेब ठीक आहे. मी तयार आहे नियोग पद्धतीला. केव्हा आणि कोणाकडे सहवास करायला जायचं. तेवढं सांगावं म्हणजे झालं. आता मी जाते. मला आज्ञा द्या."

"पुत्री, तूच माझी खरी पुत्रवधू शोभतेय. आजपासून लक्षात ठेव माझा शब्द. तूझाच मुलगा पुढं जावून राजा बनेल व अगदी शेवटपर्यंत या हस्तीनापुरच्या गादीवर असेल."

ते शब्द न् शब्द. सत्यवती बोलत होती. तशी हुंदके देत रडतही होती.

काही वेळाचा अवकाश. ती तयार होताच सत्यवतीला आनंद झाला. तशी तिला तिनं आज्ञा दिली. त्यानंतर अंबिका रवाना झाली.

अंबिका आपल्या महालात गेली होती. तशी सत्यवतीसोबत झालेल्या वार्तालापाची तिला आठवण झाली. क्षणातच तिला विचार आला व ती विचार करु लागली.

तिचा तो विचार. तो विचार रास्त होता. कारण स्त्री जात. स्त्री जात ही त्यावेळेसही गुलामच होती. तिला काहीही बोलता येत नव्हतं. पुरुषी संस्कृतीमुळे तिला स्वतः ती कितीही प्रगल्भ का असेना, हार मानावी लागत होती.

स्त्री जात. स्त्री जात मुळातच गुलाम नव्हती. परंतू तथाकथीत लोकांनी गुलाम केलं होतं स्त्रीला. स्त्रीवर बंधनं घातली होती. तिनं काय करावं व काय करु नये याचीही बंधनं होती तिच्यावर.

महाभारतातील अंबिका. अंबालिकांना झालेली बाळं. ती बाळं नियोग पद्धतीनं झाली होती. नियोग याचा अर्थ टेस्ट ट्युब बेबी. वर्तमानकाळात या पद्धतीला टेस्ट ट्युब बेबी देखील म्हणता येईल.

त्या अंबिका, अंबालिकेच्या टेस्ट ट्युब बेबीचा विचार करता त्या काळात त्यांचा पती जीवंत नसतांना त्यांना तशा पद्धतीनं बाळ जन्माला घालणं आवडलं असेल का? तर याचा अर्थ नाही असाच येईल. परंतू ज्या काळात तथाकथित लोकांनी त्यांचेवर बंधनं घातली. त्यानुसार त्या दोघींनाही चूपच बसावं लागलं आणि जबरदस्ती करुन त्यांना नियोग पद्धतीनं पुत्र प्राप्त करण्यास बाध्य केलं असेल ही गोष्ट नाकारता येत नाही. कारण त्यांचा पती हा जीवंतच नव्हता.

अंबिकाचा तो विचार. ती सत्यवतीला भेटल्यानंतर आपल्या राजमहालात परतली होती. तरी ती काही स्वस्थ नव्हती. तिला पदोपदी तोच विचार येत होता. काय करावं सुचत नव्हतं. जेव्हा रात्र झाली आणि सगळे अंथरुणावर झोपायला गेले. तिही गेली अंथरुणावर झोपायला. ती पहूडली

अंथरुणावर. तरीही तिला झोप येत नव्हती. ती सारखी कड फेरत होती व विचार करीत होती.

तिला वाटत होतं की का बरं स्रियांनीच कोणत्याही गोष्टी ऐकाव्या? का बरं तिनंच राज्याला वारस द्यावा अन् का बरं मनात इच्छा नसतांना गादीच्या वारसासाठी नियोग पद्धती वापरावी? सारेच प्रश्न तिच्यासमोर फेर धरुन नाचत होते. शिवाय असा नियोग करीत असतांना कोण असेल तो? तो सुंदर असेल की कुरुप असेल? वैगेरे प्रश्न तिच्यासमोर आ वासून उभे होते.

************************

सकाळ झाली होती. सत्यवती सकाळीच उठली होती. ती आनंदात होती. कारण आधीच्या दिवशी झालेल्या वार्तालापावरुन अंबिकानं हो म्हटल्यानं तिला माहीत झालं होतं की आपल्याला हस्तीनापुरातील राजगादीवर वारस मिळणार. तसं तिला आठवलं. आपण लहान महाराणीलाही निरोप पाठवला होता. ती आली नव्हती. तशी तिला आठवण येताच ती ताबडतोब लहान महाराणीच्या महालात गेली.

तो महाल. त्या महालात सत्यवती पोहोचताच तिनं अंबालिकेच्या दासींकरवी अंबालिकेला निरोप पाठवला. सांगीतलं की राणीसरकार आलं आहे भेटीला.

तो सत्यवतीचा निरोप. तो निरोप ऐकताच अंबालिकेला आश्चर्य वाटलं. तशी ती विचार करु लागली. विचार करु लागली की एवढ्या सकाळी सकाळी राणीसरकार माझ्या महालात आलंच कसं? तसा विचार करताच तिला आठवलं की राणीसरकारनं काल बोलावलं होतं. परंतू आपण गेलो नसल्यानं प्रत्यक्ष राणीसरकार भेटीला आलं.

ती सत्यवती. ती येताच अंबालिका चांगलीच घाबरली. तशी ती भेदरल्या अवस्थेत बाहेर आली. तशी म्हणाली,

"आईसाहेब, कशाला त्रास घेतलाय. मीच आले असते."

"नको नको, अगं मी आले तर काय झालं."

"कसं काय येणं केलं आईसाहेब? काही काम आहे का?"

"होतं आणि राहील. परंतू सध्या निपटलं."

"निपटलं म्हणजे ? कोणं केलं काम?"

"केलं नाही. परंतू करणार आहे."

"कोणतं काम आहे?"

"वेळ आल्यावर सांगेन."

"परंतू आईसाहेब, ते काम करायला कोण तयार झालं आहे?"

"अंबिका. अंबिका करणार आहे ते काम. परंतू ते तिला विचारशील नको. काहीही सांगायचं नाही तिला. काम हे गुप्त ठेवावं. राज्यात गवगवा नको त्या कामाचा. कामाचं सुतोवाच नको कोणाजवळ."

"आईसाहेब, परंतू असं कोणतं काम आहे की ज्याची गुप्तता पाळण्याची गरज आहे."

"मीच सांगेन. परंतू वेळ आल्यावर सांगेन. कारण फालतूच राज्याची बदनामी नको."

"ठीक आहे. जर ते काम बदनामीकारक असेल तर मिही कोणाला विचारणार नाही. मौन धारण करेल. अंबिकेलाही नाही."

"ठीक आहे. येते मी."

सत्यवतीनं आपले बोलणे बयाण केले. तशी ती तेथून निघाली. तिला आजच दुसरंही कार्य करायचं होतं. ते म्हणजे तिला आपला पुत्र व्यास, त्याची भेट घ्यायची होती. त्याला सांगायचं होतं नियोगाविषयी. सांगायचं होतं की अंबिका नियोग पद्धतीला तयार झाली.

सत्यवती रथावर बसली. तसं तिनं सारथ्याला म्हटलं.

"सारथी रथ घेवून व्यासाच्या कक्षाकडे चाल."

"ठीक आहे राणीसरकार." सारथी म्हणाला. तसा तो रथ हाकू लागला. थोड्याच वेळात व्यासाचा कक्ष आला. तशी ती उतरली. ती कक्षात गेली. तसा व्यास तिला दिसला. तो कक्षात बसला होता.

सत्यवती व्यासाचे कक्षात पोहोचली होती. तिला व्यासानं पाहिलं. तसं व्यासानंही तिला पाहिलं. तसा तो उभा झाला व म्हणाला,

"आईसाहेब, मीच आलो असतो. तू कशाला येणं केलं?"

"नाही पुत्रा. काही काही गोष्टी आपणच स्वतः करायच्या असतात. ठीक आहे. आता मी लक्षात ठेवेल आणि तुलाच बोलवेल."

"बरं, आता कसं काय येणं केलं?"

"तेच काम. ते काम पुर्ण झालं."

"म्हणजे त्या दोन्ही राण्या तयार झाल्या तर."

"नाही. एक तयार झाली. अंबिका तयार झाली. मी तिलाच सांगीतलं व तिला तयारही केलं. दुसरीला तयार केलं नाही. करील. परंतू जर आपलं काम जमणार नाही तर........."

"ठीक आहे आईसाहेब. मी तयार आहे. आज रातच्याला पाठवून दे नियोग उपचारासाठी. मी त्यासाठी तयारी करतो."

"ठीक आहे. येते मी. तू तयार राहा आणि निश्चींत राहा."

"ठीक आहे." तोही म्हणाला. तशी ती निघून गेली.

सत्यवती रथात बसली होती. सारथ्याला रथ हाकलायला लावलं होतं. तो रथ चालत होता. तशी त्या रथात बसलेली सत्यवती विचारात मग्न होती. ती आपल्या महालाकडे जात होती. तसं तिला आठवलं की चांगल्या कामाला विश्रांती कशाला? तसं आठवताच ती सारथ्याला म्हणाली,

"सारथी, आपला रथ अंबिकेच्या महालाकडे घेवून चल."

तो सत्यवतीचा आवाज. तसा तो आवाज ऐकताच सारथ्यानं जी राणीसरकार म्हणत आपला रथ वळवला व तो अंबिकेच्या महालाकडे जावू लागला. तसं क्षणातच तो महाल आला व सारथ्यानं आपला रथ थांबवला.

रथ थांबला होता. तशी सत्यवती रथाच्या बाहेर पडली. ती अंबिकेच्या महालात गेली. त्यानंतर तिनं दासीकरवी अंबिकेला निरोप पाठवला. तशी अंबिका बाहेर आली. ती सत्यवतीच्या पायावर नतमस्तक झाली व म्हणाली,

"आईसाहेब, मीच आले असते. कशाला आलात तुम्ही?"

"अंबिके, तू भविष्यातील हस्तीनापुरातील गादीला वारस देणारी महाराणी आहेस. तुला कशाला त्रास द्यायचा?"

अंबिका चूप बसली. तशी सत्यवती म्हणाली,

"अंबिका, मी तुला सांगायला आले आहे की तूला आज राणी शयनकक्षात तयार राहायचं आहे. मी अशा व्यक्तीला नियोगसाठी पाठवणार

आहे. जो उद्याला हस्तीनापुरातील राजगादीला वारस देवू शकतो. मात्र आता झाल्या गोष्टीला नकार देशील नको."

"ठीक आहे आईसाहेब. मी आज रातच्याला शयनकक्षात तयार असेल."

"बरं मी येते."

"बरं आईसाहेब." ती म्हणाली. तशी सत्यवती आपल्या महालाकडे निघून गेली होती.

**************************

रात्र झाली होती. रात्रीला शयनकक्ष तयार केला गेला होता व्यासासाठी. व्यासानं सांगितल्यानुसार सत्यवतीनं अंबिकेला शयनकक्ष तयार करण्याची सुचना दिली होती.

तो शयनकक्ष. त्या शयनकक्षात अंबिका बसली होती. तसा सूचनेनुसार व्यास अंबिकेच्या त्या शयनकक्षात प्रवेशला.

व्यास दिसायला सुंदर नव्हता. पाहायला तो अक्राळविक्राळ होता. उन्हातच लहानपणापासूनच तपश्चर्या केल्यानं त्याचा चेहराच काळवंडला होता. तसं पाहता त्याच्या अंगातून चिकट स्राव बाहेर निघायचा. ते पाहून

त्याच्या अंगाला मासोळीसारखा वास यायचा. शिवाय तो चेहरा पाहताच कोणालाही भीती वाटावी असाच त्याचा चेहरा होता.

अंबिकानं शयनकक्ष तयार केला होता. ती वाट पाहात होती तिथं कोणी येण्याची, जो वंशाला वारस देवू शकेल. तिनं मनात कल्पना केली होती की तो शयनकक्षात येणारा व्यक्ती सुंदर असेल. परंतू झालं उलटं. व्यास शयनकक्षात येताच अंबिकानं त्याला पाहिलं. त्याचा अक्राळविक्राळ व काळवंडलेला चेहरा अनुभवला. तसं त्याला पाहताच तिला भीती वाटली नाही. परंतू त्याचा चेहरा तिला पाहावासा वाटत नसल्यानं तिनं गच्च डोळे मिटून घेतले.

ती रात्र. ती संबंधीत रात्रच अंबिकानं डोळे मिटून घालवली होती. तिचं त्या अक्राळविक्राळ व काळवंडलेल्या चेहऱ्याकडं पाहण्याचं धाडस होत नव्हतं. त्यामुळंच की काय, घात झाला. आता रात्र सरली होती. तसा व्यास उठला व तो अंबिकाच्या शयनकक्षातून आपल्या कक्षात चालला गेला. तसं कुतूहल घडलं.

ते कुतूहल........ते कुतूहल काही सत्यवतीला स्वस्थ बसू देत नव्हतं. दुसरा दिवस उजाडताच ती ताबडतोब रात्रीचा समाचार विचारण्यासाठी व्यासाकडे गेली आणि विचारणा करु लागली. तसा व्यास म्हणाला,

"सगळं काही बरोबर झालं. विधीवतच झालं. परंतू घात झाला."

"घात! घात, कसला घात?"

"आईसाहेब, सगळं काही बरोबर झालं. परंतू नियोग पद्धती सुरु असतांना अंबिकानं डोळे गच्च लावले. त्यामुळं होणारी संतती ही बलवान तर होईल. परंतू आंधळी होईल यात शंका नाही."

"म्हणजे? राज्याचा वारस हा आंधळा. तो कसं राज्य चालवेल? नाही, नाही. आपल्याला डोळस वारस हवा. मी अंबालिकेला तयार करते. कदाचीत ती तरी डोळे उघडे ठेवून नियोग पद्धतीला प्रतिसाद देईल."

"ठीक आहे माते. तुला जसं वाटते तसं कर."

"येते मी."

"बरं."

सत्यवती तेथून निघाली. ती थेट अंबिकाच्या कक्षाकडे निघाली. तिला पाहताच ती म्हणाली,

"अंबिका, मला सगळं माहीत झालंय. काय केलंस तू. तू डोळे गच्च लावून नियोग केलाय. अगं याचा परिणाम माहीत आहे का तुला? अगं यापासून होणारी संतती ही आंधळी निपजेल आणि तुला माहीत नाही की आंधळा व्यक्ती राज्य कसं सांभाळू शकेल. आता यावर काही उपाय तरी आहे का?"

".........." अंबिका चूप होती. तशी सत्यवती तिलाच म्हणाली,

"एक काम कर. आता या नियोग पद्धतीसाठी तू तुझ्या बहिणीला म्हणजे अंबालिकेला तयार कर. माझ्यापेक्षा ती तुझंच जास्त ऐकू शकेल."

अंबिकेनं सत्यवतीचे ते बोलणे ऐकले. तशी ती म्हणाली.

"ठीक आहे आईसाहेब. मी सांगते अंबालिकेला."

"ठीक आहे. तू तिला तयार कर व पाठव उद्याच तिला शयनकक्षात. चांगल्या कामाला वेळ नको."

"बरं आईसाहेब."

"ठीक आहे, येते मी."

सत्यवती निघून गेली होती. तशी अंबिका काही वेळानं आपल्या बहिणीच्या कक्षात गेली. त्यानंतर तिला नियोग पद्धतीच्या व हस्तीनापुरातील राजगादीसाठी वारस का हवा याच्या गोष्टी सांगू लागली व तिला नियोग पद्धतीसाठी व हस्तीनापुरातील राजगादीवरील वारसासाठी तयार करु लागली.

"अंबालिका, आपल्याला वारस द्यायचा आहे हस्तीनापुरातील राजगादीसाठी. आईसाहेबांचं म्हणणं."

अंबालिकेनं ते अंबिकेचं बोलणं ऐकलं. तशी ती म्हणाली,

"आईसाहेब वेड्या आहेत की काय? आपला पती जीवंत नाही अन् आपला पती जीवंत नसतांना राजगादीसाठी आपल्याला वारस तरी कसा देता येईल बरं?"

"हो, तोच प्रश्न मलाही पडला होता. परंतू त्याचा उपाय सापडला."

"कोणता उपाय?"

"नियोग पद्धती."

"म्हणजे? ही काय आहे नियोग पद्धती?"

"नियोग पद्धती याचा अर्थ रक्ताच्या नात्यातील कोणत्याही परपुरुषासोबत एक रात्र सहवास करणं."

"म्हणजे? परपुरुषासोबत."

"नाही. तसं नाही."

"मग कसं? तो आपल्या रक्ताच्या नात्यातील असेल. परंतू पती असेल का आपला?"

"तुझं म्हणणंही बरोबरच. तसंच समज. परंतू तुला तसं करायचं आहे."

"तसं म्हणजे? परपुरुषासोबत एका रात्रीचा सहवास करायचा आहे तर. परंतू ताईसाहेब, मी सांगून ठेवते की मला ते जमणार नाही. मुळीच जमणार नाही."

"का? तुला वाटत नाही का की हस्तीनापुरातील राजगादीसाठी वारस मिळावा?"

"वाटते. परंतू हा असला या पद्धतीनं वारस. आपली किती बदनामी होईल. काळ माफ करेल का आपल्याला."

"का माफ करणार नाही. आपण काय वाईट काम करीत आहोत काय? आपण हस्तीनापुरातील राजगादीला वारस देत आहोत."

"परंतू ताईसाहेब, मला हे जमायचं नाही. ते शक्य नाही तू म्हणतेस ते."

"ठीक आहे. तुला शक्य नाही असं तुझं म्हणणं. मला तरी शक्य होतं का? तरीही मी तयार झालीच ना. मी नियोग पद्धती केली. परंतू फसले. कारण मी तो विधी करीत असतांना गच्च डोळे लावले. म्हणून मला आंधळी संतती होणार आणि आंधळी संतती ही हस्तीनापुरातील राज्य कसं चालवेल. म्हणूनच तुला तयार करावं लागत आहे नियोग पद्धतीसाठी."

"नाही ताई, मला हे शक्य नाही. कधीच शक्य होणार नाही. मी आपल्या पती व्यतिरीक्त कोणत्याही परपुरुषासोबत रात्र काढू शकत नाही."

"ठीक आहे तर...... तू जर माझं ऐकत नसशील तर माझा जगून तरी काय उपयोग. तसाही आपला पती जीवंत नाही. तुलाही मरायचं असेल माझ्यासोबत तर तूही मरु शकतेस?"

"म्हणजे? का बरं मरायचं?"

"अंबालिके, अगं लेकरंच नाही तर आपण जगून तरी कोणासाठी? अगं आपला पती आज जीवंत नाही लेकरं जन्माला घालायला. मग आपल्याला लेकरं होतील तरी कुठून? अगं आज आपल्याला लेकरं व्हावीत म्हणून आपल्या आईसाहेबही पुढाकार घेत आहेत."

"परंतू त्यात आपली बदनामी?"

"कशी होणार आपली बदनामी? त्याला नियोग पद्धती नाव दिलं ना आईसाहेबांनी. उद्या राज्याचा वारस सोड. परंतू पुत्ररुपानं आपल्याला आपलं आयुष्य तर सुखदायक काढता येईल. तसं काढता आलं म्हणजे झालं."

"हो, तुझंही म्हणणं बरोबरच आहे. ठीक आहे तर. मिही तयार आहे नियोग पद्धतीला. तू सांगून दे आईसाहेबांना."

ती नियोग पद्धती. अंबालिका अंबिकेच्या म्हणण्यानुसार तयार झाली होती नियोग पद्धतीसाठी. तसं तिनं होकार देताच पुरता निरोप तिनं सत्यवतीला दिला व सत्यवतीनं व्यासाला व ठरल्याप्रमाणं दुसऱ्या दिवशीसाठी शयनकक्ष सजवलं गेलं व त्यात अंबालिकेला तिची इच्छा नसतांनाही तिला भावनेत गुंफून झोकून देण्यात आलं.

तो शयनकक्ष तयार होता. आता व्यास त्या शयनकक्षात येणार नव्हता. जसा अंबिकेच्या शयनकक्षात आला होता, तर याठिकाणी व्यास आधीच शयनकक्षात राहणार होता व अंबालिका स्वयं जाणार होती त्या शयनकक्षात. सगळं कसं व्यवस्थीत ठरलं होतं. तशी रात्र झाली. त्या रात्रीच्या प्रहरी अंबिकेनं आपली बहिण अंबालिकेला सजवलं व पाठवून दिलं व्यासाच्या शयनकक्षात.

अंबालिका व्यासाच्या शयनकक्षात गेली होती. तसं तिनं त्याला पाहिलं. तिला तोच तो व्यासाचा अक्राळ विक्राळ व काळवंडलेला चेहरा दिसला. तशी ती घाबरली. तिला भीती फार वाटत होती. वाटत होतं की व्यास तिला खावून टाकतो की काय, तशी ती डोळेही लावणार होती. परंतू तिला क्षणात आठवलं. तिच्या बहिणीनं म्हणजे अंबिकेनं सांगीतलं होतं की तिनं त्याला पाहून गच्च डोळे लावले. ज्याचा परिणाम म्हणजे तिला होणारी संतती ही आंधळी होणार. म्हणून तिनं गच्च डोळे लावले नाही. मात्र ती फार घाबरली होती. ती एवढी घाबरली होती की ज्याचा परिणाम असा झाला की तिला होणारी संतती ही सतत आजारी राहणार होती.

ती रात्र तशी निघून गेली. तसा दिवस उजळला व अंबालिका स्वयं व्यासाच्या कक्षेतून बाहेर पडली. ती आपल्या कक्षात आली. तशी उद्वेगानं

सत्यवती ताबडतोब काय परिणाम झाला म्हणून तो परिणाम पाहण्यासाठी ती व्यासाचे कक्षात गेली आणि त्याला विचारले. तसा व्यास म्हणाला,

"आईसाहेब, काय सांगू. यावेळेस होणारी संतती ही अंगू पंगू निपजणार. कारण या कक्षात जेव्हा अंबालिका आली. तेव्हा तिनं डोळे तर उघडे ठेवले होते. परंतू ती एवढी घाबरली होती की तिनं आपलं अख्खं शरीरच पिवळं केलं होतं. याचा परिणाम हा होणार आहे की होणारी संतती ही अंगू पंगू जन्मास येईल. याचाच अर्थ असा की ती संतती सतत आजारी पडेल."

"यावर काही उपाय?"

"यावर उपाय म्हणजे आता फक्त हा एक शेवटचा उपाय आहे. मला तीन वेळाच नियोग करणं शक्य आहे. यावेळेस तरी तशी चूक होवू नये. तसं समजावून सांग अंबिका आणि अंबालिकेला. यावेळेस तरी हट्ट्याकट्ट्या मनानं, डोळे उघडे ठेवून यावं म्हणावं. जेणेकरुन निपजणारी संतती चांगली निपजेल. नाहीतर पुन्हा तेच ते. तसं सांग त्यांना. मात्र हा शेवटचा पर्याय."

"ठीक आहे. मी सांगते तसं त्यांना."

"अन् हेही सांग की जो कोणी अशी अट पाळू शकेल. तिनंच कक्षात यावं माझ्या."

"ठीक आहे. ती म्हणाली. तशी सत्यवती चालती झाली.

*************************

सत्यवतीसमोर चिंतेचा प्रश्न होता. तो हस्तीनापुरातील राजगादीवरील वारसाचा प्रश्न काही सोडवता येत नव्हता. त्यातच अंबिकेकडून तशी चूक झाली होती. ती घाबरली नव्हती. परंतू तिनं डोळे बंद केले होते. तशीच अंबालिका घाबरली होती. ती तर पिवळीच पडली होती. व्यासांनी आता म्हटलं होतं की जी कोणती महाराणी त्याच्या अटी पुर्ण करेल. तिलाच शयनकक्षात पाठवशील. हा शेवटचा पर्याय आहे. तसा ती विचार करु लागली. कोणाला यावेळेस शयनकक्षात पाठवावं. तसं तिला आठवलं. आपण अंबिकेलाच शयनकक्षात पाठवू. ती घाबरली नव्हती. तशी तिला तिची चूक लक्षातही आली आहे. आपण तिला सांगू की डोळे मिटशील नको यावेळेस. कारण ही शेवटची वेळ आहे नियोग पद्धतीचा वापर करण्याची. ती करेलही तसं. हं, अंबालिकेला पाठवलं असतं. परंतू ती याही वेळेस घाबरणार नाही कशावरुन?"

तो वारसाचा प्रश्न. सत्यवतीला चिंताग्रस्त करीत होता तो वारसाचा प्रश्न. तशी ती ताबडतोब अंबिकेच्या कक्षात गेली. तशी तिला ती म्हणाली,

"घात झाला अंबिके. याही वेळी घात झाला. ती अंबालिका जेव्हा त्या शयनकक्षात गेली ना. तेव्हा ती फार घाबरली होती. ती तर पिवळीच पडली होती नियोग पद्धतीत. आता याचा परिणाम हा होणार की होणारी संतती ही सतत अंगू पंगू निपजणार."

अंबिकेनं ते ऐकलं. तशी अंबिका म्हणाली,

"आता यावर उपाय?"

"एक उपाय आहे आणि हा शेवटचाच उपाय आहे. यावेळेस तुम्ही दोघींपैकी कोणीही जायचं. परंतू आधी झालेल्या चुका यावेळेस व्हायला नको."

"ठीक आहे आईसाहेब." अंबिका म्हणाली. तशी सत्यवती चालती झाली.

अंबिकेनं सत्यवतीच्या म्हणण्यानुसार आपली बहिण अंबालिकेची भेट घेतली. तिनं अंबालिकेशी बोलणी केली. कोण जाणार त्याच्या शयनकक्षात. तशी अंबालिका म्हणाली,

"मला त्याचा अक्राळविक्राळ चेहरा पाहून भयंकर भीती वाटते. याही वेळेस मी नाही घाबरणार कशावरुन? तो चेहरा. तो चेहरा एखाद्या अजबगजब राक्षसासारखाच दिसतो. मी नाही जात या वेळेस. तूच जा ताई."

अंबालिकेनं सरळसरळ निकाल देवून टाकला. तसं बोलूनही दाखवलं. आता अंबिकेसमोर विचार आला की त्याच्या कक्षात जाईल कोण? तिही जायला नकारच भरत होती. कारण त्याचा चेहराच असा होता की तिही पाहू शकत नव्हती. काय करावं . ती विचार करु लागली. तसं तिला क्षणातच आठवलं की आपण एखाद्या दासीला पाठवू त्याच्या शयनकक्षात. कामही होईल व आपल्या आईसाहेबही रागावणार नाही.

अंबिकेचा तो विचार. तो विचार तिनं आपल्या बहिणीजवळ बोलून दाखवला. आता विचार होता नेमका की कोणत्या दासीला पाठवावं. कोण हट्टीकट्टी आहे याचा. तशी ती आपल्या बहिणीजवळही बोलू लागली होती त्या दासीबद्दल. तिलाही त्या व्यासाच्या शयनकक्षात पाठविण्यासाठी नव्हे तर हस्तीनापुरातील राजगादीच्या वारसासाठी एक हट्टीकट्टी दासी हवी होती नियोग पद्धतीसाठी. त्यावरच उपाय काढण्यासाठी ती विचार करीत होती. खोल आणि सखोल विचार.

ती एक दासी. अंबिकाची दासी होती ती. तिनं त्याआधी अंबालिकेला विचारलं होतं.

"अशी एखादी दासी आहे का की ती त्या नियोग पद्धतीला तयार होईल."

त्यावर अंबिका म्हणाली.

"नाही. अशी माझ्याकडं कोणतीच दासी नाही. तूच बघ एखादी दासी."

अंबिका चूप बसली. तशी पुन्हा ती विचार करु लागली. तसं क्षणात तिला आठवलं की तिची एक दासी आहे. जी दासी त्या नियोग पद्धतीसाठी तयार होवू शकते.

अंबिकेला तसं वाटताच तिनं त्या दासीला तयार केलं. तशी ती तयार होताच ती दासी व्यासाच्या शयनकक्षात जायला तयार झाली.

ती रात्र....... त्या रात्रीचा थरार. ती दासी....... ती दासी त्या महाराण्यांची होती. त्या दास्यांना त्या महाराण्यांचं ऐकावंच लागत असे. त्यामुळंच की काय, ती दासी नाईलाजास्तव तयार झाली होती त्या व्यासाच्या कमऱ्यात जायला.

ती रात्र........ त्या रात्री ती अंबिकाची एक दासी व्यासाच्या शयनकक्षात गेली होती. तिनं व्यासाला पाहिलं. तो त्याचा अक्राळविक्राळ चेहराही पाहिला. परंतू ती दासी असल्यानं तिला त्या महाराण्यांचं ऐकावंच लागेल. असा विचार करुन ती त्या कक्षात गेल्यावर ती व्यासाला घाबरली नाही. तसे तिनं आपले डोळेही बंद केले नाही. तशी अतिशय आनंदात ती रात्र संपली. तशी सकाळ झाली.

सकाळ झाली होती. तशी सकाळ होताच ती दासी त्या शयनकक्षातून परत आली. तशी ती परत येताच अंबालिकेनं कुतूहलानं तिला विचारलं.

"काय झालं? कशी का गेली रात्र? भीती वाटत होती का तुला?"

ते त्या दोघींचे विचीत्र प्रश्न. तशी ती दासी उत्तरली.

"नाही. मला कशाचीच भीती वाटली नाही."

त्या दासीचं ते उत्तर. तशी तिला अंबिका म्हणाली,

"अगं मग तू डोळे तर नक्कीच लावले असशील."

"नाही महाराणी. तसं काहीच घडलेलं नाही. मी डोळेही लावले नाही अन् घाबरलीही नाही."

त्या महाराण्यांनी ते उत्तर ऐकलं. तसं उत्तर ऐकताच त्यांना बरं वाटलं. आपला उद्देश सार्थक झाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर होता.

रात्र संपली होती. तशी सकाळ झाली होती. तशी सकाळ होताच सत्यवती उतावीळपणानं व्यासाच्या कमऱ्यात गेली. तसं तिनं उद्विग्नतेनं ताबडतोब त्याला विचारलं,

"काय झालं?"

"यावेळी फारच उत्तम योग आला. यावेळी घात झाला नाही कोणताच. यावेळी डोळेही मिटले गेले नाही आणि ती घाबरलीही नाही. परंतू........."

"परंतू काय?"

"परंतू यावेळी तुझ्या पुत्रवधूंपैकी कोणीच आलं नव्हतं."

"मग कोण आलं होतं?"

"एक दासी होती. मात्र तिनं नियोग पद्धतीला दिलेल्या चांगल्या प्रतिसादानंतर होणारा पुत्र हा चांगल्या नीतीचा व हुशार होईल. तो वेद विद्येत पारंगत होईल."

व्यास बोलून गेला व म्हणाला,

"माते, माझे कार्य इथं संपलेलं आहे. मी तू जे सांगीतलं, ते कार्य केलेलं आहे. आता मला मुक्त कर. मला पुनश्च तपश्चर्येला निघायचं आहे."

व्यासाचं बोलणं संपवलं होतं. तशी सत्यवती आणखी चिंताग्रस्त झाली होती. तिच्याकडून झालेले तीनही प्रयत्न विफल झाले होते. कारण तिच्या घरात आता आंधळा, पांगळा पुत्र जन्म घेणार होता आणि तिसरा जो बलवान, नीतीवान पुत्र होता. तो दासीचा पुत्र होता.

ठरल्याप्रमाणे दुसरा दिवस उजळला. व्यासाचं कार्य संपलं होतं. तसा तो दुसऱ्याच दिवशी तपश्चर्येला निघून गेला होता.

*************************

अंबिका, अंबालिका व ती दासी अशा तिघ्याही जणी एकाचवेळेस गरोदर राहिल्या. गर्भ ठरले होते. ते गर्भ वाढत चालले होते. तसा तो दिवस उजळला. तिघींनीही तीन गोंडस बाळांना जन्म दिला. तसा त्यांचा नामकरण विधी पार पडला.

ते बाळ लहानाचे मोठे होवू लागले होते. तसं पाहता व्यासांनं सांगीतल्यानुसार धृतराष्ट्र जन्मापासूनच आंधळा होता. पंडू अगदी लहानपणापासूनच आजारी राहात असे तर विदूर हा कोणाच्या भानगडीत राहात नसे. तो अगदी हट्टाकट्टा होता.

ते बाळं लहानाचे मोठे होवू लागले होते. त्यांच्या शिक्षणाचा भार भिष्मानं उचलला होता. त्या शिक्षणातून धृतराष्ट्र बलवान बनला होता. पंडू धनुर्विद्येत पारंगत झाला होता तर विदूर नीतीशास्रात. परंतू ज्यावेळेस हस्तीनापुरातील राजगादी सांभाळण्याचा विषय आला. तेव्हा त्या राजगादीवर पंडू डोळस असल्यानं त्यालाच बसविण्यात आलं. मात्र राजगादीसाठी विदूर दासीपुत्र असल्यानं तो जरी विद्वान, बलवान वा शूरवान असला तरी त्याचा विचार केल्या गेला नाही.

पंडू हुशार आणि डोळस असल्यानं त्याला राजा बनविण्यात आले होते. धृतराष्ट्र आंधळा होता. त्यामुळंच कोणीच त्यानं राजा बनावं असा

प्रयत्न केला नाही. त्यामुळंच त्याच्या मनात पंडूच्याबद्दल द्वेष उत्पन्न झाला होता.

पंडू राजगादीवर येताच त्यानं साम्राज्य विस्ताराचं धोरण उभारलं. तसं पाहता त्यावेळेस हस्तीनापुरातील भुभागही वाढला होता. अशातच पंडूमध्ये थोडा अहंकार निर्माण झाला होता.

एकदा ऑगष्ट ऋषीच्या सांगण्यावरुन पंडू शिकारीला गेला. त्या शिकारीदरम्यान त्यानं पाहिलं की एक हरीण वनविहार करीत असून तो अतिशय सुंदर दिसत आहे. तेव्हा हीच चांगली शिकारीची वेळ असल्याचा विचार पंडूनं केला. त्यातच त्यानं आपल्या अंबारीतून बाण काढला व तो त्या हरणाच्या दिशेनं मारला. तोच तो हरीण धाड्कन पडला. तसा तो मनुष्यवाणीनं बोलू लागला.

ती मनुष्यवाणी. ती वाणी ऐकताच पंडू त्या हरणाच्या दिशेनं गेला. तसा तो त्या हरणाजवळ पोहोचताच त्याला तिथं बाण लागलेल्या अवस्थेत किंदम ऋषी दिसले. तशी तिथं त्यांची पत्नीही दिसली. ते दोघंही हरीणीच्या रुपात प्रणयक्रिडा करीत होते.

तो हरीणीचा जोडा. त्यातच त्या ऋषीच्या छातीला बाण लागला होता. तो विव्हळत होता. तसा त्या ऋषीजवळ पंडू जाताच त्यानं ते सर्व दृश्य पाहिलं. परंतू त्याला अहंकार आला असल्यानं त्याला झालेला

पश्चाताप जाणवला नाही. त्यामुळंच की काय, त्या ऋषीनं तो प्रकार पाहिला. त्याला वाटलं की मला एवढं लागूनही व मी मरणाच्या द्वारात असूनही या व्यक्तीला किंचीतही पश्चाताप नाही. तसं त्या ऋषीला वाटताच त्यांच्या तोंडून शापवाणी निघाली.

"हे राजन, आम्ही मरणाच्या दारात असतांनाही तू अहंकारानं फुलून गेला आहेस. तुला किंचीतही पश्चाताप नाही. त्यामुळंच मी तुला शाप देत आहे की ज्याप्रमाणे आम्ही पती पत्नी प्रणयक्रिडा करीत असतांना तू बाण मारुन आम्हाला प्रणयक्रिडेपासून वंचीत केलेस. तसाच तू देखील आजपासून कोणत्याही स्रिला प्रणयक्रिडेसाठी स्पर्श करु शकणार नाहीस. तू जर तसा प्रयत्न केलाच किंवा तसं करण्याचा प्रयत्न केल्यास तुला त्याचवेळी मृत्यू येईल."

तो किदंब ऋषीचा शाप. तो शाप देताच त्या ऋषीनं देह त्यागला. त्यानंतर त्याच्या चितेवर त्याची पत्नी सती गेली होती.

तो शाप....... ती शापवाणी खरी ठरली होती. त्यातच त्यात उ:शापही नव्हता. त्यामुळेच किदंब ऋषी मरताच तो शाप लागला व त्या शापानं पंडू राजा खजील झाला. आता तो दिवसेंदिवस खंगत चालला होता. त्याला आता राज्यकारभार करणं बरोबर जमत नव्हतं. शेवटी त्यानं निर्णय घेतला की आता काहीही झाले तरी राजपद सोडायचं व आपण स्वतः वनात जावून

उपजीविका करायची. तसा निर्णय घेवून पंडूनं राजपद त्यागलं व तो आपल्या दोन्ही राण्यांना घेवून वनात गेला व त्या वनात तो आपल्या पत्नीसमवेत एक कुटी बनवून राहू लागला होता.

पंडू राजपद सोडून वनात जाताच हस्तीनापुरात हाहाकार माजला. राजगादीवर कोणीच उत्तराधिकारी बसला नसल्यानं कोलाहल तर माजणारच. तसा हडकंप माजताच व्यासाला सत्यवतीनं बोलावणं पाठवलं. त्यानंतर व्यास येताच त्यानं ठरवलं की हस्तीनापुरातील राजगादीवर धृतराष्ट्रला बसवावं व भिष्मानं राज्यकारभार पाहावा. तसा तो निर्णय संबंधीत मंत्रीगणांना पटला व धृतराष्ट्र आता हस्तीनापुरातील राजगादीवरील राजपद सांभाळणारा राजा ठरला.

आज धृतराष्ट्र राजगादीवर वारस म्हणून बसला होता. तोच राज्याचा कारभार पाहात होता नव्हे तर तो जरी राजा असला तरी त्याचा राज्यकारभार भिष्म पाहात होता.

धृतराष्ट्र राजा बनला. हस्तीनापुरातील सर्वेसर्वा होता तो. तसं पाहता त्याला द्वेष करणं शोभत नव्हतंच. परंतू तरीही तो आपल्या सौतेल्या भावाचा म्हणजेच पंडूचा राग करीत असे. व्यतिरीक्त तो विदूरचाही द्वेषच करीत असे.

धृतराष्ट्रनं राजपद सांभाळलं होतं. त्यातच भिष्म त्याचा राज्यकारभारही उत्तम प्रकारे करीत होता. परंतू धृतराष्ट्रनं राजपद जरी

सांभाळलं असलं तरी एक बाब शिल्लक होती. त्या धृतराष्ट्रला मार्गदर्शन करण्याची. कारण भिष्म त्याचा कितीही राज्यकारभार सांभाळत असला तरी प्रत्यक्षात प्रत्येक वेळी भिष्म त्याच्याजवळ राहणार नव्हता. अशावेळी तो आंधळा असल्यानं आंधळ्याची काठी व्हावी म्हणून धृतराष्ट्रला कोण्यातरी माणसाची गरज होती. तशी चिंता सत्यवतीला वाटत होती.

सत्यवती प्रत्यक्षात प्रत्येक वेळेस व्यासाची मदत घेत असे. तसा आता व्यासही तिला जातीनं विनाअटीनं मदत करीत असे. कारण तो हस्तीनापुरातील वारसांचा पिता बनला होता. सत्यवतीला वाटत होतं की धृतराष्ट्रला राज्यकारभार चांगल्या पद्धतीनं करता यावा. त्यासाठी तिनं मार्ग विचारण्यासाठी व्यासाला बोलावणे पाठवले होते. तसा व्यास सत्यवतीचं बोलावणं येताच धावून आला.

व्यास हस्तीनापुरात येताच सत्यवतीनं आपली कैफियत त्याच्यापुढं मांडली. तसं रुदन मांडताच तिनं त्यावर मार्ग विचारला. त्यावर ती बोलकी झाली. म्हणाली,

"आता पुत्रा, मग तूच यावर काय तो मार्ग सुचव."

सत्यवतीचं ते बोलणं. त्यावर व्यासांनी त्यावर उपाय काढण्याचं आश्वासन दिलं. तसा तो पुन्हा परत आपल्या आश्रमात गेला.

ती हस्तीनापुरातील राजगादी. त्या राजगादीवर वारस म्हणून बसलेला धृतराष्ट्र. तोही आंधळा. तसं व्यासासमोर प्रश्नचिन्हं उभं राहिलं. हे असंच का? त्यावर तो विचार करु लागला. कारण त्याला मार्ग काढायचा होता त्यावर. तो विचार करु लागला. तसा त्याला मार्गही सापडला. तो मार्ग होता संजय.

संजय व्यासाचा एक शिष्य. तो इमानदार होता. तसा तो कर्तव्यपरायण. तो आता सर्व विद्या पारंगत झाला होता. त्यातच त्याला त्या विद्येनुसार राज्यकारभारात मदत करता येणंही शक्य होतं.

व्यासांनी ठरवलं. हस्तीनापुरात धृतराष्ट्रला मदत करायला आपण आपल्या प्रिय शिष्य संजयला पाठवावं. तोच खरा धृतराष्ट्रचा मार्गदाता ठरु शकतो.

विचारांचा अवकाश. तसा वेळ न दवडता व्यास संजयला घेवून हस्तीनापुरात आला. त्यानं सर्व मंत्रीमंडळात तसा प्रस्ताव ठेवला व सर्वानुमते ठरलं की संजयची नियुक्ती राजा धृतराष्ट्रचा निजी सेवक म्हणून करावी. तसं त्याला वैयक्तीक मंत्रीपदही बहाल करावं.

मंत्रीमंडळाचा निर्णय होताच संजयची नियुक्ती धृतराष्ट्रचा वैयक्तीक सेवक म्हणून झाली. तसंच त्याला मंत्रीपदही बहाल करण्यात आलं. त्यावेळेपासून संजय धृतराष्ट्रची सेवा करु लागला. तो आंधळया धृतराष्ट्रची

काठी म्हणून वावरु लागला. त्यानंतर त्यानं आंधळ्या धृतराष्ट्रला कधीच दगा दिला नाही. तसंच संजयनं धृतराष्ट्र मरेपर्यंत कधीच त्याला अंतरही दिलं नाही.

संजय त्याकाळचा बातमीदार होता असं म्हटल्यास आतिशयोक्ती ठरणार नाही. कारण त्यानंच इत्यंभूत सर्व प्रकारची माहिती धृतराष्ट्रला दिली होती. कोणी म्हणतात की त्याला दिव्यदृष्टी प्राप्त झाली होती व त्यानं त्या दिव्यदृष्टीच्या आधारावर एकाच ठिकाणी बसून राजा धृतराष्ट्रला युद्धाची माहिती सांगीतली होती. कोणी म्हणतात की त्यांना दिव्यदृष्टी प्राप्त झाली नव्हती तर तो सकाळी उठून युद्धमैदानावर जात असे व सायंकाळपर्यंत थांबून सर्व रणांगणाचा आढावा घेत असे. तो इतिवृत्तांत सायंकाळी घरी येवून बऱ्याच रात्रीपर्यंत धृतराष्ट्रला सविस्तर तसेच विस्तारपूर्वक सांगत असे.

संजय केवळ त्या काळातील बातमीदार नव्हता तर तो एक योद्धाही होता. सुरुवातीलाच त्यानं धृतराष्ट्रला सल्ले देवून त्यांचं मन युद्धापासून पालटविण्याचा प्रयत्न केला. परंतू धृतराष्ट्र आंधळा होता ना. तेवढी त्याला बुद्धी जरी असली तरी त्या बुद्धीचा वापर करुन त्यानं ते युद्ध थांबविण्याचा प्रयत्नच केला नाही. द्युतक्रिडेत पांडव हारताच व ते तेरा वर्षाच्या शिक्षेसाठी वनात जाताच संजय महाराज ध्रृतराष्ट्रला म्हणाला,

"महाराज, आतातरी पांडवाना थांबवा. त्यांना शिक्षेला पाठवू नका. नाहीतर याचे परिणाम गंभीर पाहायला मिळतील." त्यावर महाराज धृतराष्ट्र म्हणाले,

"माझी मुलं कुठं ऐकतात माझं."

धृतराष्ट्रची मुलं. ती मुलं लहानपणापासूनच मोठ्या प्रेमात वाढली होती. अगदी लहानपणापासूनच त्या मुलांमध्ये द्वेष भरला जात होता. म्हटलं जात होतं की पांडव, काही तुझ्या काकाची म्हणजे पंडूची मुलं नाहीत. तुझ्या काकांना तर शाप मिळाला होता किंदब ऋषींचा. शाप असा होता की तो ज्याही स्त्रिला स्पर्श करेल. त्यावेळी तो मरण पावेल. त्यामुळंच त्यानं आपल्या पत्नीलाही अजिबातच हात लावला नाही. एकदा जेव्हा तो त्याची पत्नी माद्री सुंदर दिसत असतांना तिला जेव्हा त्यानं स्पर्श केला, तेव्हा तो मरण पावला. मग असा शाप असतांना व विणा त्यानं स्त्री असलेल्या आपल्या पत्नींनाही स्पर्श केलाच नाही. तर त्यांना मुलं झालीच कशी? हेच बिंबवलं होतं लहानपणापासूनच धृतराष्ट्रच्या मुलांच्या मनात आणि तेही बिंबविणारा शकूनी. जो त्यांचा मामा होता.

शकुनी........शकुनीनं आपल्याच भाच्यांच्या मनात का द्वेष निर्माण केला असावा? हा एक गुढच प्रश्न आहे. त्याचं कारणही तसंच आहे.

गांधारीला ती लहान असतांना एक शाप मिळाला होता. त्या शापानुसार तिचा विवाह केल्यास तिचा पती मरण पावेल असा तो ऋषीचा शाप. त्याचं कारण होतं की ती लहान व बाळबोध असतांना व आपल्या दास्यांबरोबर वनात फिरायला गेली असतांना जे ऋषी तपश्चर्या करीत होते. त्यांची तपश्चर्या तिनं भंग केली होती. त्यावर ते ऋषी क्रोधीत झाले होते. तरीही ते ऋषी तिला समजावीत होते. परंतू त्यांचं काहीएक ऐकून न घेता त्यावर त्या ऋषींना उलट उत्तरे देवून त्यांची गांधारीनं मस्करी केली व थट्टा उडवली होती. बदल्यात तिनं त्या ऋषींचं ऐकून न घेतल्यानं त्यांनी तिला शाप दिला. तो शाप........तुझा विवाह होताच तुझा पती मरेल. तो शाप सर्व राज्यांना माहीत होता. त्यामुळंच तिचा विवाह जुळत नव्हता.

ती शापवाणी. ती शापवाणी भिष्माला माहीत होती. परंतू त्यांनी कोणालाच सांगीतलं नाही. कारण आंधळ्या धृतराष्ट्रला कोणीही मुलगी द्यायला तयार नसल्यानं व प्रत्यक्ष गांधारी त्याला मिळत असल्यानं भिष्मानं धृतराष्ट्रलाही सांगीतलं नाही. कारण त्यांना वाटत होतं की जर ही गोष्ट धृतराष्ट्रला माहीत झाली तर तो भितीपोटी तिच्याशी विवाह करणार नाही. त्यापेक्षा आपण मौनच बाळगलेलं बरं. त्यानंतर ते गांधारीला पाहायला गेले.

गांधारी अतिशय सुंदर होती. ती धृतराष्ट्रच्या समोर बसली होती. बाजूला तिचा भाऊ शकुनी बसला होता. त्यावेळेस तिनं पाहिलं की तिचा होणारा पती आंधळा आहे. तसं तिला वाटलं की आपण एवढे सुंदर, तरीही आपल्याला चांगला पती नशिबात नाही. कारण तो शाप की तुझा विवाह होताच तुझा पती मरेल. ती विचार करीत होती.

विचारांच्या चक्रव्यूहात फसली होती ती. तसं पाहता परीवाराच्या इच्छेपुढे ती चूप बसली होती. गांधारीची भावना. त्यातच तिच्यासमोर आंधळा धृतराष्ट्र होता. तसा तिनं नकार दिला नाही.

पाहुणे तिला पाहून गेले होते. त्यानंतर परिवारात चर्चा झाली. चर्चेअंती ठरलं की आपण आपल्या मुलीला धृतराष्ट्रला द्यायची. कारण आपल्या मुलीला शाप मिळाल्याकारणानं आपल्या मुलीला कुठूनही वर उतरत नाही.

तो परिवाराचा विचार. त्या विचारापुढं गांधारीचं काहीच चाललं नाही. तसंच शकुनीचंही काहीच चाललं नाही. त्यानं तर विरोधच केला होता तिच्या विवाहाला. परंतू त्याचं काहीच चाललं नसल्यानं तो चूप बसला.

गांधारीचा विवाह झाला होता. तिला ऋषींचा शाप असल्यानं व तिचा पहिला पती मरणार आहे असं माहीत असल्यानं त्यावर परिमार्दन

म्हणून गांधारीचा विवाह कोणी म्हणतात की एका बकरीशी करण्यात आला तर कोणी म्हणतात एका गाढवाशी. त्यानंतर तो प्राणी मरण पावला. तद्नंतर तिचा विवाह धृतराष्ट्रशी लावण्यात आला. (साभार गुगल)

गांधारीचा विवाह झाला होता. ती हस्तीनापुरात रममाण झाली होती. तसे काही दिवस गेले. काही दिवसानंतर संपूर्ण हस्तीनापुरात माहीत झालं की गांधारकडील लोकांनी आपल्याशी बनवाबनवी केलेली आहे. ती बनवाबनवी क्षमेच्या लायक नाही. ती गोष्ट माहीत होताच धृतराष्ट्रला अशा बनवाबनवीमुळ गांधार प्रदेशाचा राग आला होता. तो राग एवढा तीव्र होता की त्या रागामुळं त्यानं गांधार प्रदेशावर आक्रमण केले व त्या राज्याचा राजा सुबलसह सर्व गांधार परिवाराला कैद केले.

हस्तीनापुरातील राजा धृतराष्ट्रनं गांधार प्रदेशाला नेस्तनाबूत केलं नव्हे तर त्या अख्ख्या परिवाराला कैदेत टाकलं. तसंच त्यांचेवर अनन्वीत अत्याचारही केले.

कैदेत पडले होते गांधारचे लोकं. ती कैद अजूनही गांधारीला माहीत झाली नव्हती. अत्याचाराची कारणमिमांसा अशी होती की ते अत्याचार सहन होत नव्हते. त्यांना जेवन मिळत नव्हतं. म्हणतात की एका एका व्यक्तीला एकच अन्नाचा कण खायला मिळायचा. शकुनी आणि त्याच्या त्या एका अन्नाच्या कणात शकुनीचं आणि त्याच्या परिवाराचं भागत

नव्हतं. त्यामुळंच परिवार विचार करीत होता की राज्यातील असा एक व्यक्ती जगायला हवा की जो हस्तीनापुरातील कार्यकर्तृत्वाचा बदला घेवू शकेल.

शकुनी.......शकुनी लहानपणापासूनच हुशार होता. कुटील डावातही पारंगत होता. तो लहानपणापासूनच चौसरचे डाव खेळत असे. तसं पाहता परिवारवाले उपाशी राहात. परंतू शकूनी जगला पाहिजे म्हणून त्याला अन्न देत. तसंच त्याला दररोज आठवण देत असत की त्याला संपूर्ण हस्तीनापुराला नेस्तनाबूत करायचं आहे नव्हे तर बदला घ्यायचा आहे.

शकुनीला तसं पाहता त्याच्या बहिणीचा विवाह झाला, तेव्हापासूनच हस्तीनापुरचा राग यायचा. कारण त्याला माहीत होते की त्याची बहीण सुंदर असून तिचा विवाह एका आंधळयाशी होत आहे. ते सहन न झाल्यानं तो दुःखी होता. तशी त्यानं आपल्या पित्याला कल्पनाही दिली होती. परंतू त्याचे पिता ऐकले नसल्यानं आज त्यांच्यावर अशी पाळी आली होती. त्यामुळं शकुनीला तसं वाटणं साहजिकच होतं की जर त्याच्या परिवारानं आपल्या बहिणीचा विवाह केला नसता तर आज जे दिवस दिसत होते. ते दिवस दिसले नसते. तसा त्याच्या मनात राग वाढतच चालला होता.

शकुनी जगत होता तो ते सा-यांच्या वाट्याचं अन्न खावून. ते परीवारवाले जगवत होते त्याला बदल्याच्या भावनेनं प्रेरीत करुन. तशी

त्याच्या मनात ती त्या बदल्याची आग तेवत राहावी म्हणून परिवारानं त्याचा एक पाय तोडला होता. त्यांना वाटत होतं की ज्याला जगवलं त्या शकुनीनं बदल्याची भावना विसरु नये. त्यानं बदला घ्यावाच. त्यामुळंच त्याचा पाय तोडला गेला. त्याच्या मनात बदल्याची भावना तेवत राहावी म्हणून.

सारे परिवारवाले मरण पावले होते. त्याचबरोबर त्याचे वडीलही. परंतू वडीलांनी मरतासमयी त्याचेकडून वचन घेतलं होतं की तो बदला घेणार. त्या हस्तीनापूरकडून बदला घेणार आणि शकुनीनंही आपल्या पित्याला तशा स्वरुपाचं वचन दिलं होतं.

परिवारवाले सर्वजण मरण पावले होते. आज शकूनी एकटाच वाचला होता. त्याच्या मनात बदल्याची आग धुमसत होतीच. तसं त्यानं त्याचा बाप मरताच त्याच्या हाडापासून सोंगटीचे फासे बनवले होते. त्यानं आपल्या कलेनं संपूर्ण हस्तीनापुरला नेस्तनाबूत करण्याचा निश्चय मनात केला होता.

***************************

शकुनीच्या परिवारातील सर्व जण मरण पावले होते. तसा शकुनी एकटाच वाचला होता. तसं त्याला सोडून देण्यात आलं कैदेतून. तसा तो एकदाचा प्रसंग घडला.

गांधारीला मुलं झाली होती. तशी ती मुलं मोठी होत होती. त्या वाढत्या वयाबरोबर त्या मुलांवर संस्कार करणेही आवश्यक होते. ते पाहून एकदा गांधारीनं धृतराष्ट्रला म्हटलं,

"आर्य, मिही डोळ्याला पट्टी बांधलेली आहे आणि आपणही. आपण स्वतःला डोळे आणू शकत नाही आणि मिही आज डोळ्याला बांधलेली पट्टी काढू शकत नाही. आता आपल्याला मुलं झाली आहेत. त्यांचेवर संस्कार करायचे आहेत. तेव्हा आर्य आपण असे आपल्या मुलांवर संस्कार करण्यासाठीच कोणाची तरी नियुक्ती करणे आवश्यक आहे. तेव्हा त्यासाठी आर्य आपण तत्परतेनं अशी नियुक्ती करावी म्हणजे झालं."

धृतराष्ट्रनं गांधारीचं म्हणणं ऐकलं. तसे ते म्हणाले,

"महाराणीसाहेबा, आपण यावर उपाय सुचवावा."

"मला नाही सुचत उपाय." ती बोलली होती. तसा तो विचार करु लागला. त्यानंतर तो म्हणाला.

"मला तर कोणताच उपाय दिसत नाही आहे. एक काम कर. तूच सूचव ना उपाय."

"उपाय........माझ्या भावाला बोलवू काय?"

गांधारीनं भावाचं नाव काढताच तो वैतागला. परंतू चेहऱ्यावर असे कोणतेच भाव दिसू न देता तो म्हणाला,

"नाही. आता ते शक्य नाही."

"का? का शक्य नाही?"

"तुला माहीत नाही का की त्यांच्याशी आपलं शत्रुत्व आहे ते."

"आहे माहीत. परंतू माझा भाऊ तसा नाही. मी ओळखते त्याला. तो तर शत्रुत्व विसरलाही असेल. तुम्हीच घेवून बसलात आर्य शत्रुत्व."

"ठीक आहे. तुला जसं वाटते तसं कर. परंतू त्याचे व्यतिरिक्त दुसरा पर्याय नाही का? भिष्म आहेत ना. माझे मोठे पिता."

"यावर दुसरा उपाय नाहीच. भिष्म आहेत. परंतू ते राज्याचा राज्यकारभार सांभाळतात. शिवाय ते कार्य करीत असतांना त्यांचेजवळ पुरेसा वेळ नाही. मग ते राज्यकारभार पाहतील की आपल्या बाळांकडे लक्ष देतील. त्यासाठी असा विश्वासू व्यक्ती हवा की नाही?"

"हो पण त्यानं कोणता विश्वास ठेवला. ते प्रकरण गुप्त ठेवलं पतीमरणाचं. माझ्या मृत्यूसाठी डाव रचला होता ना तो. बरं झालं माझ्या मोठ्या पित्यांना ते माहीत होतं तर. त्यांनीच उपाय सुचवला व तुझा विवाह एका प्राण्याशी लावून दिला. म्हणून मी वाचलो. तुला मिळालेल्या

शापानुसार जर त्या प्राण्याशी तुझा विवाह केला नसता तर मी वाचलो असतो का? मी केव्हाच यमसदनी पोहोचलो असतो. म्हणूनच टाकलं मी पुर्ण गांधारला तुरुंगात. त्यात माझं काय चुकलं?"

"आर्य, अहो विचार करा की तुम्ही आंधळे होते. तुम्हाला साधी आंधळीच मुलगी विवाहासाठी मिळत नव्हती. त्यात डोळस कुठून मिळणार! विचार करा आणि आभार माना की मी तुम्हाला मिळाले. नाहीतर आयुष्यभर तुम्हाला अविवाहितच राहावं लागलं असतं. अन् हं, माझ्या शापावर काही ना काही उपाय नक्कीच निघाला असता."

ते गांधारीचं बोलणं. तसं बोलणं होताच धृतराष्ट्र भडकला व ओरडत म्हणाला,

"तू तर डोळस होती. मग कशाला बांधली डोळ्याला पट्टी?"

"सुंदर होती ना. अति सुंदर होती. माझे डोळेच एवढे सुंदर होते की तसे जगात कुणा ललनेचे डोळे नसावेत. परंतू मला मी तेवढी सुंदर असूनही तुमच्याशी विवाह करावा लागला."

"डोळ्याला पट्टी का बांधली तेवढं सांग?"

"मी जर माझ्या डोळ्याला पट्टी बांधली नसती तर माझं मन सतत तुम्हाला पाहून मलाच कोसत राहिलं असतं हे विसरु नका. म्हणून बांधली पट्टी. परंतू आता विचार आहे. आता आपल्या बाळाचा विचार आहे. वाटतं

की आपल्या बाळावर असा जवळचा कोण संस्कार करणार. प्रश्न आहे, म्हणून म्हणते आहे की बोलवू का मी माझ्या भावाला?"

"मी जेष्ठांना विचारतो."

"कोणत्या जेष्ठांना विचारता?"

"मोठे पिता भिष्म, आचार्य द्रोण की विदूर."

ते धृतराष्ट्रचं बोलणं. तशी ती म्हणाली,

"जेष्ठ काय खाक तुम्हाला सल्ले देणार तुमच्या लेकराबद्दल? लेकरं तुमचे की त्यांचे. आर्य ते द्वेषच करणार तुमच्या मुलांचा. कोणाचा सल्ला घेणार त्या भिष्मांचा. अहो, ते तुमच्या आईमुळं राजगादीवर बसू शकले नाहीत. म्हणून तुम्ही बसलात. ते राजगादीवर बसू शकले नाहीत. याचं काही तरी शल्य असेल ना त्यांच्या मनात. अन् ते विदूरजी. त्यांची इच्छा नसेल का पांडूनं राजपाट सोडल्यावर राजा बनायची. वाटत असेलच ना की धृतराष्ट्र आंधळे आहेत आणि पांडूला शाप आहे. आता मीच राजा बनणार. तसं पाहता ते दासीपुत्र आहेत. त्यांचा सल्ला का घ्यायचा? अन् तो द्रोण. त्यांना फक्त शिकविण्यात पुरतंच ठेवावं. राज्यकारभारात ढवळाढवळ करु देवू नये. आता माझं ऐका. मी आपल्या भावाला हस्तीनापुरात बोलावते म्हणजे बोलावते. आता तुम्ही नाही म्हणू नका."

ती गांधारीची इच्छा. त्या इच्छेपुढे धृतराष्ट्रचं काहीही चाललं नाही. त्यानंतर तिनं गांधारला निरोप पाठवला आणि सांगीतलं की निरोप मिळताच शकुनीनं ताबडतोब निघून यावं.

हस्तीनापुरातून गांधारला निरोप आला होता. तसं पाहता तो निरोप ऐकून गांधार नरेश शकूनी फारच खुश झाला होता. तसा तो निरोप ऐकताच शकुनीच्या मनात बदल्याची भावना उन्मळून आली व त्यानं ठरवलं की आता जावं हस्तीनापुरला आणि पुर्ण हस्तीनापुरला धुळीस मिळवावं व बदला घेवून आपल्या आईवडीलांचं आणि आपल्या प्रजाजनांचं स्वप्न पुर्ण करावं.

तो कुटील डाव. तो डाव ना गांधारीला माहीत होता, ना धृतराष्ट्रला. सगळे कसे बेसावध होते. शकुनी इथं हस्तीनापुरात येवून असाही धुर्त चाली चालेल वा डाव रंगवेल हेही काही माहीत नव्हतं. त्यामुळंच ते माहिती न पडल्यानं त्याला हस्तीनापुरात बोलावलं गेलं होतं.

प्रजाजनांचं ते स्वप्न. ते स्वप्न पुर्ण करण्याचा तो विचार नव्हे तर हस्तीनापुरातून स्वतःवरील झालेल्या अत्याचाराचा बदला घेण्याचा तो विचार. तसा शकूनी खुश झाला. तसा खुश होताच त्यानं गांधारच्या राजगादीवर आपल्या बाळाला बसवले. ज्याचं नाव उलूपी होतं व तो त्या राजपाटावरुन संन्यास घेवून हस्तीनापुरात आला. सोबत असलेला त्याचा

तुटलेला पाय त्याला वारंवार बदल्यासाठी खुणावत होता. बदला घेण्यासाठी तो पाय इशारा करीत होता.

*************************

तो हस्तीनापुरातील राजमहल. त्या राजमहालात शकुनी स्थिरावला होता. ती वेळ हस्तीनापुरसाठी आता योग्य राहिली नव्हती.

गांधारीची मुलं लहान होती. त्याचबरोबर कुंतीचीही मुलं लहान होती. ती सोबत सोबत एकमेकांसोबत खेळत असत. त्यांच्यात कधी कोणत्याही कारणांवरुन किरकोळच भांडणं व्हायची. त्यातच ती मुलं ती भांडणं आपल्या जवळचा असलेल्या शकुनीजवळ आणायची. तेव्हा शकुनी ती भांडणं मिटवीत नसे. तो त्यात अजून अंगार टाकत असे. तो त्या मुलांच्या लहानपणापासूनच गांधारीच्या मुलांची बाजू घेत असे ती भांडणं वा तंटे सोडवितांना आणि कुंतीच्या मुलांना वाईट ठरवत असे. यातूनच हळूहळू पांडव व कौरवात लहानपणापासूनच द्वेष भडकू लागला. तसं पाहता शकुनी चाणाक्ष बुद्धीमत्तेचा होता. तो ओळखून होता की ही कुंतीची मुलं पाच जरी असली तरी यांना विलक्षण बुद्धीमत्ता आहे व हे बुद्धीमत्तेच्या जोरावर कौरवांचा सहजच पडशा पाडू शकतील.

सर्व मुलं, मग ती कुंतीची का असेना वा गांधारीची. ती सर्वजण वेदविद्येत पारंगत होती. मात्र त्यांना चौसर विद्या येत नव्हती. ती चौसर विद्या फक्त कौरवांना शकुनी लहानपणापासूनच शिकवीत होता. ती गांधारीची मुलं, ज्या अपेक्षेनं गांधारीनं शकुनीला बोलावलं होतं गांधारवरुन. शकुनीकडून संस्कार करुन घेण्याचा उद्देश होता तिचा. ती अपेक्षा फोल ठरली होती. शकुनी गांधारीच्या मुलावर संस्कार करण्याऐवजी कुसंस्कार करीत होता. ती बाब इतर सर्वांच्या लक्षात आली होती. परंतू त्याबद्दल कोणीच बोलण्याचं धाडस करीत नव्हतं. एखाद्यानं तसं धाडस केल्यास त्याची एकांतवासात गांधारी चांगलीच खरडपट्टी काढत असे.

धृतराष्ट्र आंधळा, त्याचबरोबर गांधारीही आंधळी. एखाद्या वेळेस कोणी शकुनीबद्दल कुरकूर केल्यास वा कुरघोडी केल्यास ती त्या शकुनीला बोलवत असे व शकुनीला जाब विचारत असे. परंतू तो तिच्याजवळ आपल्याबद्दलचा संभ्रम एवढ्या सफाईनं सांगत असे की तिला त्याचेवर विश्वास ठेवावाच लागत असे. मात्र तिही डोळ्याला पट्टी बांधून असल्यानं तिच्या लक्षात शकुनीचा विश्वासघात आला नाही. त्यातच तिच्या बाळाच्या अगदी लहानपणापासूनच हस्तीनापुरातील कुळविनाशाची चिन्हं दिसायला लागली होती.

आज ती कौरव मंडळी लहानाची मोठी होत होती. त्यांच्यावर कुसंस्कार पडत चालले होते शकुनीचे. शकुनी तसा बुडवायलाच लागला होता हस्तीनापुरला. तो षडयंत्र करीत होता हस्तीनापुरसोबत. परंतू ती बाब बऱ्याच हस्तीनापुरातील लोकांच्या लक्षात येत नव्हती. काहींच्या लक्षात येत होती. ते पर्यायानं धृतराष्ट्रला टोकतही असत. परंतू धृतराष्ट्र मी विवश आहे असा हवाला देवून त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत असे. अशाच टोकणाऱ्यात होता संजय.

संजय क्रिष्णाचा भक्त होता. तसं पाहता तो धार्मीकही होता. त्यातच तो नित्यनेमानं धृतराष्ट्रला समजावीत असे. सांगत असे की शकुनी आपल्या बाळांवर कुसंस्कार टाकतोय. त्याला थांबवावं. परंतू त्यावर धृतराष्ट्र आपल्या मुलांना ताकीद न देता त्यांच्या चुकांवर पांघरुण घालत असे.

चौसरचा खेळ रंगला होता. पांडव प्रत्येक डाव हारत चालले होते. शकुनी फासे फेकत होता. ते फासे त्याच्या वडीलाच्या अस्थीचेच बनवले होते. त्यामुळंच तो म्हणेल तेवढेच आकडे यायचे व युधिष्ठीर बाजी हारायचा.

बाजी पुर्णतः फसली होती. इंद्रप्रस्थ हातचं निघून गेलं होतं. तो स्वतःलाही गमवून बसला होता. आता डाव होता आपल्या भावाला डावावर लावण्याचा. युधिष्ठीरनं तेही केलं होतं. त्यानं एकएक करीत सर्व

भावांना डावावर लावलं होतं व सर्वांना तो गमवून बसला होता. आता सर्व संपलंय असा विचार करीत युधिष्ठीर डोक्यावर हात ठेवून बसला होता. तोच दुःशासन म्हणाला,

"आणखी एक वस्तू राहिली डावावर लावण्यासाठी."

ते बोलणं. तसं सर्वांनी एकमेकांकडं पाहिलं. तसं कोणीतरी विचारलं,

"कोणती वस्तू राहिली?"

"वहिणी. द्रोपदी राहिली ना डावावर लावण्यासाठी."

"नाही. ती माझी भार्या आहे. मी तिला डावावर लावणार नाही."

ते युधिष्ठीरचे शब्द. तसा शकुनी बोलला,

"युधीष्ठीरा, तुझी पत्नी म्हटलं तर, साक्षात लक्ष्मी. जर तिचा आशिर्वाद मिळाला आणि तू डाव जिंकला तर सारं दुर्योधन परत करेल. हे राज्य आणि तुझ्यासह हे तुझे बांधवही. बोल काय वाटतं तुला? तुला हे सर्व पाहिजे की तुझी पत्नी. हो ना रे दुर्योधना."

"होय. ती एक वस्तू आहे तुमच्याजवळ. सारं परत करायला मी तयार आहे. हारशील तर एकच वस्तू ना. सर्व तर गेलंच तुझं आता तिलाच वाचवून का ठेवतोस? खेळून पाहा शेवटचा डाव. कदाचीत तुझा भाग्योदय होईल."

"नाही. मी तिला अजिबात लावणार नाही."

"पाहा.......विचार कर. विचार कर. सारं मिळवायचं की सारं समाप्त करुन वनात जायचं कायमचं."

युधिष्ठीर विचार करु लागला. त्याच्या लक्षातच येत नव्हता तो कुटील डाव. तो विचार करीत होता की मी बेकारच खेळलो हा कुटील डाव. खेळणार नव्हतोच मी. परंतू काय करु. खेळावा लागला. उकसवलं या शकुनीनं डाव खेळायला. आतं तर सगळंच गेलं. काही बाकी राहिलं नाही. राज्य गेलं. भाऊबंद गेले. आता शेवटची उरली ती माझी पत्नी द्रोपदी. तीच बाकी आहे. मग तिलाच कशाला उरवून ठेवू? कदाचीत तिच्या पायगुणानं जिंकलो तर........ तर कदाचीत हे राज्य अन् माझे भाऊबंदही मला परत मिळतील. अन् हारलोच तर आम्ही गेलो तशी तिही गेली. तसंही पाहिलं तर, सारंच गेलं आहे ना. बाकी तर काहीच राहिलं नाही. मग द्रोपदीलाही का उरवायचं.

त्याचं मन. हे त्याचं मन त्याला खात होतं. तसं पाहता आता त्यानं स्वतः मनानं विचार केला. विचार केला की आपण द्रोपदीला डावावर लावायचं. जिंकलो तर सारं मिळेल. हारलो तर हारलो.

युधिष्ठीरनं मनात केलेला विचार. तो विचार गृहीत धरुन युधिष्ठीरनं त्या द्युतक्रिडेत द्रोपदीला डावावर लावलं. तसे शकुनीनं फासे फेकले आणि

काय आश्चर्य. ते फासे फेकताच डाव गडगडला. युधिष्ठीर पुन्हा फाशात फसला व हारला.

युधिष्ठीर हारला होता द्युतक्रिडेत. त्यानंतर त्यानं मान खाली घातली. तसा त्याला पश्चाताप होत होता. त्यानं तसं मान खाली घालताच त्याचे सर्व भाऊबंदही मान खाली घालून होते.

द्युतक्रिडेत युधिष्ठीर द्रोपदीला हारुन बसला होता. तसा दुर्योधनाचा बदला पुर्ण झाला होता. कारण त्या द्रोपदीनं ती इंद्रप्रस्थला असतांना दुर्योधनाचा अपमान केला होता. ज्यावेळेस दुर्योधन इंद्रप्रस्थला पाहूणा म्हणून गेला होता. तेव्हा तेथील भुलभुलैयात तो फसला होता व त्या भुलभुलैयात फसून तो पडला होता. ते पाहात असतांना द्रोपदी हसली होती. ती केवळ हसलीच नव्हती तर ती आंधळयाचा मुलगा आंधळाच अशी उपहासानं म्हणाली होती. त्यामुळंच ते उपहासाचं बोलणं. ते बोलणं त्या दुर्योधनाला अपमानास्पद वाटलं होतं. त्या दिवसापासूनच त्यानं ठरवलं होतं की आपण आपल्या झालेल्या अपमानाचा बदला घ्यायचा. तसं पाहता त्याच प्रसंगाची तो वाट पाहात होता.

तो प्रसंग........ तो प्रसंग आज चालून आला होता. आज युधिष्ठीर द्युतक्रिडेत द्रोपदीला हारल्यानं चालून आलेली संधी तो गमवू पाहात नव्हता. ती संधी येताच दुर्योधन दुःशासनाला म्हणाला,

"दुःशासना, जा. अन् द्रोपदीला घेवून ये. ही माझी मांडी तिला बसविण्यासाठी तयार आहे. तसं पाहता आता ती आपली दास आहे."

ते शब्द........ ते शब्द ऐकताच युधिष्ठीरला दुर्योधनानं एक चापट गालपटात जोरात मारल्यासारखी वाटली. त्यानं मनोमन दातओठ खाल्ले. त्याचबरोबर त्याच्या भावांनीही. परंतू ते आता दास बनले होते. अन् दास हे गुलामच असतात. याची त्यांना आठवण होती. म्हणून तेही बोलू शकत नव्हते. द्रोपदीचा गुन्हा नसतांनाही.

तेच ते शब्द. ते शब्द ज्याप्रमाणे युधिष्ठीरनं ऐकले. तसे ते शब्द दुःशासनानंही ऐकले. तसा तो म्हणाला,

"बंधू, ती नाही आली तर......?"

"तर ओढत आण. फरफटत आण. अन् तसंही नाही आणता आलं तर केसं पकडून फरफटत आण. कसंही करुन आण म्हणजे झालं."

"ठीक आहे बंधू. जातो मी आता आणि आणतोच तिला. अशी नाही आली तर ओढत आणतो एखाद्या जनावरासारखं. मलाही पाहायचं आहे त्या द्रोपदीला तुमच्या मांडीवर बसलेलं."

दुर्योधनानं आदेश देताच दुःशासन द्रोपदीच्या महालाकडे निघाला. तो गेल्यावर सारे दरबारी गप्प होते. परंतू संजय बोलत होता. म्हणत होता,

"महाराज, द्रोपदी तुमची पुत्रवधू आहे. जरा थांबवा हे कृत्य आपल्या मुलाच्या हातून घडणारं. कारण मला यातून हस्तीनापुरच्या विनाशाचे चिन्हं दिसत आहेत."

ते संजयचं बोलणं. तसं त्या बोलण्याकडं धृतराष्ट्रनं दुर्लक्ष केलं. त्यानंतर त्या भरल्या सभेत द्रोपदीला दुःशासनानं केस धरुन ओढत फरफटत आणलं. त्यानंतर तिची विटंबनाही केली गेली. एवढंच नाही तर तिला आणि तिच्या पतींना बारा वर्षाच्या वनवासासाठी व एका वर्षाच्या अज्ञातवासासाठी पाठविण्यात आलं. त्यातूनच महाभारताच्या अठरा दिवस चाललेल्या युद्धाची बीजं रोवली गेली व संपूर्ण कौरव वंशाचा नाश झाला.

**************************

युद्ध सुरु होणार होतं. तसं पाहता ते युद्ध होवू नये म्हणून सर्वांनीच प्रयत्न केले. त्यात विशेष म्हणजे क्रिष्ण आणि वेदव्यासाचा समावेश आहे. क्रिष्णानं यासाठी प्रयत्न केले. कारण दुर्योधन हा त्याचा व्याही होता तर व्यासांनी यासाठी प्रयत्न केला. कारण व्यास हा धृतराष्ट्र आणि पंडूचा पिता होता. व्यासाला माहीत होतं की जर यात पांडव मरण पावले तर आपलीच नातवंड मरतील आणि कौरव मरण पावले तरही आपलेच नातवंड मरतील.

याच हव्यासामुळं व्यास अडवत चालला होता. तो हस्तीनापुरला वाचविण्याचे प्रयत्न करीत होता. परंतू त्याचे सर्व प्रयत्न विफल ठरले. त्याचं कारणही तसंच होतं. दुर्योधन हा शकुनीनं चढवलेला एक अजगर होता. तो सर्व परीनं हस्तीनापुरातील राजगादी गिळंकृत करु पाहात होता. तो शकुनीचंच ऐकत असे नव्हे तर शकुनीच्याच विचारानं चालत असे. मग तो शकुनीचं बरोबर आहे की नाही याचा विचार करीत नसे वा त्याची कोणत्याही स्वरुपाची शहानिशा करीत नसे.

सर्वांनी आपआपल्या पद्धतीनं सर्वांना समजावून पाहिलं. युद्ध टाळण्याचे बरेच प्रयत्न झालेत. परंतू युद्ध टळलं नाही. व्यास आणि क्रिष्णानंही प्रयत्न केले. परंतू ते सारे फोल ठरले. संजयनंही धृतराष्ट्रला बरेचदा समजावून सांगीतलं. परंतू तोही अपयशी ठरला. त्यातच संजय चूप बसला. त्यामुळंच की काय आता युद्धाला रोकता येत नव्हतं. ते सुरु होणारच होतं.

युद्ध सुरु झालं होतं. संजय एक बातमीदारच नाही तर एक योद्धाच होता. त्यानं युद्ध सुरु होताच आपणही कौरवाचे देणे लागतो असा विचार करुन त्यानं सुरुवातीस भाग घेतला आणि तो युद्ध लढू लागला. तोच त्या युद्धात त्याच्यासमोर सात्यकी आला.

सात्यकी समोर येताच त्या दोघांमध्ये तुंबळ युद्ध सुरु झाले. एकमेकांचे बाण एकमेकांना लागायला लागले. तसे ते दोघंही रक्तबंबाळ झाले होते. तसा सात्यकी शूरच होता. त्याच्या बाण चालविण्याच्या कलेसमोर संजयचं काहीच चाललं नाही व थोड्याच वेळात सात्यकीनं त्याला बंदी बनवलं.

सात्यकीनं संजयला बंदी बनवलं होतं. तसा तो जीवंतच होता. सारे पांडव त्याला पाहात होते. तसं पाहात असतांना त्या पाच पांडवापैकी भीम म्हणाला,

"याला कशाला जीवंत ठेवता. तसं पाहता कौरवाकडील सारीच मंडळी आपले शत्रू आहेत. त्यामुळंच त्यांना ठार करणे हे आपलं आद्य कर्तव्य आहे."

भीम जे बोलायचं ते बोलून गेला. त्यानंतर ते बोलणं ऐकताच सात्यकीनं म्यानातून तलवार उपसली व आता तो संजयची मान कापणार. तोच तिथं व्यासांचं आगमण झालं.

व्यासानं ते वियोगी दृश्य पाहिलं. तसा ताबडतोब निर्णय घेत तो म्हणाला,

"सात्यकी थांब. त्याचा वध करु नकोस. त्याचा जन्म मुळातच ठार होण्यासाठी झालेला नाही. त्याचा जन्म फार मोठ्या वेगळ्याच कारणासाठी झालेला आहे. त्याला सोडून दे."

ते व्यासाचं बोलणं. ते बोलणं ऐकताच सात्यकीनं त्याला सोडून दिलं व तो दुसऱ्यासोबत युद्ध लढण्यास निघून गेला.

व्यासानं संजयचा जीव वाचवला होता. त्यांचे उपकारच झाले होते संजयवर. तसा संजय आज उपकाराच्या छत्रछायेत होता. व्यासानं त्याला युद्धमैदानातून राजमहालात आणलं. त्यातच त्याला धृतराष्ट्रजवळही आणलं. त्यानंतर त्याला आपल्या युद्धमैदानातून झालेल्या जखमांवर उपचार करायला लावले.

संजय आपल्या कक्षात गेला होता. तोच एकांतवासात असलेल्या धृतराष्ट्रला व्यास म्हणाले,

"पुत्रा, माझ्याकडे दिव्यदृष्टीचं एक वरदान आहे. वाटल्यास त्याचा वापर करुन तू संपूर्ण युद्ध आपल्या स्वतःच्या डोळ्यानं पाहू शकतोस. बोल, मी तुला दिव्यदृष्टी देवू काय?"

व्यासाचे ते शब्द. ते शब्द ऐकताच धृतराष्ट्र म्हणाला,

"नाही. मला दिव्यदृष्टी देवू नका. मला नकोय ती दिव्यदृष्टी. कारण मला माहीत आहे की या युद्धात बराचसा नरसंहार होणार आहे. पुत्र हेही

माझेच आणि तेही माझेच. कारण माझा भाऊ.....माझा भाऊ पंडू आज काही जीवंत नाही. तो जर आज जीवंत असता तर काळजी नसती मला. त्यामुळं माझे पुत्र मरण पावले तर ते दुःख मलाच होईल आणि माझ्या बंधूचेही पुत्र मरण पावले तर तेही दुःख मलाच होईल. ते दुःख मी पाहू शकणार नाही. असं जर झालं तर मला अतिशय राग येईल व त्या रागाच्या भरात माझा संयम हारवेल. त्यानंतर माझ्यात असलेल्या दिव्य शक्तीच्या आणि ताकदीच्या भरवशावर मी त्यांनाही नष्ट करेल यात शंका नाही."

व्यास काय समजायचं ते समजले. त्यांना माहीत होतं धृतराष्ट्रमधील अलौकिक शक्तीबद्दल. ती शक्ती तद्नंतरच्या काळात दिसून आली होती. जेव्हा युद्ध समाप्त झालं होतं व धृतराष्ट्रनं भीमाला आलिंगण केलं होतं. त्यावेळेस धृतराष्ट्रसमोर क्रिष्णानं सांगीतल्याप्रमाणे पाषाणी पुतळा नेला होता. तेव्हा त्या धृतराष्ट्रनं त्या पुतळ्याला आलिंगण देताच त्या पुतळ्याला पुर्णतः चकनाचूर केलं होतं.

व्यासांना धृतराष्ट्रनं म्हटलेले शब्द. तसा व्यास समजदारच होता. दिव्यदृष्टीचा दाता होता. तो म्हणाला,

"ठीक आहे पुत्रा, मी तुझी व्यथा समजतो. परंतू तुही या युद्धापासून अंधारात राहायला नको. मी संजयला दिव्यदृष्टी अर्पण करतो. जेणेकरुन तो तुला त्या दिव्यदृष्टीनं पुर्णतः युद्धमैदानातील हालचाल सांगू शकेल."

"ठीक आहे." धृतराष्ट्र म्हणाला.

व्यासांनी धृतराष्ट्रनं दिव्यदृष्टी नाकारताच संजयला दिव्यदृष्टी प्रदान केली. त्यानंतर संजयनं यथोचीत संपुर्ण युद्धभुमीतील वर्णन जसेच्या तसे धृतराष्ट्रला सांगीतले. त्यात त्यानं अगदी खरं खरं सांगीतलं. कोणताही भाग लपवून ठेवला नाही. मग त्या बऱ्यावाईट घटना का असेना. तोच जगातील पहिला बातमीदार ठरला. कोणी याला दिव्यदृष्टी म्हणतात तर कोणी त्याला वास्तविकता. वास्तविकता अशी की संजय सकाळीच अगदी पहाटेला युद्धमैदानावर जात असे व पहाटेपासूनच तर अगदी अंधार पडेपर्यंत युद्ध मैदानावरील वर्णन करीत असे. तो सभोवताल फिरत असे आणि ती माहिती हस्तीनापुरात येवून व्यासानं आदेश दिल्यानुसार धृतराष्ट्रला सांगत असे अगदी हुबेहूब. त्यात तो किंचीतही लहानशीही गोष्ट तो लपवीत नसे.

त्यानं संपूर्ण युद्धभुमीचं वर्णन केलं होतं. त्यात भिष्म कसे मरण पावले? द्रोणाचार्यला कोणत्या डावानं मारलं? कर्ण कसा मरण पावला? त्यानंतर अभिमन्यूला कसं मारण्यात आलं? जयद्रथ कसा पांडवांच्या जाळ्यात सापडला? वैगेरे वर्णन अगदी निःसंकोचपणे धृतराष्ट्रला सांगीतलं होतं. त्यातच शकुनी आणि दुर्योधन दुःशासनासह शंभर कौरव कसे यमसदनास पोहोचले? याचंही वर्णन केलं होतं संजयनं. आज युद्ध समाप्त झालं होतं.

आज युद्ध समाप्त झालं होतं. परंतू संजयच्या दिव्य ज्ञानानं धृतराष्ट्रला युद्धाच्या ठिणग्या अनुभवता आल्या. तसा विचार केल्यास त्यावेळी हस्तीनापुर ते रणमैदान असलेलं कुरुक्षेत्र याचं जवळपास अंतर दिडशे किमी होतं. ते अंतर अतिशय त्रेधातिरपीट करुन संजय पार करीत असे व यथासांग त्या रणमैदानातील गोष्टी धृतराष्ट्रला सांगत असे. तो होता म्हणून त्या आंधळ्या धृतराष्ट्रला युद्धाचा थरार माहीत पडला. ते घोड्यांचे आवाज, ते योद्ध्यांचे किंकाळणे, तो हत्तीचा चित्कार. तसंच रोजचं त्या योद्ध्यांचं मरण तो धृतराष्ट्रला सांगत असल्यानं प्रत्यक्ष डोळे नसूनही धृतराष्ट्रला ते प्रसंग पाहता आले. तसं पाहता युद्ध समाप्त होताच ती व्यासाकडून संजयला मिळालेली दिव्यदृष्टी समाप्त झाली होती.

युद्ध समाप्त झालं होतं. सर्व कौरव संपले होते. शेकडो अश्व व हत्तीचा ढीग लागला होता. मृतदेह सडत होते. तिथं प्रत्यक्षपणे अगदी दूरपर्यंत दुर्गंधी पसरली होती. तसं पाहता रक्ताचा सडा पडला होता बराच लांबवर.

युद्ध समाप्त झाल्यानंतर त्या गादीवर धृतराष्ट्र जावून पंडू पुत्र युधिष्ठीर विराजमान झाला होता. तोच आता राज्यकारभार पाहात होता. सर्व प्रजा सुखी होती. मात्र धृतराष्ट्र सुखी नव्हता. संजय आजही त्यांची सेवा करीत होता.

संजय नित्यनेमानं त्या आंधळया धृतराष्ट्रजवळ राहात असे. त्याचं मन हलकं करीत असे. त्याला चांगल्या चांगल्या गोष्टी ऐकवीत असे. तसं पाहता त्यांचं मनोरंजन करीत असे. परंतू कितीही त्यांचं संजय मनोरंजन करीत असला तरी धृतराष्ट्र दुःखी होता. कारण जरी त्याची युधिष्ठीर चांगली सेवाशुश्रृषा करीत असला तरी त्याची सख्खी मुलं आज जीवंत नव्हती. तेच शल्य आज त्याला टोचत असे.

आज त्याला करमत नव्हतं राज्यात. जरी अमाप प्रमाणात अपार सुख असलं तरी. म्हणूनच की काय त्यानं ठरवलं. आपण आता राज्यातून संन्यास घ्यायचा. तसा संन्यास घेवून आपण वनात निघून जायचं. तसा त्याचा निर्णय. तसा तो एकदाचा दिवस उगवला.

तो दिवस. त्या दिवशी धृतराष्ट्रनं युधिष्ठीरला दरबार भरवायला लावला व भरल्या दरबारात कैफियत मांडली. 'मला इथं करमत नाही. मला वनात राहायला जायचं आहे.'

ते धृतराष्ट्रचं बोलणं. तसा त्यावर युधिष्ठीर म्हणाला,

"पिताश्री, आपल्याला माझ्या राज्यात काय कमी आहे की आपण वनात राहायला जायला तयार झाले. वाटल्यास मी आपली याच महालात एक कुटी बांधून देतो."

ते युधिष्ठीरचे बोल. त्यावर धृतराष्ट्र म्हणाला,

"नाही. मला जावू दे युधिष्ठीरा. मलाही राहू दे काही दिवस वनात."

ते धृतराष्ट्रचे बोल. कधी युधिष्ठीर प्रश्न विचारायचा तर कधी धृतराष्ट्र. परंतू दोघंही काही ऐकत नव्हते एकमेकांचे. ते पाहून शेवटी युधिष्ठीर म्हणाला,

"ठीक आहे पिताश्री. तुम्हाला जायचं असेल तर खुशाल जा. परंतू कोणालातरी सोबत घेवून जा. तेवढं मात्र करा."

"ठीक आहे पुत्रा." धृतराष्ट्र म्हणाला व त्यावर विचार करु लागला.

तो धृतराष्ट्र त्यावर विचार करु लागला. तसा विचार करता करता तो वैतागला. कारण त्याला बोचत असलेलं शल्य आजही संपलेलं नव्हतं. ते शल्य संपणार नव्हतं. ते शल्य त्यानं गांधारी, संजय यांना सांगीतला व गांधारीनं कुंतीला. त्या सर्वांनी धृतराष्ट्रसोबत वनात जायचं ठरवलं. त्यानंतर त्यांनी तसा विचार करुन वनात राहायला जायचं ठरवताच ते युधिष्ठीरला सांगून टाकलं व ते वनात गेले.

आज ते वनात गेले होते. तसंच वनात जातांना धृतराष्ट्रनं कुंती, गांधारी, विदूर व संजयला सोबत नेलं होतं. धृतराष्ट्र त्या सर्वांसोबत वनात कुटी बांधून राहात होता. संजय त्याची तिथंही नित्यनेमानं सेवा करीत होता. सर्व कसे अगदी आनंदानं व गुण्यागोविंदानं राहात होते. ते अगदी

गुण्यागोविंदानं राहात होते. तसं ते जंगल. त्या जंगलात एक दिवस आग लागली.

धृतराष्ट्रचं तो वनात अधिवास. तशी एक दिवस त्या जंगलाला आग लागली व ती आग हस्तीनापुरातील त्या आंधळ्या महाराजांच्या कुटीतही पोहोचली.

धृतराष्ट्रच्या कुटीला आग लागली होती. तसं पाहता तो आंधळा होता. संजय कुठंतरी बाहेर गेला होता. मात्र तिथं गांधारी, कुंती व विदूर होते.

धृतराष्ट्रच्या कुटीला आग लागताच व ती आटोक्यात येत नाही हे पाहून धृतराष्ट्रला वाचविण्यासाठी कुंती व विदूरानं प्रयत्न केला. परंतू त्यात त्यांना यश आले नाही. प्रसंगी धृतराष्ट्रला वाचविण्याच्या प्रयत्नात कुंती व विदूर आगीत जळून मरण पावले. त्यातच गांधारीही. तिनं तर कितीही संकट आलं तरी आपण आपली डोळ्याची पट्टी उघडणार नाही असा प्रण डोळ्याला पट्टी बांधताच केल्यानं तिनं ती जंगलाला प्रत्यक्ष आग लागूनही आपल्या डोळ्यावरील पट्टी उघडली नाही. त्यामुळंच तिही त्या आगीत भष्म झाली.

ती आग.......ती आग लागताच संजय वनातून परत आला होता. त्यानं पाहिलं की ती आग जशी जंगलाला लागलेली आहे तशी धृतराष्ट्रच्या कुटीलाही. तसा तो आंधळ्या धृतराष्ट्रचा वरदहस्त होता. कोणी म्हणतात

की संजय आंधळया धृतराष्ट्रला वाचविण्याच्या प्रयत्नात आगीमध्ये धृतराष्ट्र, कुंती, गांधारी व विदूर यांच्याबरोबरच जळून भष्म झाला होता तर कोणी म्हणतात की त्याला धृतराष्ट्रनं निघून जा असा आदेश दिला होता.

ती आग....... ती आग लागली होती. तसा वनात गेलेला संजय वनातून परत येताच त्यानं धृतराष्ट्रला आधार देण्याचा प्रयत्न केला. तरीही तो ऐकत नव्हता. ते पाहून त्यानं आदेश दिला. तो आदेश मिळताच संजय तेथून निघाला. तसा तो रस्त्यानं चालत होता.

संजय रस्त्यानं चालत होता. तो विचार करीत चालला होता. त्याला करमत नव्हतं. तसा तो आधीपासूनच धृतराष्ट्रची सेवा करीत असल्यानं त्याला धृतराष्ट्रची आठवण येत होती. तशी त्याला विदूर, गांधारी व कुंतीचीही आठवण यायची. परंतू ती आठवण येताच त्याला जगावंसं वाटत नव्हतं.

संजय चालत होता ती पायवाट. तसा चालता चालता तो हिमालयात पोहोचला. तेथील निसर्गरम्य वातावरणात तो रमला. त्यानं हिमालयात तपश्चर्या केली. तशी तपश्चर्या करता करता एक दिवस तो मरण पावला.

संजय समाप्त झाला होता. तोच एकमेव साक्षीदार होता. संपूर्ण महाभारत त्यानंच अनुभवलं होतं. त्यानं आपल्या दिव्यदृष्टीच्या आधारावर क्रिष्णाचं दिव्य रुप पाहिलं होतं.

संजय हिमालयात वास्तव्यास होता. तेव्हा त्याला आठवत होता त्याचा भुतकाळ. त्यानं केलेली पांडवांना मदत आणि त्यानं सांगीतलेल्या धृतराष्ट्रच्या गोष्टी. आज समुळ स्वरुपात कुरुवंशाचा नाश झाला होता. अधर्मावर धर्मानं विजय मिळवला होता. काय मागणी होती धर्माची. फक्त त्यांचा हक्क मिळावा. परंतू दुर्योधनानं म्हटलं होतं की ही माझ्या काकाची मुलं नसून वनात एका वेगळ्या पद्धतीनं झालेली मुलं आहेत. त्याला नियोग पद्धती मान्य नव्हती. त्यामुळंच दुर्योधन म्हणत होता की मी अगदी सुईच्या टोकावर मावेल एवढीही भुमी पांडवांना देणार नाही.

हस्तीनापुर अखंड राज्य होतं. त्याचा विस्तार भिष्मानं युद्ध लढून बराच केला होता. अनेक राजे भिष्माचा पराक्रम पाहून मांडलिक झाले होते. त्यातच अशा विस्तारीत केलेल्या अखंड प्रदेशाचे दुर्योधन दोन तुकडे करु पाहात नव्हता. शेवटी वडीलधारी मंडळींनी समजविल्यामुळं पांडवांना पाच गावं दिली गेली. त्यातील इंद्रप्रस्थ. इंद्रप्रस्थ हा जो भाग पांडवांना देण्यात आला होता. तो बंजर झालेला भाग होता. तिथं कोणीही जीवंत राहात नसे. याच इंद्रप्रस्थला असाही एक भाग होता की ज्याला खांडववन म्हणत.

इंद्रप्रस्थ........इंद्रप्रस्थच्या बंजर भागावर मेहनत करुन पांडवानं त्याचं नंदनवन बनवलं. त्याचं स्वरुपही बदलवलं. त्यामुळंच त्याची चर्चा आजुबाजूच्या प्रदेशात पसरली. त्यातच इंद्रप्रस्थ नगरी बनून तयार

झाल्यावर पांडवांनी राजसुर्य यज्ञ केला. त्यावेळी त्यांनी देशोदेशीच्या राज्याला आमंत्रणं पाठवली. त्यातच ते निमंत्रण दुर्योधनालाही आलं.

दुर्योधनाला राजसुर्य यज्ञाचं आमंत्रण मिळताच तो इंद्रप्रस्थला रवाना झाला. त्यावेळेस त्यानं इंद्रप्रस्थची भव्यता अनुभवली. त्यावेळेस त्यानं पाण्याच्या सजावटीच्या जागेला पाण्याची जागा न समजता जमीन समजल्यानंतर तो पाण्यात पडला. त्यावेळेस तिथं उपस्थीत द्रोपदी हसली. त्याची चीड आल्यानं व तो त्याला स्वतःचा अपमान वाटल्यानं भविष्यात त्यानं द्युतक्रिडेचं आयोजन केलं होतं.

संजय हिमालयात वास्तव्यास होता. तेव्हा त्याला आठवत होता त्याचा भुतकाळ. त्यातच त्याला आठवत होतं, त्यानं केलेली कौरवांना मदत. त्यानं धृतराष्ट्रला सांगीतले.

"कुरुक्षेत्रावर पांडवांनी पश्चिमेला तळ ठोकला तर कौरव सैन्य भीष्मांच्या अधिपत्याखाली पूर्वेच्या बाजूस आहेत. अगदी पहाटे पहाटे पांडवांना कौरवांच्या सैन्यात पांढरीशुभ्र छत्री दिसली. ते राजचिन्हं बघून पांडव वीरांची मने थरारून गेली आहेत. अर्जुन व श्रीकृष्णाने आपआपले शंख फुंकले आहेत. त्याचे प्रत्युत्तर कौरवांनी लागलीच दिले आहे. एकूणच युद्धभूमीवर चैतन्य सळसळत आहे. युद्धाचे नियम ठरविले गेले आहेत. दोन समान वीरांमध्येच युद्ध व्हावे, म्हणजे दोन रथी, दोन धनुर्धर, दोन गदाधर,

असे झाले पाहिजे. त्यात एखाद्याने माघार घेतली तर त्याला अधिक छळू नये. जो तयार नसेल अथवा घाबरला असेल त्याला सोडावे. दोघांमध्ये तिसऱ्याने पडू नये. जर शाब्दिक युद्ध असेल तर शब्दांचाच वापर व्हावा. बाण वापरु नये. सेवक, सारथी, घोडे, वाद्य वाजविणारे वादक याच्यावर हल्ला करु नये. असे सर्व नियम ठरले आहेत."

आज धृतराष्ट्रही जीवंत नव्हता. तसंच संजयला फक्त हेच आठवत नव्हतं तर त्याला त्याचा गुरु व्यास व व्यासांनी सांगीतलेल्या गोष्टीही आठवत होत्या. महर्षी व्यास धृतराष्ट्राला म्हणजे आपल्या पुत्राला भेटले. म्हणाले,

"याचा शेवट कौरवांच्या विनाशात होईल. जर हे युद्ध आपल्या डोळयांनी बघायची इच्छा असेल तर मी तुला दिव्य नेत्र देतो." परंतू त्यावर धृतराष्ट्र म्हणाला,

’’माझ्या मुलांचे मृत्यू आपल्याच डोळयांनी पाहण्याची माझी मुळीच इच्छा नाही. मला असा कोणीतरी माणूस द्या. जो युद्ध पाहून त्याचे प्रत्यक्ष वर्णन मला सांगेल. यातच मी समाधान मानेन.’’

त्यानंतर व्यासांनी संजयला अंतर्दृष्टी दिली. ते म्हणाले,

"या दिव्य नेत्रांनी संजय युद्धभूमीवर काय चालू आहे ते सर्व पाहू शकेल, इतकेच नाही तर लढणाऱ्याच्या मनात काय विचार चालू आहेत,

हेही त्याला कळेल. रात्री, दिवसा त्याला सारे दिसेल. तो दिवसभर रणभूमीवर असेल आणि रात्री येऊन तुला सर्व सांगेल. तो कधीही थकणार नाही. मात्र, कौरवांचा पराभव अटळ असून तुझ्या सर्व पुत्रांचा मृत्यू होणार आहे आणि पांडव अंती विजयी होतील."

असे सांगून धृतराष्ट्राचे सांत्वन करून व्यास निघून गेले. मग संजय सांगू लागला धृतराष्ट्रला.

"दुर्योधन सैन्याची व्यवस्था पाहण्यात गुंतला आहे. तो दु:शासनाला सांगतो आहे, उत्तम सारथी आणि उत्तम रथ पितामह भीष्मांना मिळतील असे पाहा. भीष्मांचे रक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. त्या धृष्टद्युम्नाच्या सैन्याचा पराभव करण्याची ताकद त्यांच्यातच आहे. पितामह म्हणाले होते की, ते शिखंडीशी लढणार नाहीत. कारण आधी तो अंबा नावाची स्त्री होता. नंतर लिंग बदलून तो पुरुष झाला. तेव्हा पितामहापासून त्या शिखंडीला काही करुन लांबच ठेवले पाहिजे किंवा त्याला आधी ठार केले पाहिजे. पांडवांना ही गोष्ट माहिती आहे, म्हणून अर्जुन स्वत: शिखंडीचे रक्षण करतो आहे. तेव्हा दु:शासना तू भीष्मांचे शिखंडीपासून रक्षण कर. कौरवांनी दहा अक्षौहिणी सैन्य चौरस व्यूहात उभे केले. अतिशय अभेद्य अशी ही रचना आहे. त्यात एक अक्षौहिणी सैन्य भीष्मांपाशी दिले आहे. ते सर्वात अग्रभागी आहेत. पांढरेशुभ्र अश्व आणि उत्तम चांदीचा रथ त्यांना

दिला आहे. त्यांच्या ध्वजावर सोनेरी ताल वृक्ष आणि पाच तारे यांचे चित्र झळकत आहेत. पांढरेशुभ्र केस, शुभ्र वस्त्रे आणि शुभ्र दाढी यामुळे ते जणू उगवत्या चंद्रासारखे भासत आहेत. सूर्याच्या लाल सोनेरी किरणांनी पूर्व दिशा उजळली आहे. भीष्म आपल्या सेनेस म्हणत आहेत की हे वीरांनो, आज ज्याला रणांगणी मरण येईल, त्याला स्वर्गच मिळणार आहे. भविष्याचा जराही विचार न करता सर्वांनी प्राणपणाने लढा. तुम्हाला क्षत्रियाचे वैभवशाली मरण हवे की अंथरुणात आजारी पडून मरायचे आहे हे तुम्ही ठरवा. उज्ज्वल भविष्य तुमची वाट पाहात आहात ना. मग जिंकण्यासाठी तयार व्हा. त्यांचे शब्द ऐकून सैन्यात उत्साहाची एकच लहर सळसळली आहे. सर्वांच्या हाती शस्त्रे आहेत. फक्त एका माणसाकडे ती नाहीत. तो म्हणजे राधेय. जोवर भीष्म जिवंत आहेत, तोपर्यंत मी लढणार नाही, अशी शपथ त्याने घेतली आहे. भीष्मांच्या अनुयायांना अश्वत्थाम्याचे नेतृत्व आहे. शिवाय शल्य, भूरीश्रवा असे अनेक वीर भीष्मांच्या अवतीभवती आहेत.

सैन्याच्या मध्यभागी दुर्योधनाचा रथ आहे. त्याच्या सुवर्ण रेशमी ध्वजावर सर्पाचे चित्र झळकत आहे. त्याचे प्रचंड सैन्य पाहून युधिष्ठिर अर्जुनाला म्हणत आहे की अकरा अक्षौहिणी एवढे त्यांचे सैन्य आहे आणि आपले तर सातच अक्षौहिणी. भीष्मांच्या या प्रचंड सैन्यापुढे आपला निभाव

कसा लागेल? यावर अर्जुन म्हणत आहे की दादा, ही चौरस व्यूहाची रचना 'वज्रव्यूह' म्हणून परिचित आहे. ती वज्रासारखी अभेद्य असते. अशी रचना इंद्राला आवडते म्हणूनच याला 'वज्रव्यूह' म्हणतात. पांडवांच्या आघाडीस धृष्टद्युम्न आहे. त्याला मदत म्हणून भीम सोबत आहे. मध्यभागी युधिष्ठीर आणि अर्जुन तसेच शिखंडी आहे. सात्यकी उजवीकडे आहे. अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर हनुमान विराजमान आहे. रथास पांढरेशुभ्र घोडे आहेत, सारथी श्रीकृष्ण सुहास्यवदनाने त्याचे सारथ्य करीत आहे. कृष्ण-अर्जुन जोडी दृष्ट लागण्यासारखी दिसत आहे. द्रोण आणि कृप हे या जोडीला नर व नारायण यांची जोडी मानत आहे. त्यांनी मनातल्या मनात या जोडीला वंदन केले आहे.

कृष्णाने अर्जुनाचा रथ मध्यावर समोर आणला आहे आणि तो म्हणत आहे,

"अर्जुना, नीट पाहा, तू आता खंबीर राहा, हे भीष्म, कौरव वीरांतील ते सिंह आहेत. हाच वीर पुरुष तुझा पहिला बळी असणार आहे. या महायुद्धाला आता तयार हो."

संजयला आठवत होत्या साऱ्याच गोष्टी. तसा त्या गोष्टी तो आपल्या धन्यासमोर म्हणजेच धृतराष्ट्रसमोर बया करीत होता. संजयला त्या गोष्टी आठवताच त्याला कुठंतरी हरविल्यासारखं वाटत होतं. आज त्याला

एकाकी वाटत होतं. कारण आज त्याला सोबत असलेले कोणीही जीवंत नव्हते. आंधळा राजा धृतराष्ट्र हा कौरवांच्या बाजूच्या प्रमुखांचा पिता होता. सारथी गवाल्गणाचा मुलगा संजय हा धृतराष्ट्राचा सल्लागार आणि त्याचा सारथी देखील होता . संजय हा कृष्ण द्वैपायन वेदव्यास ऋषींचा शिष्य होता आणि तो आपल्या गुरु राजाप्रती अपार भक्त होता.

संजय ज्याला धृतराष्ट्रसाठी दूरवरच्या घटना पाहण्याच्या दिव्य दृष्टीची आवश्यकता होती. व्यासाचा धृतराष्ट्र पुत्र असल्याने व्यासाने संजयला आपला आधार म्हणून ठेवले. त्यातच कधीकधी तो पांडवांचा व कौरवांचा संदेशवाहकही बनला. हे महायुद्ध सुरु होण्यापूर्वी संजय कौरवांचा राजदूत म्हणून युधिष्ठिराकडे त्यांच्या बाजूने वाटाघाटी करण्यासाठी गेला होता.

व्यासांनी धृतराष्ट्रसाठी संजयला दिव्य दृष्टी दिली होती.

दैवी दृष्टी असणे हे केवळ सूक्ष्म दृष्टीपेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. ज्याच्याकडे सूक्ष्म दृष्टी आहे, तो त्याच्या मनात अदृश्य गोष्टींची प्रतिमा पाहतो तर दैवी दृष्टीमध्ये ती मनात असण्याऐवजी ती व्यक्तिशः पाहण्यासारखी असते. तसेच ध्वनी भौतिक कानाने ऐकले जातात. ते विचारांच्या प्रवाहाप्रमाणे नाही.

संजय हस्तिनापूरमध्ये असताना कुरुक्षेत्राच्या रणांगणावर घडलेल्या घटनांची मालिका त्याच्यासाठी अगदी स्पष्ट होती. रणांगणावर असल्यासारखे त्याने डोळ्यांनी पाहिले. संजयने पाहिले धृतराष्ट्राचे पक्षपाती धोरण, त्यांनी दुर्योधनाचे शब्द आपल्या कानांनी ऐकले, पितामह भीष्मांचे भयंकर युद्ध, कुरुवंशाच्या नाशाची घोषणा करणारा पांचजन्याचा जोरदार आवाज आणि कृष्ण आणि अर्जुन यांच्यातील संवाद. संजयनं गीताही ऐकली होती.

संजयचे एका सामान्य व्यक्तीपेक्षा स्पष्टपणे वागणे यात दिसून येत आहे. कारण त्याला अशा गोष्टी ऐकू येत होत्या, ज्या सामान्य व्यक्तीला घाबरवणाऱ्या होत्या.

महाभारत सुरु होण्यापुर्वी युद्धाच्या पूर्वसंध्येला, गीता बोलली गेली होती. गीतेच्या पहिल्याच श्लोकात राजा धृतराष्ट्राने दैवी दृष्टीची देणगी प्राप्त केलेल्या संजयकडून युद्धाची माहिती मागितली.

धृतराष्ट्राचा सल्लागार म्हणून संजयचे काम तितकेसे कठीण नव्हते. जोपर्यंत त्याला धृतराष्ट्राला युद्धात वेगवेगळ्या वेळी भीमाच्या हातून आपल्या शंभर पुत्रांचा मृत्यू झाल्याची बातमी सांगावी लागली आणि दुःखी झालेल्या राजाला त्याच्या काळोख्या वेळी सांत्वन द्यावं लागलं.

संजयनं कुरुक्षेत्रातील युद्धाची प्रत्येक घटना सांगीतली. त्यांनी विविध वर्णने देखील दिली. त्यानं पृथ्वी, इतर ग्रह, आणि भारतीय उपखंडावर लक्ष केंद्रित केले आणि शेकडो राज्ये, जमाती, प्रांत, शहरे, शहरे, गावे, नद्या, पर्वत आणि जंगले यांची विस्तृत यादी दिली. संजयनं प्रत्येक दिवशी प्रत्येक बाजूने आढावा घेतलेल्या लष्करी रचना, प्रत्येक वीरांचे मृत्यू आणि प्रत्येक युद्धाचे तपशील सांगीतले आहेत. व्यास बद्दलही त्यानं आपलं मत स्पष्ट केले. संजयने या युद्धातील घटनांचे कथन आणि त्यांची मते अतिशय स्पष्टपणे मांडली आणि त्यांनी कृष्ण आणि अर्जुन यांच्या हातून कौरवांच्या नाशाची भविष्यवाणी देखील केली होती.

संजय हा धृतराष्ट्राचा प्रामाणिक सल्लागारही होता. तो सल्ले देत असे आणि सल्ले देतांना धृतराष्ट्रला राग येईल व ते आपल्याला पदावरुन निष्काषीत करतील याचाही ते विचार करीत नव्हते.

संजय हे एक सद्गुणी पात्र होतं की जे अंतर्ज्ञानी ज्ञानाचे प्रतिनिधित्व करीत होतं. जे ज्ञान दैवी कृपा मिळविण्यासाठी तो अर्जुनासारखा भाग्यवान नसला तरीही तो अजूनही भगवान कृष्णाकडून ज्ञान प्राप्त करण्यास सक्षम होता. कारण त्यानं आपल्या शरीरावर आणि मनावर नियंत्रण ठेवण्यास प्रवीणता प्राप्त केली होती. तो जागरुकतेची भावना दर्शवित होता. कारण तो लढाईत घडणाऱ्या सर्व तपशीलांना साक्षीदार करण्यास सक्षम होता.

संजय धृतराष्ट्रला सांगत होत्या त्या गोष्टी. एकदा अर्जुनाने आपले धनुष्य आणि बाण सोडले आणि रथाच्या आसनावर तो बसला. तेव्हा त्याचे मन दुःखाने भारावून गेले होते. हे संजयला दिसून आले. अर्जुनाला त्याचे शारीरिक रुपात थकलेला असतांना त्यानं अनुभवलं होतं. तोही प्रसंग सांगीतला होता त्यानं निःसंकोचपणे धृतराष्ट्रला. आज ती सर्व त्याचे सखेसोबती व समवयस्क मंडळी त्याचेसोबत नव्हती. संन्यास घेतल्यानंतर तो हस्तीनापुरात जावू शकत नव्हता. म्हणून तो हिमालयात गेला होता.

आज तो अख्खा हिमालयही त्याला खायला धावत होता. कारण तो एकाकी होता. अशाच आठवणी काढता काढता तो आपल्या आयुष्याचे उर्वरीत आयुष्य जगत होता. त्या आठवणी काढून काढून त्याला चिंता सतावत होती. मात्र त्याच्या जीवनात मरणाशिवाय कोणताच मार्ग निघत नव्हता. असाच तो एकाकी, निराश आणि लाचार अवस्थेत जीवन जगत होता एखाद्या मायेने सोडलेल्या लेकरागत. आज त्याचे जवळचे सगेसंबंधी, हितचिंतक त्याच्या जीवनाच्या वाटेवर नव्हते. ते तर केव्हाच त्याला सोडून जंगलात लागलेल्या आगीत भष्मसात होवून दूर निघून गेले होते. दूर...... कुठंतरी...... कितीही शोधले तरी कधीच न सापडण्यासाठी.

आज संजय हयात नव्हता. परंतू तो हयात असतांना त्यानं केलेलं कार्य आज हयात होतं. त्यानं केलेली धृतराष्ट्रला मदत आजही लोकांच्या

लक्षात होती. तो होता म्हणून धृतराष्ट्रला राज्यकारभार चालवता आला. तो जर नसता तर त्याला कदाचीत राज्यकारभारही चालवता आला नसता.

सत्यवती आज जीवंत नव्हती. परंतू तिची इच्छा पुर्ण झाली होती. तिचं स्वप्न होतं की हस्तीनापुरातील राजगादीवर तिचेच वंशज बसावेत. ती गोष्ट खरी ठरली होती. आज त्या गादीवर तिच्याच वंशातील वारस पंडू बसला होता. त्यानंतर आंधळा का होईना, धृतराष्ट्र बसला होता व आज त्याच गादीवर युधिष्ठीर.

आज धृतराष्ट्रही जीवंत नव्हता. ना पंडू ना गांधारी ना कुंती ना विदूरही. तसाच ना संजयही. तसाच महाभारतातील कोणीही कौरववंशाचा जीवंत नव्हता एक अश्वत्थामा सोडला तर. तसाच हस्तीनापुरातील राजगादीवरील वारसाबाबतचाही प्रश्न मिटलेला होता. आज याच गादीवर खऱ्या स्वरुपात युधिष्ठीर रुपानं कायमचा वारस मिळालेला होता. ज्यानं न्यायानं हस्तीनापुरातील राज्य चालवलं होतं. जे राज्य त्यानं आपल्या वयाच्या अनेक वर्षापर्यंत चालवलं होतं. त्यानंतर युधिष्ठीरनं आपलं राज्य अर्जूनाचा नातू परीक्षीतच्या हाती देवून तो स्वर्गारोहणाला गेला होता.

***********समाप्त***********

# *अंकुश रा. शिंगाडे



*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

## *प्रकाशित छापील साहित्य:

***कवितासंग्रह***

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४) राजवाडा

***कादंबरी***

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

***कथासंग्रह***

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

***लेखसंग्रह***

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्त्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना

***चारोळीसंग्रह***

१)आक्रमण

***प्रवासवर्णन***


१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती


*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*

**अंकुश शिंगाडे**

**यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके**

**ज्या कव्हरवर एक क्लिक कराल ते पुस्तक उघडेल.**


























अंकुश शिंगाडे

यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके

ज्या कव्हरवर एक क्लिक कराल ते पुस्तक उघडेल.

















http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bappa_rawa
df





























अंकुश शिंगाडे
भुताटकी



अंकुश शिंगाडे
रा जा दा हि र


अंकुश शिंगाडे
घटस्फोट



अंकुश शिंगाडे
महाराणी संयोगीता आणि पृथ्वीराज


अंकुश शिंगाडे
मा र्ग अर्जूनचा


अंकुश शिंगाडे
लेखक


अंकुश शिंगाडे
लिखीत
गोविंद गोपाळ गायकवाड
कादंबरी


अ स्ति त्व
अंकुश शिंगाडे


अंकुश शिंगाडे
कामगार

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.
# श्री अंकुश शिंगाडे यांचे ईसाहित्यवर हे तेहतिसावे पुस्तक.
# या कादंबरीसाठी त्यांचे अभिनंदन

अंकुश शिंगाडे एक शिक्षक आहेत. शिक्षक ही त्यांची केवळ उपजीविका नाही तर जीविकाही आहे. समाजात सत्याचे आणि विज्ञानाचे ज्ञान पसरावे व समाज मनाने बळकट व्हावा, त्यातही मुलींनी शिकावे व त्यांच्या आत्मनिर्भरतेने समाजाला अधिक बळकटी यावी हे त्यांचे स्वप्न आहे. ते भरपूर लिहीतात ते समाजातील दबल्या गेलेल्या घटकांना आवाज देण्यासाठी. आपली पुस्तके समाजात जास्त वाचली जावीत असे त्यांना वाटते आणि ई साहित्य हे त्या दृष्टीने त्यांन योग्य वाटते. त्यांची आजवर २४ छापील पुस्तकेही विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत व त्यांच्या पुस्तकांना मागणी आहे. पण तरीही ते आपली पुस्तके ई साहित्यच्या वाचकांना विनामूल्य देतात.

अंकुश शिंगाडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९),

डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (९), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(१०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (५), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (६), जयश्री पटवर्धन(५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, उत्कृष्ट लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली उत्तमोत्तम पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।